ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ३ ऑक्टोबर, १९६२ | अंक १९

## विविध माहिती

**मलायाला साखरेची निर्यात**—मलायामधील साखरेचा व्यापार करणारी एक चिनी कंपनी आणि भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान साखरेच्या खरेदीसंबंधी करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें कॉर्पोरेशन १९६३ सालीं मलायाला ७०,००० टन साखर निर्यात करणार आहे. साखरेची किंमत रोखीनें देण्यांत येणार असून ती पौंडाच्या चलनांत दिली जाईल. चालू वर्षी भारत मलायाला ६२,००० टन साखर ऐनजिनसी बदलापद्धतीनें निर्यात करीत आहे.

**रक्त गोठविण्यासाठी नवा उपाय**—कॅनडामधील एका इस्पितळांत एका रोग्याच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. परंतु नंतर जखमेंतील रक्त गोठण्याची क्रिया नीट होईना. ह्या रोग्याला हा विकारच होता. अखेर डॉक्टरांनीं त्याच्या पोटांत कांहीं द्रव्यानें भरलेली पेटी ठेवली व रक्तस्राव थांबविला. शस्त्रक्रिया झाल्यानंतर ७८ दिवस झाले. तरीहि रक्तस्राव नैसर्गिक रीत्या थांबण्याचें चिन्ह दिसत नव्हतें.

**शास्त्रज्ञांची व तंत्रज्ञांची यादी**—परदेशांतून शिकून भारतांत आलेल्या शास्त्रज्ञांची व तंत्रज्ञांची यादी आतां ५०० पर्यंत करण्यांत आली आहे. १९६० सालीं यादींतील शास्त्रज्ञांची संख्या १०० ऐवजीं २०० करण्यांत आली होती. गेल्या जानेवारींत ती ३०० करण्यांत आली. योग्यशी नौकरी मिळेपर्यंत त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनांतहि दुसऱ्या पगार मंडळाच्या शिफारसींप्रमाणें सुधारणा करण्यांत आली आहे.

**मोलोटॉव्ह आठवणी लिहीत आहेत**—स्टॅलिनच्या राजवटींत गाजलेले परराष्ट्रमंत्री मि. मोलोटाव्ह सध्या आपल्या आठवणी लिहीत आहेत. स्टॅलिनच्या मरणानंतर नेमण्यांत आलेल्या तीन कारभाऱ्यांपैकीं ते सर्वांत ज्येष्ठ होते. मि. कुश्चाव्ह ह्यांच्या जमान्यांत त्यांना दूर करण्यांत येऊन आंतरराष्ट्रीय अणुशक्ति मंडळावरील रशियाचे प्रतिनिधी म्हणून नेमण्यांत आले होते. आतां ह्याहि जागेवरून त्यांना निवृत्त करण्यांत आले आहे.

**विनोबाजी भावे आणि कम्युनिझम**—आचार्य विनोबा भावे ह्यांना त्यांच्या कम्युनिझमविरोधाचें कारण कम्युनिझमचा धर्मविरोध आहे काय, असें विचारण्यांत आलें असतां ते म्हणाले कीं कम्युनिझमची दृष्टि कडक सांप्रदायिक आहे. त्याऐवजीं ती मानव्यावर आधारित असावयास पाहिजे. कम्युनिझममधील सांप्रदायिक आग्रहामुळें आजच्या जगाचीं दोन भागांत शकलें झालेलीं आहेत. दारिद्र्य गेल्याशिवाय कम्युनिझममुळें फायदा होणार नाहीं.

**तारापूर येथील अणुवीज केंद्र**—महाराष्ट्रांत तारापूर येथें उभारण्यांत यावयाच्या अणुशक्तीवरील वीजकेंद्रासाठी भारत-सरकारनें १६ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची तरतूद केली आहे. केंद्राच्या उभारणीसाठी सुमारें ५५ कोटी रुपये खर्च येणार असून त्यापैकीं निम्मी रक्कम परदेशीय चलनांत लागणार आहे. अमेरिकेकडून बरीच मदत मिळणार आहे. त्याशिवाय फ्रान्सनेंहि अणुभट्टी बांधण्याची तयारी दर्शविली आहे.

**टाटा कंपनीच्या कामगारांना बोनस**—टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या कामगारांना १९६१-६२ सालच्या कंपनीच्या नफ्यांतील वाटा म्हणून १ कोटी, ३५ लाख रुपये बोनस म्हणून मिळणार आहेत. कामगाराच्या मूळ पगाराच्या प्रमाणांत ५५ दिवसांचा पगार त्यांना मिळणार आहे. गेल्या वर्षी त्यांना १ कोटी, २५ लाख रुपये बोनस म्हणून मिळाले होते.

**हत्तीची आत्महत्या**—जंगली जनावरांसाठी राखून ठेवलेल्या केनिआमधील अरण्यांत एका हत्तीनें आत्मघात करून घेतल्याचें वृत्त आलें आहे. हत्तीनें अरण्यांतील नदींत शिरून आपली सोंडहि पाण्याखाली घेतली व बऱ्याच वेळानंतर एक दीर्घ श्वास सोडून शरीरावरील ताबा सोडला. ह्या अभूतपूर्व प्रसंगाचे फोटो घेण्यांत आले आहेत.

**द्रव पेट्रोलचे बुधले**—बरौनी येथें काढण्यांत येत असलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्यांमधून दरसाल २० ते ६० हजार टन द्रव पेट्रोल मिळूं शकेल. हें पेट्रोल बुधल्यांत भरून घरगुती वापरासाठी देतां यावें म्हणून भारत सरकारच्या मालकीची इंडिअन ऑईल कंपनी ३ कोटी रुपये भांडवलाचा स्वतंत्र कारखाना काढणार आहे.

**चीनमधील धान्यटंचाई** — चीनमधील अन्नधान्याची टंचाई दूर करण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून चीनकडून हाँगकाँगमधील धान्याच्या व्यापाऱ्यांकडे अन्नधान्याची मागणी करण्यांत येत आहे. हाँगकाँगमधून २०,००० टन मका खरेदी करण्याचे प्रयत्न चीनकडून करण्यांत येत आहेत. ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्यें लागणाऱ्या धान्यापैकीं एक शष्ठांश धान्यच आतांपर्यंत चीनला मिळालें आहे.

**सिंहगडावर जाण्यासाठीं मोटाररस्ता**— सिंहगडावर जाण्यासाठी मोटाररस्ता तयार करण्याचें काम फेब्रुआरी १९६० पासून चालूं करण्यांत आलेलें आहे. रस्ता जीप नेण्यासारखा करण्यांत येत आहे. रस्त्याची लांबी २८,००० फूट होईल व तो पूर्ण करण्यासाठी १०·५४ लाख रुपये खर्च येईल. सिंहगड हें ठिकाण प्रवाशांना आकर्षक करण्याचे दृष्टीनें त्याचा विकास करण्यांत येत आहे.

## पूर्व खानदेश सें. को. बँकेचे चेअरमन



**श्री. अप्पासाहेब गुलालसिंग शंकरराव पाटील,**
**बी. ए., एलूएल्. बी., एम्. पी.**

श्री. अप्पासाहेब सुविद्य, कायदेपंडित, अत्यंत उत्साही सार्वजनिक कार्यकर्ते आणि प्रभावी सहकारी नेते असून अनुभवशीर, शांत व विनयशील पण दमदार निश्चयी विचाराचे आहेत.

शिक्षण, सहकारक्षेत्रांत त्यांनीं जिल्ह्यांतील जनतेची उच्चस्थानावरून दीर्घकाळ सेवा करून, प्रभावी मार्गदर्शन करून जळगांव जिल्ह्यांत सहकारी चळवळ पुढें नेण्यांत सुयश संपादन केलें आहे.

श्री. अप्पासाहेब, जे. एस्. पाटील, यांचा जन्म बाळद, तालुका पाचोरे, जिल्हा जळगांव येथें ता. २६–१–१९०९ रोजीं, शेतकरी कुटुंबांत झाला. त्यांचे वडील अत्यंत शिक्षणप्रेमी; म्हणून प्रथमपासूनच त्यांनीं शिक्षणाची काळजी घेतली.

प्राथमिक शिक्षण ४ थी पर्यंत बाळद येथें घेऊन दुय्यम शिक्षण चाळीसगांव येथील हायस्कुलांत घेतलें. १९२८ सालीं ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते पुणें येथील फर्ग्यूसन कालेजमध्यें १९३२ पर्यंत उच्च शिक्षण घेऊन बी. ए. झाल्यावर पुणें लॉ–कालेजमधून ते एलूएलू. बी. झाले व त्यांनीं चाळीसगांव येथें वकिली सुरू केली.

१९३६ सालीं त्यांनीं काँग्रेसमध्यें प्रवेश केला व १९३७ मध्यें संपूर्ण खादीधारी बनले. सार्वजनिक जीवनाला याचवेळीं सुरुवात झाली. १९३७ सालीं सहकारी क्षेत्रांत त्या वेळीं बॉम्बे को. ऑप. इन्स्टिट्यूटची शाखा जळगांव याचे मनेजिंग कमिटीचे ते सभासद होते. ( १९३७ ते १९३९ )

१९३८ मध्यें काँग्रेसतर्फें ते पाचोरा मतदारसंघांतून जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद म्हणून निवडून आले. १९३९ ते १९४१ पर्यंत जिल्हा लोकल बोर्डाचे व्हाईस प्रेसिडेंट होते. त्यानंतर पुन्हा १९५० ते १९५२ पर्यंत जिल्हा लोकल बोर्डात चाळीसगांव संघांतून निवडून आले.

चाळीसगांव ता. को. सुपरवायझिंग युनियनवर त्यांनीं १९३७ ते १९३९ व तालुका डेव्हलपमेंट अॅग्रि. असोशिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं १९३९ ते १९५० पर्यंत काम पाहिले. जिल्हा सेल परचेस सोसायटीच्या चाळीसगांव शाखेचे ते १९३९ ते १९४१ पर्यंत चेअरमन होते.

पूर्व खानदेश जिल्हा स्कूलबोर्डात त्यांनीं १९४३ ते १९४८ पर्यंत सभासद व १९४६ ते १९५० पर्यंत चेअरमनचें काम केलें.

स्कूलबोर्डाचे चेअरमन असतांना सक्तीची शिक्षणयोजना, बेसिक ट्रेनिंग, याच वेळेला अमलांत आणली आणि या योजना यशस्वीपणें राबविल्या गेल्या.

१९५१ ते १९५७ पर्यंत मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत ते सभासद होते.

पूर्व खानदेश सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेचे डायरेक्टर १९४२ ते १९४३, पुन्हा डायरेक्टर, १९४७, व्हाईस चेअरमन, १९४७ ते १९५० व १९५० पासून आजतागायत ते या भारत प्रसिद्ध बँकेचे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष चेअरमन आहेत. या अवधींत त्यांच्या कार्यकुशल व अभ्यासू कर्तबगारीनें जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची प्रगति खूप झाली व बँकेला भारतांत मानाचें स्थान त्यांनीं प्राप्त करून दिलें.

श्री. अप्पासाहेब पाटील हे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबईच्या कार्यकारी मंडळावर बरींच वर्षें सभासद असून नुकतीच डिसेंबर १९६१ सालापासून या बँकेच्या व्हाईस चेअरमन पदावर त्यांची सर्वानुमतें निवड झाली आहे.

इंडियन अॅग्रि. रिसर्च कौन्सिलवर ते सभासद म्हणून सहकारी चळवळीतर्फें प्रतिनिधी म्हणून मध्यवर्ती सरकारनें १९५७ ते १९६० पर्यंत दिल्ली येथें नेमणूक केली.

ते पू. खा. मराठा विद्याप्रसारक सहकारी समाज याचे १९६० ते १९६१ मध्यें चेअरमनपदावर होते व सदर संस्थेच्या कार्यकारी मंडळावर १९४३ पासून ते आजतागायत सभासद आहेत.

जिल्हा विकास मंडळाचे व्हा. चेअरमन म्हणून १९६० ते १९६२ मेपर्यंत विभागीय विकास मंडळाचे ते सदस्य होते.

जिल्हा ग्रामपंचायत बोर्डावर व विभागीय जिल्हा ग्रामपंचायत कौन्सिलचेहि ते सदस्य होते.

१९६२ सालीं ते दिल्ली पार्लमेंटचे सदस्य म्हणून प्रचंड मतांनीं निवडून आले आहेत.

त्यांचे स्वभावांतील सौजन्यता, सर्वांशीं सहकार्य व खेळकर वृत्ति, बुद्धिमता आणि अभ्यासू चिकाटी वृत्ति यामुळें ते फार मोठ्या पदावर पोहोंचले आहेत व सहकारी क्षेत्रांत त्यांचें नांव चिरकाल राहील अशी त्यांनीं या क्षेत्रांत सखोल अभ्यास व अनुभवानें कामगिरी केली आहे.

---

### केळयांच्या निर्यातीबाबत अडचण

भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे मॅनिजिंग डायरेक्टर श्री. गोविंद नारायण ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, भारतामधील केळ्यांना रशिया, जपान सारख्या देशांत चांगली बाजारपेठ मिळूं शकेल. परंतु केळीं ह्या दूरच्या देशांना पाठविल्यास तीं मुक्कामावर पोंहचण्यास वेळ फार लागतो ही खरी अडचण आहे. भारतामधील केळीं ३० दिवसांपर्यंत टिकवितां येतात; परंतु तीं रशियाला समुद्रमार्गानें पाठवावयाचीं झाल्यास ४५ दिवसांपर्यंत टिकवितां आलीं पाहिजेत. इतक्या मुदतीपर्यंत केळीं टिकवितां आल्यास केळयांची निर्यात फायदेशीर होऊं शकेल. कांहीं भारतीय कंपन्या केळीं दीर्घ कालपर्यंत टिकविण्याचे प्रयत्न करणार आहेत. अशा कंपन्यांना कॉर्पोरेशनकडून सर्व प्रकारचें उत्तेजन मिळेल.

# अर्थ

बुधवार, ता. ३ ऑक्टोबर, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शिरगणतींतील स्त्री-पुरुषांच्या संख्येंतील विषमता

मद्रास येथील ' इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन स्टडीज ' ह्या संस्थेचे डायरेक्टर, डॉ. एस. चंद्रशेखर ह्यांनीं मद्रास विद्यापीठांत भारताच्या लोकसंख्येविषयीं कांहीं व्याख्यानें देऊन आपले विचार प्रगट केले आहेत. त्यांनीं आपल्या भाषणांत १९६१ च्या शिरगणतीचा आधार घेऊन लोकसंख्येंतील स्त्री-पुरुषांचें विषम प्रमाण, आयुष्याच्या लांबीची अपेक्षा, मृत्युसंख्येच्या प्रमाणांत झालेली घट, लोकांचें राहणीचें मान वाढविण्याचा प्रश्न, इत्यादि अनेक मुद्यांचा प्रपंच केला. ते म्हणाले कीं, लोकसंख्येच्या बिकट प्रश्नाबाबत नुसती अकरणात्मक भूमिका घेऊन भागण्यासारखें नाहीं. शिरगणतीच्या निमित्तानें जमा करण्यांत आलेली आंकडेवार माहिती, लोकांच्या गरजा आणि संपत्ति उत्पादन करण्याचीं हाताशीं असलेलीं साधनें, ह्यांचा विचार करून लोकसंख्याविषयक धोरण ठरविण्यांत आलें पाहिजे. एखाद्या समाजांत मृत्यूचें दरहजारीं प्रमाण काय असूं शकेल तें त्या समाजांतील स्त्री-पुरुषांच्या परस्पर-प्रमाणांवर अवलंबून असतें. ह्या प्रमाणाला फार महत्त्व आहे. सर्वसाधारणपणें स्त्रियांच्या मृत्यूचें दरहजारीं प्रमाण पुरुषांच्यापेक्षा कमी असतें; कारण रोगांशीं सामना देण्याची शक्ति त्यांना निसर्गानें अधिक दिलेली असते. दुसरें असें कीं, लग्नाचीं वयें झालेल्यांत मुलगे अधिक आहेत कीं मुली अधिक आहेत ह्यांवर, विवाहांची संख्या आणि म्हणूनच जननाचें प्रमाण हीं दोन्हीहि अवलंबून असतात. एक हजार पुरुषांशीं स्त्रियांच्या संख्येचें पडणारें प्रमाण, ह्याला लिंगविषयक प्रमाण म्हणतात. हें प्रमाण भारतांत नेहमींच विषम राहात आलेलें आढळून येतें. १९०१ सालीं १,००० पुरुषांशीं ९६३ स्त्रिया असें प्रमाण होतें. १९६१ सालीं १,००० पुरुषांबरोबर ९४० स्त्रिया असें हें प्रमाण आहे.

भारतामधील लोकसंख्येच्या वाढींतील ही एक विशेष बाब आहे असा त्याचा अर्थ नाहीं, किंवा स्त्रियांची गणति कमी झाली असेंहि नाहीं. भारतामधील सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचें तें प्रतिबिंब आहे. ह्याबाबतच्या विशिष्ट प्रचलित परिस्थितीमुळें लहान मुली व माता ह्यांचे मृत्यु अधिक प्रमाणावर होतात. जननाबाबतचे आंकडे जननांच्या नोंदीवरून जमविण्यांत आले आहेत. त्यावरून भारतांत मुलींपेक्षां मुलगे अधिक जन्माला येतात असें आढळून आलें आहे. जगण्याच्या चिवटपणाच्या बाबतींत स्त्रिया अधिक उजव्या आढळतात. हें जरी खरें असलें तरी आयुष्याच्या धकाधकींत त्या अधिक लवकर पराभूत होतात हेंहि खरें आहे. ह्या बाबतींत पुरुष हा अधिक टणक दिसून येतो. ह्याविषयीं दोन उपाय सुचवितां येण्यासारखे आहेत. एक असा कीं, स्त्रियांना शिक्षण घेण्याच्या संधि अधिक उदार हातानें देण्यांत याव्या; आणि दुसरा असा कीं मुलींपेक्षां मुलगे होण्याबाबत सध्यां जी आतुरता व आग्रह सर्वत्र दाखविला जातो तो सोडून देण्यांत आला पाहिजे.

१९२१ सालीं भारतांत आयुष्याच्या लांबीची सरासरी अपेक्षा २३ वर्षे होती. १९५१ सालीं ती ३२ झाली आणि आतां म्हणजे १९६१ सालीं ती ४५ आहे. भारतामधील लोकांची आयुष्याची अपेक्षा आशियांतील कांहीं इतर देशांच्या मानानेंसुद्धां कमी आहे. उदाहरणार्थ, जपानमध्यें ही अपेक्षा ६५ वर्षे आहे. लोकांचा आहार व त्यांची आरोग्यविषयक परिस्थिति ह्यांच्यांत सुधारणा करतां आली तर भारतामधील आयुर्मानाची अपेक्षा वाढवितां येईल, ह्यांत मुळींच शंका नाहीं. ही सुधारणा होणें आर्थिक विकासावर अवलंबून आहे हें उघडच आहे.

## तारापूर येथील अणुशक्तीवरील वीजकेंद्र

तारापूर येथें उभारण्यांत यावयाच्या अणुशक्तीवरील वीजकेंद्रासंबंधीं कांहीं माहिती अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं पत्रकार परिषदेंत सांगितली. ते म्हणाले कीं, केंद्राच्या नमुन्यासाठीं आणि बांधकामासाठीं जगांतील सर्व प्रगत देशांकडे विचारणा करण्यांत आलेली होती. कॅनडा, फ्रान्स, ब्रिटन व अमेरिका ह्या देशांकडून केंद्रासंबंधीं सात टेंडर्स आलीं होतीं. त्या सर्वांचा विचार करण्यांत आला. अमेरिकेच्या इंटरनॅशनल जनरल इलेक्ट्रिक कंपनीकडून आलेले टेंडर सर्वांत चांगले वाटले. टेंडरांचा विचार करतांना तांत्रिक, आर्थिक आणि इतर बाबींचाहि विचार अर्थातच करण्यांत आला. तथापि, अमेरिकन कंपनीशीं समाधानकारक करार करण्यांत आल्यावरच तिच्या टेंडरचा स्वीकार करण्यांत येईल. तारापूर येथील अणुवीजकेंद्रांत ३,८०,००० किलोवॅट विजेचे उत्पादन करण्यांत येईल. ह्या केंद्रांत उकळत्या पाण्याचा उपयोग करणाऱ्या दोन अणुभट्ट्या वापरण्यांत येतील. आशिआ खंडांतील अशा प्रकारचें हें सर्वांत मोठें केंद्र होईल. केंद्राची जागा तयार करणें, केंद्राची वसाहत उभारणें, इत्यादि खर्च सोडून त्याच्या उभारणीसाठीं ४८.५ कोटी रुपये खर्च येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३,००,००० किलोवॅट शक्तीचें केंद्र उभारण्यासाठीं ५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली आहे. केंद्रांत तयार होणाऱ्या प्रत्येक किलोवॅटमागें ३.२५ नये पैसे खर्च येईल असा अंदाज आहे. ह्या भागांत उष्णतेवर वीज उत्पन्न करणारी जीं केंद्रे आहेत, त्यांना येणाऱ्या खर्चाचे मानानें हा खर्च कमी आहे. १९६३ च्या प्रारंभीं केंद्राच्या उभारणीच्या कामास प्रारंभ करण्यांत येईल आणि ते १९६६ अखेर पुरें होईल.

## काश्मीरमधील भारतीय भांडवल

काश्मीरचे मुख्य प्रधान बक्षी गुलाम महमंद ह्यांनीं तेहरानमधील एका दैनिकाला दिलेल्या मुलाखतींत भारतामधील भांडवल काश्मीरमध्यें गुंतविण्यासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात कीं, काश्मीरमध्यें मालमत्ता करण्यावर व भांडवल गुंतविण्यावर जर निर्बंध घातले नाहींत तर भारतामधील भांडवलदार सर्व काश्मीर विकत घेऊन आपल्या मालकीचे सहज करूं शकतील. भारतामधील भांडवलदारांना काश्मीरमध्यें भांडवल गुंतवितां येतें. मात्र कोणत्याहि औद्योगिक अगर इतर कारखान्यांतील ५१ टक्के भाग भांडवल काश्मीर सरकारचें असलें पाहिजे, असें बंधन त्यांच्यावर घालण्यांत येतें. काश्मीर गरीब राहिलें तरी चालेल; पण त्यावर दुसऱ्यांनीं हुकमत गाजवितां कामा नये.

## कर-आकारणींत वरिष्ठांची ढवळाढवळ नको

वरिष्ठ प्राप्तिकर अधिकाऱ्यांची, आकारणीमध्यें ढवळाढवळ करण्याची वृत्ति, स्पष्टपणें दाखविणारा एक खटला (एस्. सेवासिंग गिल वि कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स रि. नं. ५६७-D-१९५७ पंजाब हायकोर्ट) नुकताच आपल्या वाचनांत आला. कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स यांनीं एका इन्कमटॅक्स अधिकाऱ्याला इन्स्पेक्टिंग असिस्टंट कमिशनरच्या मंजुरीनें आकारणी करण्यास सांगितलें. इन्कमटॅक्स अधिकाऱ्यानें सदर आकारणी केली; व तिची प्रत इन्स्पेक्टिंग असिस्टंट कमिशनरकडे मंजुरीला पाठविली; पण त्यांच्याकडून मंजुरी न आल्यानें ऑर्डर तशीच पडून राहिली. दरम्यान सदर इसमावर इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम २२ (४) खाली परत नोटीस पाठविली. याविरुद्ध सदर इसमानें पंजाब हायकोर्टांत अर्ज दाखल करून आकारणी पूर्वीच पूर्ण झालेली असल्यानें आतां आकारणीचा प्रश्नच उद्भवत नाहीं, असें ठरविण्यासाठी अर्ज केला.

एखाद्या अधिकाऱ्याला एखादें काम कायद्यानें दिलें असलें तर तें त्यानेंच पुरें केलें पाहिजे, वरिष्ठांनीं त्यांत ढवळाढवळ करतां कामा नये, असें ठरवून हायकोर्टानें अर्ज मंजूर केला.

हा सर्व प्रकार पाहून आश्चर्य वाटतें. सरकारनें कायदा करून प्रत्येक अधिकाऱ्यांचीं कर्तव्यें नीट व स्पष्ट ठरवून दिलीं असतां, त्यांना आपल्या कामासाठी वरिष्ठांची मंजुरी कां लागावी ? आणि कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स सारख्या अधिकाऱ्यांनीं तरी अशा मंजुरीचा आग्रह कां धरावा ? अशी प्रत्येक बाबतींत मंजुरी लागूं लागली तर खालपासूनचे अधिकारी केवळ पोस्ट ऑफीसचें काम करतात असें म्हणावें लागेल. प्रत्येक अधिकाऱ्यानें आपली सारासार बुद्धि वापरून कायद्यांतील अधिकाराचा उपयोग केला पाहिजे; न पेक्षा ही अधिकाऱ्यांची संख्या निरर्थक ठरेल.

प्राप्तिकर व विक्रीकर खात्यांत वरिष्ठांकडून खालच्या अधिकाऱ्यांना अनेक तपशीलवार सूचना येतात व त्यानुसार आकारणी होते हें उघडें गुपित आहे. ही पद्धत अत्यंत अनिष्ट आहे. ज्या माणसाला हायकोर्टांत दाद मागण्याचें सामर्थ्य नसेल त्याला अशा दीर्घसूत्री व लहरी आकारण्यांनीं किती त्रास होत असेल हा एक महत्त्वाचा विचार आहे. वरिष्ठांनीं खालच्या अधिकाऱ्यांच्या कामांत ढवळाढवळ करूं नये, व खालच्या अधिकाऱ्यांनीहि वरिष्ठांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न करूं नये, हें कारभाराचें मूलभूत तत्त्व आहे. प्रत्येक वेळेस हायकोर्टानें तें शिकविण्याची जरूरी भासणार नाहीं, अशी दक्षता हीं दोन खातीं घेतील अशी आशा आहे. —व्यापारीमित्र

## कावेरी नदीवरील नवीं धरणें

कावेरी नदीवर आणखी दोन नवीं धरणें बांधून विद्युतनिर्मिति करण्याच्या एका योजनेचा विचार म्हैसूरचें सरकार करीत आहे. ह्या धरणाऐवजी मद्रास व म्हैसूर राज्यांच्या सीमेवर एक धरण बांधण्याची सूचना मद्रास सरकारकडून मागें करण्यांत आलेली आहे. परंतु म्हैसूर सरकारच्या मतानें कावेरीवरील नवीन धरणें बांधल्यानें अधिक विद्युतशक्ति निर्माण करतां येईल.

## १५० मैल वेगानें धावणारी आगगाडी

जपानच्या राष्ट्रीय रेल्वेनें ताशीं १५० मैल वेगानें धावणारी आगगाडी एका मार्गावर चालू करण्याचें ठरविलें आहे. नवा रेल्वेमार्ग रुंद रुळाचा राहील व त्यामुळें जपानमधील प्रमुख औद्योगिक शहरें जोडलीं जातील. तो १९६४ मध्यें चालू होईल. त्याची लांबी ३२० मैल असेल व मार्गावर कोठेंहि जमिनीवरील रस्त्याचें फाटक असणार नाहीं.

## "अर्था"चा दिवाळी अंक

"अर्था"चा ह्यापुढील अंक 'दिवाळी अंक' म्हणून ऐन दिवाळींत प्रसिद्ध होईल.

## किर्लोस्कर बुलार्ड व्हर्टिकल टरेट लेथ

किर्लोस्कर ब्रदर्स लि. नें अमेरिकेंतील बुलार्ड या कंपनीच्या सहकार्यानें व्हर्टिकल टरेट लेथ व हॉरिझॉटल बोरिंग मशिन्स् यांची निर्मिति करण्याच्या योजनेनुसार नुकतेंच किर्लोस्कर-बुलार्ड व्हर्टिकल टरेट लेथ निर्माण केलें आहे. या मशीनची किंमत तीन लाख रु. असून तें अणुशक्तिमंडळाला विकण्यांत आलें आहे. या लेथच्या उद्घाटनानिमित्त एक समारंभ करण्यांत आला होता. या प्रसंगीं बोलतांना श्री. नानासाहेब गुर्जर म्हणाले कीं, हा मोठा लेथ तयार करण्याची कल्पना आम्हांस १९५६ सालीं सुचली. त्यानुसार बुलार्ड या जगप्रसिद्ध अमेरिकन कंपनीशीं आम्ही सहकार्याचा करार केला. या उद्योगांत १ कोटि, ८ लक्ष रु. भांडवल गुंतवावें लागणार असून आतांपर्यंत ५५ लक्ष रु. खर्च झाले आहेत. दरवर्षी अशीं ५० यंत्रें तयार करण्याचा इरादा असून, त्यांतील किमान २५ यंत्रें परदेशीं बाजारपेठेंत खपलीं तरच आम्ही या उद्योगांत यशस्वी ठरलों असें होईल.

कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. शंतनुराव किर्लोस्कर म्हणाले कीं, सध्या देशाची जी औद्योगिक प्रगति होत आहे, त्याचें गमक म्हणजे आम्हीं तयार करीत असलेलीं हीं मोठीं यंत्रें. अशा तऱ्हेचीं यंत्रें भारतांत प्रथम तयार करून किर्लोस्कर कारखाना भारताच्या औद्योगिक वाढींत आघाडीवर आहे हें आपण सिद्ध केलें, याचा मला अभिमान वाटतो, असेंहि ते म्हणाले.

## वंगणाचें तेल तयार करण्याचा कारखाना

एसो तेल कंपनी आणि भारत सरकार ह्यांच्या दरम्यान वंगणाचें तेल तयार करण्याचा एक कारखाना उभारण्यासाठी लवकरच एक करार करण्यांत येणार आहे. कारखान्याच्या भांडवलापैकी निम्में भांडवल सरकारचें असेल व निम्में कंपनीचें असेल. भांडवलापैकी ६० टक्के भांडवल परदेशीय चलनाच्या रूपांत लागणार असून तें पुरविण्याची जबाबदारी कंपनी घेणार आहे. कारखाना उभारण्यासाठी एकूण ६ कोटी रुपये खर्च लागेल. कंपनीतर्फे पुरविण्यांत येणाऱ्या भांडवलापेक्षा जितकी अधिक रक्कम परदेशीय चलनांत देण्यांत येईल ती कर्जाऊ गणण्यांत येईल. कारखाना उभारण्यास सुमारें २॥ वर्षांचा कालावधि लागेल; आणि त्यांत दरसाल १ लाख टन वंगणाचें तेल तयार होईल.

## माहीमची खाडी भरून काढणार

मुंबई कॉर्पोरेशननें माहीमची खाडी भरून काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कामास लवकरच प्रारंभ करण्यांत येणार आहे. खाडी भरून काढल्यावर ४४७ एकर जमीन नव्यानें उपलब्ध होईल. त्यापैकी १८८ एकरांवर १२,००० नवीं घरें बांधण्यांत येणार आहेत. सुमारें ९५ एकर जागा व्यापारी व औद्योगिक विभाग म्हणून राखून ठेवण्यांत येईल. ह्या योजनेसाठी १०.८ कोटी रुपये खर्च येणार आहे.

## रत्नागिरी अर्बन को-बँकेचे चेअरमन

### डॉ. बा. ना. सावंत



डॉ. बा. ना. सावंत

डॉ. बा. ना. सावंत हे रत्नागिरी येथील एक ख्यातनाम डॉक्टर आहेत. सन १९३२ मध्यें ते रत्नागिरींत येऊन स्थायिक झाले व तेव्हांपासूनच सार्वजनिक क्षेत्रांत त्यांनीं भाग घ्यावयास सुरुवात केली.

अनेक वर्षे ते रत्नागिरी म्युनिसिपल बरो, रत्नागिरी जिल्हा लोकलबोर्ड यांचे सभासद व अध्यक्ष होते. रत्नागिरी जेल, मेंटल हॉस्पिटल, रूरल डेव्हलपमेंट बोर्ड, स्टेट ट्रान्सपोर्ट, यांच्या कमिट्यांवर ते सभासद होते. स्काउट चळवळीशींहि त्यांचा मोठा संबंध होता. सार्वजनिक काम हेंच त्यांचें ध्येय! कांहीं वर्षे ते ऑनररी मॅजिस्ट्रेटहि होते.

सहकारी चळवळींत त्यांनीं १९३६ मध्यें पदार्पण केलें. तेव्हांपासून ते सदर बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर आहेत. १९४५ ते १९५५ पर्यंत व्हाईस चेअरमन व १९५७ पासून ते बँकेचे अध्यक्ष व बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन म्हणून काम करीत आहेत.

---

## महाड को-ऑप. अर्बन बँकेचे चेअरमन

### श्री. दत्तात्रय नरहर वैद्य

श्री. दत्तात्रय नरहर ऊर्फ अण्णासाहेब वैद्य हे महाड येथील सुप्रतिष्ठित व सुखवस्तु घराण्यांतील असून, त्यांचें वय आज ६९ वर्षांचें आहे. सन १९१९ सालीं ते फर्ग्युसन कॉलेजमधून बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर त्यांनीं मुंबईच्या लॉ स्कूलमध्यें एलएल. बी. होऊन १९२२ सालापासून महाड येथें वकिलीचा व्यवसाय सुरू केला. महाड वकील मंडळांतील तेच आज सर्वांत जुने वकील आहेत. वकिलीच्या व्यवसायांत त्यांनीं चांगलाच नांवलौकिक मिळविला असून, ते सध्यां बार असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. आपल्या व्यवसायाबरोबरच त्यांनीं सार्वजनिक जीवनास सुरुवात केली. अनेक वर्षे ते महाड नगरपालिकेचे सभासद होते व एकदां तर कार्याध्यक्ष होते.

महाड को-ऑप. अर्बन बँकेच्या कामांत ते आरंभापासून लक्ष घालीत असत; व सन १९३९ सालीं ते बँकेचे चेअरमन म्हणून निवडून आले तेव्हांपासून ते बँकेंत हेंच स्थान विशोभित करीत आहेत. त्यांच्या दीर्घकालीन नेतृत्वाखालीं बँकेची चांगलीच भरभराट झाली असून बँकेची सर्वांगीण वाढ झाली आहे. महाड शहरांतील अनेक संस्थांशीं त्यांचा संबंध आला आहे. सध्यां ते येथील सूतिकागृहाचे कार्याध्यक्ष आहेत. महाडच्या कर्वे-वाचनालयाचेहि ते बरेच वर्षे अध्यक्ष होते.

श्री. अण्णासाहेबांचा स्वभाव अत्यंत गोड व मनमिळाऊ असून त्यांचें बोलणेंहि गोड असतें. त्यांच्या अंगच्या ह्या गुणांमुळें ते सर्व संस्थांत आणि शहरांत सर्वांना प्रिय झाले असून, त्यांच्या शब्दास सर्वत्र फार मान आहे. त्यांचा मित्रपरिवार मोठा असून तो समाजांतील सर्व पातळीवरील लोकांत आहे. 'अजातशत्रु' असें जर त्यांना विशेषण लाविलें तर तें वस्तुस्थितिदर्शकच होईल.

---

टेलिफोन नं. २२४८३.

# पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,
लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या..........

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत राहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षे | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

वा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा
शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस: चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः-युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू:-०.५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक:-३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष-४ टक्के, २ वर्षे-४.२५ टक्के, ३ वर्षे-४.५० टक्के, ४ वर्षे-४.७५ टक्के, ५ वर्षे-५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रक्कम अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपल्सरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा-विस्तार

शाखा-१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७ बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५००,००० |
| ठेवी | रु. | तीन कोटी |
| खेळतें भांडवल | रु. | सव्वातीन कोटीहून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

### खाजगी मालकीच्या तेल कंपन्यांचें उत्पादन

भारत सरकारच्या खाणी व इंधन खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं खाजगी मालकीच्या तेल कंपन्यांचा विस्तार करून देण्याबाबतच्या सरकारी धोरणाचें स्पष्टीकरण केलें आहे. ह्या बाबतींत बोलतांना ते म्हणाले कीं, खाजगी मालकीच्या तेलाच्या कारखान्यांची सध्यांची उत्पादनक्षमता वाढवून देण्याचा विचार सरकार फक्त दोन अटींवरच करूं शकेल. त्या अशा कीं, ह्या कंपन्यांनीं अशुद्ध तेलाचा पुरवठा सध्यापेक्षा कमी भावानें केला पाहिजे आणि विस्तारासाठीं लागणारा खर्च रुपयांत घेण्याची तयारी दाखविली पाहिजे. ह्या दोन अटी मान्य करण्यांत आल्या तर ह्या कारखान्यांची सध्यांची उत्पादनक्षमता दुपटीपर्यंत वाढवून देण्याचा विचार सरकार अवश्य करील, एरव्हीं मात्र नाहीं. भारतांत पेट्रोल व तज्जन्य पदार्थ ह्यांची मागणी एकसारखी वाढत चालली आहे. ही मागणी भागविण्यासाठीं सार्वजनिक मालकीच्या तेलशुद्धीच्या कारखान्यांचीं उत्पादनक्षमता वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येणार आहेत. नूनमति, बरौनी व कोयाली ह्या ठिकाणीं सार्वजनिक मालकीचे तेलशुद्धीचे कारखाने आहेत अगर काढण्यांत येत आहेत. त्याशिवाय इंडियन ऑइल कंपनीच्या मार्फत रुपयाच्या चलनांत किंमत देऊन अधिक तेलाची आयात करण्याचा सरकारचा विचार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस १·७ कोटी टन तेलाची मागणी येईल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. पण हा अंदाज जळणीच्या तेलाची अनिर्बंध आयात केली जाईल, ह्या विश्वासावर आधारलेला आहे. तेल सल्लागार समितीनें जळणाच्या तेलाच्या मागणीचा अंदाज ४० लाख टनांपर्यंत केलेला असला, तरी परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें आयातीवर बंधनें घालावीं लागतील.

### मौंट ब्लॉक शिखराखालून जाणारा बोगदा

सप्टेंबरच्या १५ तारखेला युरोपमधील अत्युच्च पर्वताच्या पोटांतून जाणाऱ्या मोठ्या बोगद्याचें औपचारिक रीत्या उद्घाटन करण्यांत आलें. हा बोगदा मौंट ब्लॉंक ह्या शिखराखालून पोखरण्यांत आलेला असून त्याची लांबी ११·६ किलोमीटर आहे. बोगदा वाहतुकीसाठीं खुला होण्यास अद्याप २ वर्षे लागतील. फ्रान्स व इटली ह्यांना जोडणारा हा बोगदा तयार होण्यास ४५ महिने लागेल. तो खणतांना बरेंच अवघड काम करावें लागलें. ह्या बोगद्यामुळें फ्रान्स, इटली व स्वित्झरलंड ह्यांच्यांतील प्रमुख शहरांतील अंतर बरेंच कमी होईल. विशेषतः हिवाळ्यांत बोगदा अतिशय उपयुक्त ठरेल. कारण, हिवाळ्यांत आल्प्स पर्वतामधून जाणारे सर्व घाट बर्फामुळें प्रवास करण्यास धोक्याचे असतात. मोटारींतून प्रवास करणारांची बोगद्यामुळे फार सोय झाली आहे.

### बहुपत्नीकत्वाच्या चालीवर निर्बंध

इजिप्तच्या सरकारनें विवाहासंबंधाचा एक नवा कायदा प्रसिद्ध केला आहे. संकल्पित कायद्याप्रमाणें कोणत्याहि पुरुषाला पहिली पत्नी जिवंत असतांना कोर्टाच्या परवानगीशिवाय दुसरी पत्नी करतां येणार नाहीं. कायम स्वरूपाच्या आजारामुळें वैवाहिक सुख मिळत नाहीं असें सिद्ध केल्याशिवाय कोर्ट परवानगी देणार नाहीं. स्वभावभेद अगर त्याग ह्या कारणासाठींहि दुसरा विवाह करतां येईल. इजिप्तमधील लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या शहरांतून आहे. कुराणाप्रमाणें चार बायका करण्याची परवानगी असली तरी शहरांतून एकापेक्षा अधिक बायका असलेले लोक आतां तुरळकच राहिले आहेत. ग्रामीण भागांत मात्र आर्थिक दृष्ट्या परवडत असेल तर एकापेक्षा अधिक बायका करण्याची पद्धत आहे.

### नासिक जि. म. सहकारी बँकेची पंचवटी शाखा

पंचवटी, नासिक या ३१ व्या शाखेचें उद्घाटन महात्मा गांधी जयंतीच्या शुभदिनीं मंगळवार दि. २ ऑक्टोबर, १९६२ रोजीं सायंकाळीं ठीक ५ वाजतां नामदार श्री. स. गो. बर्वे, अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शुभहस्तें होणार आहे.

### दि राहुरी सह. साखर कारखाना लि. श्रीशिवाजीनगर.

कारखान्याचा सन १९६२–६३ चा सहावा हंगाम लवकरच सुरू होणार आहे. त्याकरितां कारखान्याचा बॉयलरमध्यें अग्नि पेटविण्याचा पूजासमारंभ मा. बाबूराव बापुजी तनपुरे, चेअरमन दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि., यांचे शुभहस्तें सोमवार दिनांक १–१०–६२ रोजीं सकाळीं ठीक ११–३० वाजतां समारंभपूर्वक होणार आहे.

### दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

खालील ९ डायरेक्टर बिनविरोध निवडून आले आहेत.

(१) श्री. विठ्ठलराव नागोजीराव मिसाळ
(२) श्री. गोविंदराव मेघोजीराव दळवी
(३) श्री. अर्जुनराव गोविंदराव घोरपडे
(४) श्री. नारायणराव व्यंकोजीराव भातकांडे
(५) श्री. सिद्दापा फकिरप्पा कामुले
(६) श्री. शिवाजीराव यल्लापा काकतकर
(७) श्री. रघुनाथराव रामचंद्रराव शिंदे
(८) श्री. रामचंद्रराव गुंडोजीराव तासिलदार
(९) श्री. भरमा बैजू जाधव.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४–७५. ३८३११.

: विभागीय कचेरी : महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.


| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ८७ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ०५ लाख |
| ठेवी | ... | १५ कोटी ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६१ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, चिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक

## जमखंडी तालुक्याचें शक्तिस्थान



श्री. श्रीशैलाप्पा मल्लाप्पा अथणी

जमखंडीच्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन श्री. श्रीशैलाप्पा मल्लाप्पा अथणी हे जमखंडी तालुक्याचें शक्तिस्थान मानले जातात. त्यांचा जन्म २-५-१९१६ रोजीं झाला. अथणींचें घराणें हें जमखंडीचें सधन घराणें म्हणून मानलें जातें. घराण्याचा धंदा विणकामाचा असला तरी श्री. अथणी व त्यांचे वडील बंधु यांचें जमखंडी येथें कापडदुकान आहे. १९२८ त प्राथमिक शिक्षण संपवून ते जमखंडीच्या परशुरामभाऊ हायस्कुलांत दाखल झाले. परंतु, घराण्याच्या व्यवसायांत विशेष लक्ष घालणें भाग पडल्यानें त्यांना हायस्कूल-शिक्षण मध्येंच सोडावें लागलें.

व्यवसायांत पडल्यावर हळूहळू ते जमखंडी संस्थान प्रजापरिषदेच्या कार्याकडे लक्ष देऊं लागले, आणि लवकरच येथील सार्वजनिक कार्यकर्त्यांत त्यांना मानाचें स्थान मिळूं लागलें. येथील नगरवाचनालयाच्या व्यवस्थापक कमिटीवर त्यांची निवडणूक झाली. पाठोपाठ प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीवरहि त्यांना घेण्यांत आले. कै. साबडे यांच्या निधनानतर प्रजापरिषदेचे सेक्रेटरी म्हणून ते काम पाहूं लागले. संस्थानच्या विलीनीकरणानंतर तालुका कॉंग्रेस कमिटीचें सेक्रेटरीपद त्यांचेकडे आलें. आतां तर या भागांतील कॉंग्रेसचे ते एकमेव पुढारी गणले जातात.

जमखंडीचे राजकीय पुढारी म्हणून बाहेरील जगाला श्री. जत्तींचें नांव माहीत झालेलें असले, तरी श्री. जत्तींच्या मागील खरी शक्ति व बळ म्हणजे श्रीशैलाप्पा अथणीच होत याबद्दल या भागांत कोणालाहि शंका नाहीं. श्री अथणींचें हें बहुमोल ऋण श्री. जत्ती यांनीं अनेक वेळां जाहीर सभांतून कृतज्ञतापूर्वक मान्य केलेलें आहे.

जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर त्यांची प्रथम निवड झाली ता. ३१-१०-४३ रोजीं. त्या वेळीं सदर बँक दि जमखंडी स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक म्हणून काम करीत होती. ता. १८-१२-४४ रोजीं ते या बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहूं लागले. पुढें सदर बँकेचें अर्बन बँकेंत रूपांतर होईपावेतों म्हणजे ता. २७-२-५१ पर्यंत ते मॅनेजिंग डायरेक्टर म्हणूनच काम पाहात होते. त्यानंतर ता. २७-२-५१ पासून आजपर्यंत अर्बन बँकेचे चेअरमन म्हणून काम पाहात आहेत. या अवधींत अर्बन बँकेनें स्वतःचे उपयोगासाठीं इमारत खरेदी केली, सेफ डिपॉझिट् व्हॉल्टची बांधणी केली, मॅनेजर यांचें निवासस्थान बांधविलें आणि आतां मार्केट यार्डातील तीन प्लॉट्सवर स्वतःच्या मालकीची गोडाउन्स बांधण्यांत येत आहेत. बँक स्थापन होऊन अवघीं बावीस वर्षे झालीं आहेत! या अल्पावधींतील तिच्या यशाला त्यांचेंच नेतृत्व कारणीभूत आहे. नोकरवर्गावर योग्य तो विश्वास टाकून त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ न करतां बँकेचा उत्तरोत्तर उत्कर्ष साधण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे.

येथील ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटीचे चेअरमन म्हणून ते अलीकडे दोन वर्षें काम पाहात असून, मार्केट यार्डाची शोभा या अवधींत ज्या विलक्षण रीतीनें वाढली ती पाहिली म्हणजे त्यांची कर्तबगारी व रचनाकौशल्य यांची साक्ष पटल्याशिवाय राहात नाहीं.

आतां विजापुरास निघणाऱ्या सहकारी सुताचे गिरणीवर नेमण्यांत आलेल्या सरकारनियुक्त व्यवस्थापक कमिटींतहि त्यांचा समावेश करण्यांत आला असून, त्यांच्या आजवरच्या विविध क्षेत्रांतील अनुभवाचा फायदा सहकारी गिरणीच्या उत्कर्षास कारणीभूत झाल्याखेरीज राहणार नाहीं.

त्यांचा सरळ व मनमिळाऊ स्वभाव, लोकहिततत्परता, न्यायप्रियता, या गुणांना सरकारमान्यता देण्यासाठींच जणू काय १९५४ सालापासून त्यांना सरकारांतून ऑनररी मॅजिस्ट्रेटचा हुद्दा देण्यांत आला आहे. तालुक्यांतील त्यांची लोकप्रियता तर अद्वितीय आहेच. त्यावरच सरकारनें हा हुद्दा देऊन आपलें शिक्कामोर्तब केलें आहे असेंच म्हणावें लागेल.

या एवढ्या सार्वजनिक व्यापांतूनहि आपलें आध्यात्मिक कल्याण साधण्याकडे त्यांचें दुर्लक्ष होत नाहीं, हें विशेष! दिवसांतून कांहीं निश्चित काळ ते नियमितपणें नामजपसाधनेंत घालवितात. इंचगेरीच्या श्री. उमदीकर संप्रदायांतील स. स. गणपतराव महाराज या सत्पुरुषाकडून त्यांनीं नाम घेतलें असून त्याचा जप ते नियमितपणें करीत असतात. भौतिकदृष्ट्या त्यांचें जीवन यशस्वी झालें आहेच, त्यांचें आध्यात्मिक जीवनहि यशस्वी व्हावें असेंच कोणीहि इच्छील!!

---

### अपंग शस्त्रवैद्याचें कौशल्य

न्यूयार्क विद्यापीठाच्या वैद्यकीय शाखेंत डॉ. मेरी व्हरेगीज ह्या शिक्षण घेत आहेत. त्या स्वतः अपंग असल्यामुळें सर्व शस्त्रक्रिया खुर्चीवर बसूनच करतात. त्यांचें वय ३७ असून त्या मूळच्या केरळमधील आहेत. १९५४ सालीं वेलोर येथें वैद्यकीय शिक्षण घेत असतांना त्या मोटारीच्या अपघातांत सांपडल्या. तेव्हांपासून त्यांचें कंबरेखालचें शरीर संवेदनाक्षम राहिलेलें नाहीं. त्यांना पायांची हालचालहि करतां येत नाहीं. अपघात झाल्यावरहि कोठलेंहि काम करतां येण्याची पात्रता स्वतःपाशीं राहिलेली नाही अशी त्यांची कल्पना झाली होती. परंतु नंतर त्यांनीं धीरानें प्रयत्न करून शस्त्रक्रियेंत प्रावीण्य मिळविलें. प्रसूतिशास्त्र हा त्यांचा खास विषय आहे.

---

### मध्यप्रदेशांत खताचा कारखाना

मध्यप्रदेशांतील एका सोयीच्या जागीं खताचा कारखाना काढण्याची तयारी तांतडीनें करण्यांत यावी, असा आदेश भारत-सरकारनें फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिआला दिला आहे. सध्यां भारतांत खताचे तीन कारखाने काढण्याचें काम चालू आहे. त्यांपैकीं एक मुंबईजवळ आहे. दुसरा आसामांत आहे आणि तिसरा उत्तर-प्रदेशांत आहे. मध्यप्रदेशांतील कारखान्यांत दरसाल १० हजार टन नत्रयुक्त खतें तयार करण्यांत येतील.

### बँकांच्या चेक्समध्यें एकवाक्यता

सर्व बँकांच्या चेक्सचे व ड्राफ्टचे आकार सारखे असावेत, ह्या दृष्टीनें खालीलप्रमाणें ते ठरविण्यांत आले आहेत :—

मोटा आकार—१९ सें. मी. × १० सें. मी.

लहान आकार—१५ सें. मी. × ७·५ सें. मी.

चेक आणि ड्राफ्ट ह्यांवरील छापील मजकुराचा नमुनाहि निश्चित करण्यांत आला आहे. चेकच्या माथ्यावर गिन्हाइकाचें नांव ह्यापुढें छापलेलें चालणार नाहीं; तें नांव वाटलें तर डाव्या बाजूला किंवा खालच्या बाजूला छापायला हरकत नाहीं.

डिव्हिडंड वॉरंटस्, रिफंड ऑर्डर्स आणि पेमेंट ऑर्डर्स ह्यांचाहि आकार चेकच्या आकाराप्रमाणेंच राहील. प्रत्येक बँकेला एक कोड नंबर दिला जाईल व तो ठळकपणें छापला जाईल.

### फक्त ५० हजार नव्या नौकऱ्या निर्माण झाल्या

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री श्री. पी. सी. सेन उद्योगविनिमय संघटनेच्या सल्लागार समितिपुढें बोलतांना म्हणाले कीं, पश्चिम बंगालमध्यें दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या करण्यांत आल्या असल्या तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या ५०,००० नव्या नौकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत. मोठे उद्योगधंदे वाढले पण त्या मानानें रोजगारी वाढली नाहीं. त्यासाठीं ग्रामीण भागांत छोटे उद्योगधंदे काढण्यांत आले पाहिजेत.

### हातमागी कापडाची निर्यात घटली

सन १९५२ मध्यें एकूण २० कोटी रुपये किंमतीच्या हातमागी सुती कापडाची निर्यात झाली होती; परंतु १९५६ व १९६१ मध्यें हा आंकडा अनुक्रमें ८·७ व ४·८ कोटी रुपयांवर आला आहे. परकीय देशांनी या मालाच्या आयातीवर निर्बंध घातल्यानें तसेंच चीन व जपानमधील स्वस्त अशा गिरणी कापडाशीं स्पर्धा करावी लागल्यानें ही घट झाली आहे.

### भारतामधील नद-नद्या जोडण्याचें स्वप्न

डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर ह्यांनीं एका तांत्रिक शिक्षण-संस्थेच्या विद्यार्थ्यांपुढें भाषण करतांना असें सांगितलें कीं, भारतामधील लोकांना आध्यात्माचेंच फक्त आकर्षण आहे; यंत्रविद्येचें नाहीं ही गोष्ट खरी नाहीं. हजारों वर्षांपूर्वी स्थापत्यशास्त्रांतील अनेक मोठीं कामें भारतांत झालेलीं आहेत. उत्तर-भारतामधील गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, इत्यादि नद-नद्या दक्षिण भारतामधील कृष्णा, गोदावरी, कावेरी, ह्यांना जोडण्यांत याव्या अशी कल्पना त्यांनीं सुचविली. त्यांच्या मतानें असें करण्यांत आलें तर वाहातुकीच्या बाबतींत सध्यां भासणाऱ्या अडचणी तर दूर होतीलच; पण वाहातूक स्वस्तहि होईल. त्याशिवाय त्यामुळें रशियांतल्याप्रमाणें ग्रामीण भागांत उद्योगधंदे काढण्यासहि साह्य होईल.

### कापड तुंबून राहिलें


अहमदाबादमधील गिरण्यांमधून १ लाख गाठी सुती कापड मागणीच्या अभावीं तुंबून राहिल्याच्या वार्ता आहेत. ह्या कापडाची किंमत १० कोटी रुपये होईल. सप्टेंबर महिनाअखेर ह्या कापडांत आणखी भर पडलेली असेल. कापडाची किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानांतून कापडाची किंमत १० टक्क्यांनीं उतरविण्यांत यावी असा आदेश टॅरिफ कमिशनकडून देण्याच्या अफवा उठल्या; त्यामुळें मागणी मंदावली असें म्हणतात.

**६०० खेड्यांना पिण्याचें पाणी**—महाराष्ट्रांतील ६०० खेड्यांना नळाच्या साह्यानें पिण्याचें पाणी पुरविण्याच्या एका योजनेचा राज्य सरकार विचार करीत आहे. ह्यापैकी ४५० खेडीं अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांतील असून १५० कुलाबा व ठाणे जिल्ह्यांतील आहेत. ह्या भागांतील विहिरींचें पाणी खारें अगर मचूळ असतें. योजनेच्या पूर्तीसाठी ५ कोटी रुपये खर्च येईल.

**सिमेंटची प्रचंड गिरणी**—लेनिनग्रॅड येथील एका यांत्रिक कारखान्यांत जगांतील सर्वांत मोठी सिमेंटची गिरणी तयार करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत ५ मीटर व्यासाच्या व १८५ मीटर लांबीच्या फिरत्या भट्ट्या वापरण्यांत येतील व त्यांच्या साह्यानें दरसाल २४ लाख टन सिमेंट तयार करण्यांत येईल. येत्या कांहीं वर्षांत रशिआंत अशा १६ गिरण्या उभारण्यांत येणार आहेत.

**सगळ्यांत स्वस्त पाहुणा**—आचार्य विनोबाजी भावे ह्यांनीं पाकिस्तानांत १६ दिवसांची पद्यात्रा केली. पूर्व पाकिस्तान सरकारच्या मुख्य चिटनिसांच्या मतानें ह्या पाहुण्यासाठी सरकारला अत्यल्प खर्च आला. आचार्य भावे स्थानिक अधिकाऱ्याकडून थोडेसें गाईचें दूधच फक्त घेत असत. त्याशिवाय मध व उकडलेली भाजी ते घेत असत.

**भुज येथें रेडिओकेंद्र** — कच्छमध्यें भुज येथें रेडिओ प्रक्षेपण केंद्र उभारण्याच्या प्राथमिक कामाला प्रारंभ करण्यांत आला आहे. आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांची एक तुकडी जागेची निवड करण्यासाठी भुजला येऊन गेली. भुजच्या केंद्राची शक्ति १० किलोवॅट असेल. राजकोट येथील रेडिओ केंद्राची शक्ति १ किलोवॅट होती, ती आतां २ किलोवॅट करण्यांत आली आहे.



माद आणि प्रतिमाद

जनतेच्या सोयीखातर, हाती घेतलेल्या अनेक विकासकार्यांना खर्च भागण्याकरितां वेळोवेळीं सरकारतर्फे सादर करण्यांत येणारे कर्जरोखे खरिदण्यांत बँका नेहमीं पुढाकार घेतात. या करितां बँकांना आपल्या ठेवींची जरुरी आहे. आपल्याकडून आलेल्या अधिकाधिक ठेवींमुळें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

अशा नव्हेची मदत करण्यांत नेहमींच अग्रभागी राहूं शकेल.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें - २ तार : MAHABANK

महाराष्ट्रांत व इतरत्र सर्वत्र बँकेच्या शाखा आहेत.

alco M.B. 6

### चोरटें सोनें आणि परदेशीय चलन

भारताच्या उपमंत्री श्रीमती तारकेश्वरी सिन्हा मुंबई येथें बोलतांना म्हणाल्या कीं परदेशांना माल निर्यात करून भारत बहुमोल असें परदेशीय चलन मिळवीत असतो; परंतु त्यापैकी ५० टक्के परदेशीय चलन सोन्याच्या चोरट्या आयातीपायी देशाच्या पदरांत पडत नाहीं. देशाचें हें नुकसान लक्षांत घेऊन अत्यंत कडक उपाय योजून सोन्याची चोरटी आयात थांबविण्याचा प्रयत्न करण्याचा सरकारचा निर्धार आहे. त्याचबरोबर देशांतील सोन्याच्या साठ्याचा उपयोग करून घेण्याचे मार्गहि सरकार शोधून काढणार आहे. जरूर पडल्यास सरकार कांहीं नियंत्रणेंहि जाहीर करण्यास कमी करणार नाहीं. तथापि व्यापाऱ्यांनीं निर्बंधांची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. सर्वंकष बंधनें आणि मोक्याचीं नियंत्रणें ह्यामधील फरक त्यांनीं लक्षांत ठेवावा.

### शांतता राखण्याचा सर्वांत स्वस्त उपाय

अमेरिकेनें परदेशांना द्यावयाच्या मदतीबाबत जो कार्यक्रम आखाला आहे त्यांत अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहानें कपात सुचविली आहे. प्रे. केनेडी ह्यांनीं अमेरिकेला व जगांतील कम्युनिस्ट सोडून इतर देशांना असें आवाहान केलें आहे कीं, अविकसित देशांना देण्यांत यावयाची आर्थिक मदत पूर्वीप्रमाणेंच चालू ठेवण्यांत यावी. प्रे. केनेडी म्हणाले कीं, ह्या देशांना मदत देण्याचे थांबविल्यास तेथें परदेशप्रेरित अंतर्गत उठाव होण्याचा संभव आहे. ह्याच परिस्थितींत कम्युनिस्ट राजवट स्थापन होण्याचा धोका असतो. ह्या देशांना त्यांचें स्वातंत्र्य रक्षण करण्याच्या कामीं मदत करणें हा कम्युनिझमपासून त्यांचा बचाव करण्याचा सर्वांत स्वस्त व सोपा उपाय आहे.

### नगर शहराला कोयनेची वीज

महाराष्ट्र-स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डानें नगरच्या नगरपालिकेला असें कळविलें आहे कीं १९६४–६५ पासून नगर शहराला कोयना नदीच्या धरणावर उत्पन्न करण्यांत आलेली स्वस्त वीज पुरविण्यांत येईल. सध्यां नगरला नगर-वीज-पुरवठा कंपनीतर्फे वीज पुरविण्यांत येते. ह्या कंपनीची मालमत्ता बोर्डानें विकत घ्यावी अशी सूचना नगरपालिकेतर्फे करण्यांत आली होती. ह्या सुचनेचाहि विचार बोर्ड करीत असून त्यासंबंधीच्या वाटाघाटी चालू आहेत.

### अन्नधान्याच्या किंमती स्थिर राखण्याचा उपाय

अखिल भारतीय अन्नधान्य व्यापारी संघटनेच्या मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष श्री. हाशम प्रेमजी मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं, अन्नधान्याच्या वाहातुकीवर व त्यांच्या बटवड्यांवर त्रासदायक निर्बंध घालून त्याच्या किंमती स्थिर राखण्याच्या प्रयत्नांत यश येणार नाहीं. भारतांमधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यांत येणाऱ्या यशावरच किंमती स्थिर राखण्याच्या प्रयत्नांचें भवितव्य अवलंबून आहे. गेल्या कांहीं वर्षांत संपूर्ण नियंत्रणापासून अंशतः नियंत्रणापर्यंत सर्व प्रकारचे उपाय योजून पाहाण्यांत आलेले आहेत. गेल्या पंधरा वर्षांचा अनुभव असा आहे कीं, विनियंत्रित अर्थव्यवस्थेचा धान्याच्या उत्पादनावर चांगला परिणाम झाला आहे. ह्या पद्धतीमुळें शेतकऱ्याला आपल्या जमिनींतील पीक वाढविण्यास चांगलें उत्तेजन मिळेल व मिळतहि आहे. आतां देशांतील अन्नधान्याच्या उत्पादनानें उच्चांक गाठला असून ते ८ कोटी टनापर्यंत वाढलेलें आहे.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे कि. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज कि. रु. ३=००

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

सरदारगृह

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

दि बेळगांव बँक लि.

रजिस्टर्ड व मुख्य कचेरी : बेळगांव

स्थापना : १९३० शेड्यूल्ड बँक

ह्या बँकेच्या व्यवहारांत सतत वाढ होत आहे. सुरक्षितता, निश्चिति आणि सेवा ह्यांची ती निदर्शक आहे; त्यासाठी तिची सर्वत्र ख्याति आहे.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ८,०८,००० |
| एकूण गंगाजळी | ... | रु. ५,५०,००० |
| ठेवी | ... | रु. १,०४,००,००० |
| एकूण जिंदगी | ... | रु. १,१७,००,०००वर |

म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत मिळून २८ शाखांचा विस्तार

आपल्या बँकिंगविषयक कोणत्याहि कामासाठी आमच्या कोणत्याहि कचेरीस भेट द्या; प्रत्येक कामाकडे तत्परतेनें लक्ष दिलें जाईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००


बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर






थेंबें थेंबें तळें साचे....

उसाच्या चिपाडांत शिल्लक राहिलेल्या शेवटल्या
रसाच्या थेंबांचें सुद्धा तळें होऊं शकतें
आणि त्यांतून तुमचा अधिक फायदा होऊं शकतो,
म्हणूनच उसांतून शेवटल्या थेंबापर्यंत रस
काढून घेणारे 'किर्लोस्कर' उसाचे चरक वापरून
तुमचा पुरेपूर फायदा करून घ्या
वर्षानुवर्षं बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेच
त्यांची रचना केलेली असते
५, १० व १५ हॉर्सपॉवरचे आणि २, ४ व ६
बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या
आकारांतील चरक तयार होतात.

किर्लोस्कर

पॉवरवर चालणारा उसाचा चरक



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

किर्लोस्करवाडी, जि. सांगली.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434- Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ

ऑक्टोबर
१९६२

दिवाळी
विशेषांक




SMALL SAVINGS SERVE THE STATE & YOUR FAMILY

पोस्ट ऑफिस
सेव्हिंग्ज देणगी कूपनें

शुभ प्रसंगीं
द्यावयाची शुभ भेट

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज देणगी कूपनें म्हणजे मोलाची देणगी आहे. उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाणारी अशी ही एकमेव देणगी आहे. ५, १०, ५०, १०० आणि १००० रुपये किंमतीचीं हीं कुपनें पोस्ट ऑफिसांत मिळतात आणि नंतर हीं कुपनें देऊन त्याबद्दल १२ वर्षे मुदतीचीं राष्ट्रीय योजना बचत सर्टिफिकेटें घेतां येतात. या सर्टिफिकेटांवर प्राप्तिकरमुक्त आणि आकर्षक दरानें व्याज मिळतें.

महाराष्ट्र सरकारच्या अल्पबचत संचालनालयातर्फे प्रकाशित

# प्रगति ! ...एक चिंतन !

★ आमच्या बँकेच्या गेल्या तीन वर्षांतील स्पृहणीय प्रगतीचें चिंतन ★

| वर्ष | वसूल भाग मांडवल | खेळतें मांडवल | ठेवी | निधि |
|---|---|---|---|---|
| १९५९–६० | २४·८७ लाख | ४६३·५४ लाख | ३२३·९६ लाख | १६·१२ लाख |
| १९६०–६१ | ४५·८२ लाख | ६२८·९७ लाख | ३३२·१३ लाख | १८·९१ लाख |
| १९६१–६२ | ५२·८४ लाख | ७३१·६८ लाख | ३६८·५१ लाख | २२·७८ लाख |

★ याशिवाय वाढत्या कार्यक्षम शाखा आणि सुरक्षित ठेववरें. ★

याच आर्थिक प्रगतीबरोबर सहकाराचा उत्कर्ष गांठणारी
पुणें जिल्ह्यांतील एकमेव

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें

——लक्ष्मी पथ——

**शि. म. काळे,** उपाध्यक्ष, पुणें जिल्हा परिषद.
अध्यक्ष.

**वा. ग. अळतेकर,** बी. कॉम.
कार्यकारी संचालक.



॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रकटी ।
तैसी सद्बुद्धि हे थेकुटी । म्हणो नये — श्रीज्ञानेश्वरी

****************

अंतरीं सद्भावना ठेवून कार्यास प्रारंभ केला कीं यशःप्राप्ति ठेवलेलीच. कै. आगाशे यांची कळकळीची विनंती व अविरत श्रम व मध्यम वर्गानें त्यांना दिलेलें सहकार्य यामुळें हा कारखाना यशस्वी होऊन मध्यम वर्गीयांचें भूषण झाला आहे. कै. आगाशे यांचेंच धोरण पुढें चालवून संचालक मंडळ कंपनीचें कार्य नेटानें पुढें चालवीत आहे.

************

## नवीन हंगाम नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत सुरू होईल

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व
नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !

**के. त्र्यं. चांफेकर,** बी. ई., ए. एम्. आय्. ई.
मॅनेजर.

**शं. ल. लिमये,** बी. एस्सी., एल्एल्. बी.
अध्यक्ष.

# अर्थ

दिवाळी अंक

ऑक्टोबर १९६२





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस व वाचकांस सुखाचें जावो !**

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृ. |
|---|---|---|---|
| १ सहकारी चळवळीचें यश मोजण्याचा खरा दंडक | ४ | १० ब्रिटनचा सामायिक बाजारपेठेंत प्रवेश ... | २५ |
| २ संकल्प आणि सिद्धि ह्यांतील तफावत ... | ७ | ११ पश्चिम जर्मनीपुढील शेतीचे प्रश्न ... ... | २८ |
| ३ भारताच्या निर्यात व्यापाराची निराशाजनक परिस्थिति | ९ | १२ सांठवणीच्या गुदामांची योजना ... ... | ३१ |
| ४ कंपन्यांच्या कारभारांत डायरेक्टरांचें स्थान ... | ११ | १३ पूर्व युरोपांतील देशांशीं व्यापार ... ... | ३४ |
| ५ बँकेचा चेअरमन कसा असावा ! ... | १६ | १४ सरकारी कारभारांतील भ्रष्टाचार ... ... | ३५ |
| ६ कर्जें देतांना काय पाहाणार ! ... ... | १७ | १५ शेतकऱ्यांच्या औद्योगिक विकासाचे प्रणेते ... | ३७ |
| ७ रशियांतील बँकिंगच्या पद्धतीचे कांहीं विशेष ... | १९ | १६ भारतांतील बडे परदेशीय ... ... | ३९ |
| ८ इं. फायनान्स कॉर्पोरेशनची कामगिरी ... | २२ | १७ हिंदुस्थान मशीन टूल्सचा घड्याळांचा कारखाना ... | ४१ |
| ९ सहकारी संस्था आणि बिनामी कर्जें ... | २४ | १८ रशिया–चीन व्यापारांत झालेली घट ... ... | ४३ |


**"अर्था"चा ह्यापुढील अंक, नेहेमींप्रमाणेंच्या एका सुटीनंतर, बुधवार दि. २१ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.**


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१०० 

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | व्याजाचा दर |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## रेखा फर्निशर्स


३२४, सदाशिव, पुणें.

( टेलिफोन नं. ५६५१३ )

उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध;
घरांची व दुकानांची शोभा वाढविणें
हें आमचें वैशिष्ट्य आहे.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

# सहकारी चळवळीचें यश मोजण्याचा खरा दंडक

## दुर्बल ग्रामीण घटकांच्या हिताची जपणूक

### श्री. वैकुंठभाई मेहतांचा समयोचित इषारा

देशांतील सहकारी संस्थांपुढील ज्या प्रश्नांवर तांतडीनें विचार करणें आवश्यक होतें त्याचा सांगोपांग विचार करण्यासाठी अनेक समित्या, अभ्यास मंडळें, वर्किंग ग्रुप्स व एक स्टॅट्यूटरी कमिशन नेमण्यांत आलें. या समित्या एकतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें, राष्ट्रीय सहकार विकास व वखार मंडळानें, नियोजन मंडळानें किंवा भारत सरकारच्या समाजविकास आणि सहकार मंत्रालयानें नेमल्या होत्या. वर्गीकृत विभाग आणि वर्गीकृत समाज-मंडळ भारतीय राज्यघटनेच्या ३३९ कलमानुसार नेमलें होतें. या समित्यांनीं विचारांत घेतलेल्या प्रश्नांमध्यें सहकारी कर्जपुरवठा, ग्राहक सरकार, सहकारी शेती, सहकारी शिक्षण, नागरी सहकार, सहकारी प्रक्रिया, देखरेख, नियोजनांतर्गत सहकारी धोरण आणि ग्रामीण समाजाच्या दुर्बळ घटकांचें कल्याण, यासारख्या प्रश्नांचा समावेश झाला होता.

प्रसिद्ध झालेल्या अहवालांपैकीं ग्रामीण समाजाच्या दुर्बल विभागाविषयींच्या अहवालाचा खास विचार केला पाहिजे. राज्यघटनेंत राजनीतीचीं मार्गदर्शक तत्त्वें नमूद केलीं आहेत. त्यांत समाजाच्या दुर्बलेतर विभागांच्या शैक्षणिक व आर्थिक गरजांचा खास विचार करणें व सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारची पिळवणूक यांपासून त्यांचें रक्षण करणें ही खास जबाबदारी नमूद केली आहे. भावी काळांत, सहकारी चळवळीचें यश मोजण्याचा दंडक, दुर्बल घटकांचे हितसंबंध यांची जपणूक करून पिळवणुकीचा प्रतिकार करण्यास आपण त्यांना तयार करण्यांत किती यश मिळविलें, हाच ठरणार आहे.

#### साहस-निधीची ( रिस्क फंड ) गरज

श्री. जयप्रकाश नारायण यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यासमंडळानें अनेक महत्त्वाच्या शिफारशी केल्या. त्यांपैकीं कांहीं सहकारी धोरण व आचरण यांच्यावर दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत. सहकारी कर्जपुरवठ्याच्या विशिष्ट विषयावर अभ्यासमंडळानें सहकारी पतपुरवठा समितीच्या शिफारशींना दुजोरा दिला असून अशी शिफारस केली आहे कीं, समितीच्या शिफारशींनुसार सुरू केला जाणारा साहस-निधि ( रिस्क फंड ) स्थापला जावा आणि वाढवावा. ज्यांच्या जमिनी तुटपुंज्या आहेत व ज्यांचीं मागील कर्जें फिटलेलीं नाहींत त्यांनासुद्धां योग्य कारणासाठी कर्जें पुरविण्यास ग्रामीण सोसायट्यांनीं प्रवृत्त व्हावें, यासाठी पुरेसें प्रोत्साहन देण्याचा खास प्रयत्न केला जावा अशीहि शिफारस अभ्यासमंडळानें केली आहे. तथापि, हा क्रम फार वेळ चालू शकणार नाहीं हें अभ्यासमंडळाला मान्य आहे. समितीनें सुचविलेल्या निरनिराळ्या उपाययोजनाद्वारें उत्पन्नांची पातळी वाढविणें हेंच कायमचें उत्तर आहे. शेतीच्या अत्यंत लहान घटकांच्या मालकांनीं सहकारी संयुक्त शेती करणें, जमिनीची धूप थांबविण्याचे उपाय योजणें, जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नांत वाढ करण्यासाठी छोट्या कालवे योजना, त्याच उद्देशानें शेतीमालाची विक्री आणि प्रक्रिया संघटित करणें आणि त्याच उद्देशानें निरनिराळे पूरक आणि दुय्यम धंदे विकसित करणें, हीं तीं साधनें होत.

#### ढेबर कमिशन

श्री. उछंगराय ढेबर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या वर्गीकृत विभाग आणि वर्गीकृत जमाती मंडळाच्या अहवालांत याच स्वरूपाच्या शिफारशी आहेत. धान्य कोठ्या व त्यांचा कारभार वाढविण्याची पद्धति ह्याविषयींची शिफारस महत्त्वाची आहे. महाराष्ट्रांत १९६०–६१अखेर २,३१३धान्य बँका व सोसायट्या होत्या. पैशावर आधारभूत नसलेल्या आदिवासी अर्थजीवनांत या सोसायट्या रोकड कर्जें, ठेवी, भाग भांडवल, वगैरे पद्धतींच्या सामान्य पतपेढ्यांपेक्षा अधिक उपयुक्त ठरल्याचें सांगतात. पण या धान्यकोठ्यांचे कांहीं व्यापक उद्देश असतील तरच त्या आदिवासी अर्थजीवनावर परिणाम घडवूं शकतील. शेतीसाठी आणि घरगुती वापरासाठी लागणारें धान्य आणि सभासदानें काढलेलें पीक यांच्याशीं कर्जाचा संबंध जोडावा लागेल. त्याला शेतीसुधारणेच्या कार्यक्रमाची जोड द्यावी. पूरक उद्योग आणि अरण्यापासून मिळणाऱ्या वस्तूंवरील प्रक्रियेचे उद्योग यांचाहि कार्यक्रमांत अंतर्भाव असावा. जेथें जमिनी खास करारानें किंवा समाईकरीत्या धारण केलेल्या असतील तेथें अशा जमिनी हेंच अंतिम तारण म्हणून स्वीकारावें, असेंहि समितीनें सुचविलें आहे. कर्जाची मर्यादा मात्र कर्जाच्या उद्देशावरून ठरवावी.

#### पतपुरवठा व खरेदी–विक्री यांची सांगड

शेतीविषयक कर्जें, खरेदी आणि विक्री यांच्याशीं जोडलेलीं असलीं म्हणजे कर्जदारांना दिलेल्या कर्जाला एक स्वयंपूर्ण तारण मिळतें. ज्यांना पुरेशी जमीन तारण लावणें शक्य असतें त्यांनाहि हें सोयीचें आहे. या राज्यांत व भारतांत इतरत्रहि आपण जी एकसूत्री कर्जपद्धति ग्रामीण भागांसाठी स्वीकारली आहे. तिचें हें एक आवश्यक अंग आहे. मागील हिशेबी वर्षअखेरीस महाराष्ट्रांत फक्त ३१२ मार्केटिंग सोसायट्या व युनियनस् अस्तित्वांत होत्या. त्यांनीं केलेली एकूण धान्यविक्री २६·५६ कोटी रुपयांची होती. वर्षाअखेर येणें असलेल्या ३३·८५ कोटी रुपयांच्या आंकड्यांशीं तुलना करतां हा आंकडा कांहीं कमी असा नाहीं. पण ज्यांनीं परिस्थितीचा अभ्यास केला आहे त्यांना असें दिसतें कीं, विक्री–धंदा फार थोडा आहे आणि शेतीचीं पूरक साधनें पुरविण्यांतच पुष्कळशी शक्ति खर्च होत आहे. नियंत्रित भावांच्या वस्तूंच्या वाटपाचें काम महत्त्वाचें आहे. पण खरेदी–विक्री सोसायट्या व संघ यांचें मुख्य काम प्राथमिक सोसायट्यांच्या सभासदांच्या मालाची पद्धतशीर विक्री करणें हें आहे. उत्पादकाला त्यानें काढलेल्या पिकासाठी एकतर योग्य किंमत मिळावी आणि त्याच्या उत्पादनाची पातळी वाढावी यासाठी तें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें सभासदांना दिलेल्या कर्जाच्या मदतीनें काढलेल्या पिकांवर सोसायट्यांना कायद्यानें जो ताबा दिला तो प्रत्यक्ष बसविणें हें आहे. हीं कामें परस्परांशीं इतकी निगडित आहेत कीं, त्यांचा दुवा पुन्हां सांधल्याखेरीज त्यापैकी कोणतेंच काम यशस्वी होणार नाहीं.

#### प्रक्रिया उद्योग व बेकारीचा धोका

शेतीपिकांपैकी कांहींची विक्री करण्यापूर्वी त्यांच्यावर प्रक्रिया

करण्यानें विक्रीला सोयीचें होतें. ग्रामीण उत्पन्न वाढविणें आणि उत्पादनासाठी कर्जपुरवठ्याचा प्रवाह चालू ठेवणें यासाठीच नव्हेतर ग्रामीण सहकारी अर्थजीवनाच्या उभारणीसाठीहि सहकारी प्रक्रिया आवश्यक आहे असें नियोजन मंडळाला वाटतें. महाराष्ट्रांत गेल्या वर्षाअखेर ९३ प्रक्रिया संस्था होत्या. सहकारी साखर कारखाने हा वेगळा वर्ग असल्यामुळें त्या वीस साखर कारखान्यांचा समावेश या संख्येंत नाहीं. मुख्य वाढ सरकीविरहित कापूस तयार करणें व त्या कापसाच्या गांठी बांधणें या क्षेत्रांत झाली आहे. भात व तेलबियां या इतर वस्तूहि समाविष्ट आहेत. या क्षेत्रांत सहकारी उपक्रम वाढवावयाचा आपण विचार करूं तेव्हां त्या भागांस चालू असलेल्या हाती प्रक्रिया करण्याच्या उद्योगांवर या विकासाचा काय परिणाम होईल तें ध्यानांत घेणें अवश्य आहे असें मी सुचवितों. ग्रामीण बेकारीचा धोका ध्यानीं घेऊन विशिष्ट हाती प्रक्रिया करण्याच्या उद्योगांतील कामगार बेकार होतील असें कांहीं करूं नये.

### प्रक्रिया संस्थांचा अपुरा वापर

विशेषतः प्रचलित प्रक्रिया संस्थांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर केला जात आहे किंवा नाहीं या प्रश्नाकडेहि पाहिजे तेवढें लक्ष दिलें जात नाहीं. ग्रामीण आणि लघु उद्योगसमितीनें ( कर्वे समिति ) १९५१ सालीं या प्रश्नाबाबत तपास केला असतां असें आढळून आलें कीं, तांदूळ सडण्याच्या गिरण्या आणि तेलघाण्यांची पुष्कळशी उत्पादनशक्ति सर्व देशाचा विचार केला असतां गंजत पडली आहे. पण आपला उद्देश सहकारी पद्धतीनें संघटित झालेल्या शेतीउत्पादकांनीं आपल्या पिकांवरील प्रक्रियाहि सहकारी पद्धतीनें चालवावी असा असल्यामुळें हल्लींच्या प्रक्रिया गिरण्या योग्य भरपाई देवून सहकारी प्रक्रिया संस्थांनीं ताब्यांत घ्याव्या अशी कायद्यानें तरतूद करतां येईल. असा आग्रह आपण धरला पाहिजे.

सध्यां खेडीं व शहरें यांच्या उत्पन्नांत जी विषमता आढळून येते ती कमी करण्यासाठी खेड्यांतील लोकांना निरनिराळ्या व्यवसायांत काम देणें अगत्याचें आहे. तेव्हां सहकारी संस्थांनीं प्रक्रिया धंदे चालविण्यास घेऊनच केवळ भागणार नाहीं तर विभागवारीनें पद्धतशीर योजना आंखाव्या लागतील. रोजच्या उपयोगांतील कांहीं वस्तू ज्या इतके दिवस परदेशांतून आणाव्या लागत किंवा मोठ्या प्रमाणावरील केंद्रित कारखान्यांतच तयार होत, अशा वस्तूंच्या उत्पादनाचे कांहीं लघुद्योग शहरी विभागांत विशेषतः पंजाबमध्यें सुरू झाले आहेत. मात्र हे पुष्कळसे खाजगी मालकीचे आहेत. ग्रामीण महाराष्ट्रांतील विकास जवळजवळ सर्वस्वीं सहकारी पद्धतीचा व्हावा अशी आमची हार्दिक इच्छा आहे. सहकारी साखरकारखाने आणि त्यांनीं जन्मास घातलेले पूरक धंदे यामुळें महाराष्ट्रीय सहकारी कार्यकर्त्यांमध्यें विश्वासाची भावना वाढली आहे. त्यामुळें आतां त्यांनीं सहकारी पद्धतीच्या औद्योगिक विकासाची खुशाल आंखणी करावी. मात्र ती करीत असतांना शेतकरी, उत्पादक, ग्राहक आणि कामगार यांच्या हिताचा मेळ बसविण्याचा निश्चित प्रयत्न त्यांनीं करावा.

ग्रामीण उत्पन्नांची पातळी वाढविण्याच्या दृष्टीनें या योजनांना हंगामी अगर नेहमींच बेकारींत राहणाऱ्यासाठी बिगर–शेती उत्पादक उद्योगांत जादा अगर भरपूर रोजगारी पुरविण्याची तरतूद असावी. जयप्रकाश नारायण समितीनें म्हटल्याप्रमाणें ग्रामीण औद्योगीकरण हें ग्रामीण अर्थकारणाचा चिखलांत रुतलेला गाडा बाहेर काढण्यासाठी तसेंच आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाचें राहणीचें मान सुधारण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. वर्गीकृत विभाग आणि वर्गीकृत जमातमंडळानेंहि त्याच गोष्टीवर भर दिला असून आदिवासी विभागांत तीन प्रकारचे ग्रामीण उद्योग, ग्राहकोपयोगी उद्योग, प्रक्रिया उद्योग आणि हस्तकला कौशल्य उद्योग, हातीं घ्यावा असें सुचविलें आहे. आदिवासी समाजापैकी पुष्कळांचें कौशल्य व वृत्ति सामान्य ग्रामीण जनतेपेक्षा वेगळ्या असतात व त्यांना हस्तकौशल्याची परंपरा असून ती टिकविली पाहिजे. जंगलांतील मालाचा उपयोग करून चालवावयाचे धंदे ग्रामीण आर्थिक परिस्थितीला विशेष अनुकूल ठरतील. विणकरांच्या ६७७ सोसायटया वगळून महाराष्ट्रांत २११७ औद्योगिक सहकारी सोसायटया असल्या तरी त्यापैकी आदिवासी भागांत कांहीं आहेत कीं नाहीं याची शंकाच आहे. हें अगदीं जवळ जवळ कोरें करकरीत असें क्षेत्र आहे.

### जंगलांतील कामगार सोसायट्या

खानदेशांतील अक्राणी महाल व विदर्भाचा कांहीं भाग वगळल्यास महाराष्ट्राच्या आदिवासी प्रदेशांतील शेतीची परिस्थिति कदाचित् इतर ग्रामीण भागापेक्षा वेगळी नसली तरी आदिवासी लोकवस्तीच्या मोठ्या भागाचें जीवन वनप्रदेशाच्या आर्थिक जीवनाशीं गाढ निगडित आहे. तो पुष्कळसा समाज तेथेंच राहातो आणि काम करतो. हें ओळखून श्री. बा. गं. (बाळासाहेब) खेर हे मुख्य मंत्री असतांना त्यांनीं जंगलांत काम करणाऱ्या आदिवासींच्या लोकांस को-ऑपरेटिव्ह सोसायटया स्थापण्यास व जंगलांतील कंत्राटदार आणि सरकारच्या अरण्य खात्याचे कनिष्ठ अधिकारी यांच्याकडून होणारी पिळवणूक टाळण्यास उत्तेजन दिलें. गेल्या पंधरा वर्षांत चळवळीच्या या शाखेचा विकास बराच झाला आहे. या राज्यांत ३० जून १९६१ रोजीं २०४ जंगल कामगार सहकारी सोसायटया होत्या. या सोसायट्यांना आपल्या कामाचें क्षेत्र वाढविण्यास उत्तेजन देण्यांत यावें. अरण्यांतील कामाखेरीज सहकारी सार्वजनिक बांधकाम खात्यांत व इतरत्र कंत्राटीपद्धतीनें सभासदांना काम त्यांच्या मार्फत पुरविलें जावें. सभासदांना समाजशिक्षण देणाऱ्या संस्था म्हणून काम करण्यासहि सोसायट्यांना प्रवृत्त केलें पाहिजे. पंजाब किंवा सौराष्ट्रामध्यें इतर लेबर कॉंट्रॅक्ट सोसायटयांनीं जशी प्रगति केली आहे तशी महाराष्ट्रांत फारशी केलेली नाहीं. सरकारी मदत आणि पुरस्कार उपलब्ध असल्यामुळें सहकारी कार्यकर्त्यांनीं निदान जोरदार ग्रामविकास बांधकाम कार्यक्रमासाठी निवडण्यांत आलेल्या विभागांत तरी लेबर कॉंट्रॅक्ट सोसायटया संघटित कराव्यात.

### शेतीउद्योगांतील उत्पादनवाढीची गरज

मी थोडक्यांत ज्या कांहीं सूचना केल्या आहेत त्या ग्रामीण अर्थजीवनाला बळकटी आणणाऱ्या आहेत. पण शेतीच्या मुख्य उद्योगाच्या भरभराटीवर अर्थजीवनाची मुख्य शक्ति अवलंबून आहे. शेतीविषयक आंकड्यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असें दिसतें कीं सबंध महाराष्ट्राचा विचार करतां उसाखेरीज येथील बहुतेक पिकांची उत्पादनक्षमता कमी आहे म्हणून सहकारी कार्यकर्त्यांनीं आपली सर्व शक्ति उत्पादकतेची पातळी वाढविण्याच्या तसेंच शेतीस योग्य अशी सर्व जमीन पिकाखाली आणण्याच्या कामास लावली पाहिजे. विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांची कल्पना जुन्या मुंबई राज्यांत प्रथम मान्य झाली. भारतांतील इतर ठिकाणचे सहकारी आणि बिनसरकारी क्षेत्रांतील सहकारी कार्यकर्ते विविधोद्देशी ग्रामीण सहकारी संघटनेच्या बाबतींत विचार करूं लागले. त्यापूर्वींच महाराष्ट्रांत मोठ्या आकाराच्या विविध

कार्यकारी सोसायट्या बऱ्याचशा अस्तित्वांत आल्या होत्या. सेवा सोसायटी हें विविध कार्यकारी सोसायट्यांचेंच दुसरें नांव आहे आणि राज्यांतील बहुतेक सोसायट्यांचें रूपांतर आतां सेवा-सोसायट्यांत केलें जात आहे. या रूपांतराचा उद्देश काय व तो कसा साध्य करावयाचा याची कल्पना नसेल तर नामांतरासाठी जी थोडी खटपट करावी लागते तिलाहि अर्थ उरणार नाहीं. लागवडीखाली उपलब्ध असलेल्या सर्व जमिनींचा पूर्ण उपयोग करून घेण्याचा आणि विशिष्ट भागांतील शेतीसाठी जीं साधनें व उपकरणें लागतील तीं पुरवून उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम तयार करून प्रत्येक सेवा सोसायटीनें शेतीची प्रगति व उत्कर्ष यांचें साधन बनलें पाहिजे.

### सहकारी शेतीमुळें अधिक श्रमशक्तीचा वापर

तरी सुद्धां कांहीं सीमारेषेवर शेतकरी अत्यंत लहान आकारच्या जमिनीचे मालक व कुळें राहतीलच. त्यांनीं स्वतः प्रयत्नांची अगदीं पराकाष्ठा केली किंवा त्यांना जास्तींत जास्त मदतहि पुरविली तरी त्यांच्या वैयक्तिक उत्पादनक्षमतेंत अत्यल्पच वाढ होणार. या अत्यल्प वाढीचा दृश्य परिणाम सबंध अर्थजीवनावर अगर संबंधित व्यक्तींवरहि कांहींच दिसून येणार नाहीं. शेतीच्या या छोट्या तुकड्यांपासून जास्तींत जास्त लाभ मिळण्याच्या दृष्टीनें सहकारी पद्धतीची शेती विशेष उपयुक्त ठरणार आहे. ग्रामीण अर्थजीवनाच्या पुनर्रचनेंतील सहकारी शेतीचें स्थान पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत स्पष्टपणें नमूद केलें असलें तरी मागाहून कांहीं शंका, विशेषतः या संघटनेच्या ऐच्छिक स्वरूपाविषयीं निर्माण झाल्या आहेत. श्री. निजलिंगप्पा यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या सहकारी शेतीसंबंधीं अभ्यास-गटाच्या शिफारशी स्वीकारण्यांत आल्यानंतर या शंका दूर व्हाव्यात. आतां जें सर्वसाधारण चित्र दिसतें तें निव्वळ ऐच्छिक सभासदत्व असलेल्या संस्थेचें आहे. जमिनी एकत्र केल्या जातील आणि लागवड सामुदायिकपणें केली जाईल. परंतु विशिष्ट मुदती-नंतर बाहेर पडण्याची मोकळीक राहील व मूळच्या जमीन-धारकाला त्यानें दिलेल्या जमिनीच्या किंमतीच्या प्रमाणांत मोबदला मिळण्यास वाव राहील. महाराष्ट्रांत गेलीं दहापंधरा वर्षें जवळ-जवळ याच धर्तीच्या संयुक्त शेती सहकारी संस्थांना उत्तेजन दिलें जात आहे. या पद्धतीच्या संघटना वाढविण्याची गरज आहे तितकीच त्या संघटित करीत असतांना जमीन सुधारणा व शेती सुधारणा याचा आणि जास्तीची श्रमशक्ति कामीं लावण्यासाठी दुय्यम धंदे आणि कुटीरोद्योग सुरू करण्याचा व पुनरुज्जीवित करण्याचा कार्यक्रमहि हातीं घेणें अवश्य आहे.

आजच्या नियोजनाच्या युगांत सहकारी चळवळीचा विकास कार्यक्रम योजनाबद्ध रीतीनें पार पाडण्यासाठी आजपर्यंत सरकारनें ज्याप्रमाणें वेगवेगळ्या पातळीवर सहकार्य दिलें त्याचप्रमाणें जिल्हा परिषद् व पंचायत समिति यांनीं सहकारी चळवळीची योग्य घडण बनविण्याचे कामीं व योजलेला कार्यक्रम प्रत्यक्षांत उतरविण्या-साठी सहकार्य द्यावें.योजना अंमलांत आणण्याचें कार्य हें वेगवेगळ्या थरांवरील निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांनीं करावयाचें आहे, नव्हे, ती त्यांची जबाबदारी आहे! असें झालें तरच सामाजिक जबाबदारीची जाणीव खेड्यांतून मोठ्या प्रमाणावर करून देण्यासाठी सध्यापेक्षाहि अधिक प्रमाणावर शेतकी व उद्योग-कार्यांत गुंतलेल्या लोकांचें सहकार्य मिळेल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

### सामाजिक हितासाठी कायद्याचा कडक इलाज

हीं उच्च उदात्त तत्त्वें आहेत. परंतु निरनिराळ्या पातळीवरील विविध सहकारी संस्था चालवितांना आपल्या जवळच हीं तत्त्वें नसतील तर आपण या विचारप्रणालीबद्दल फारसें बोलूं शकणार नाहीं. माझ्यासारख्या सहकारावर पूर्ण श्रद्धा असलेल्या सहकारी कार्यकर्त्यास सहकारी संस्थांतील सहकारी कार्यकर्ते म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींनीं लांचलुचपत, फसवणूक, अपहरण या गोष्टी केल्याचें ऐकण्यास किंवा त्यांचें वृत्त वाचतांना फार दुःख होतें.

या गोष्टी ज्या ठिकाणीं सांपडतील त्या वेळीं समाजाच्या हिताचे रक्षणकर्ते या भूमिकेंतून सरकारनें कायद्यांतील तरतुदींनुसार भीड किंवा भय न बाळगतां कडक इलाज केला पाहिजे. त्याच बरोबर आपण आर्थिक लोकशाहीचा पाया घालीत असल्यानें आपणहि काळजीपूर्वक राहिले पाहिजे आणि स्वतःबद्दल शिस्त पाळतांना कठोर असले पाहिजे. सहकारांत सामाजिक हितसंबंधाच्या पुढें वैयक्तिक हितसंबंध बाजूला ठेवावयास पाहिजेत आणि समाजाला दुर्लक्षून स्वतः श्रीमंत होतां उपयोगी नाहीं किंवा त्याला लुबाडता उपयोगी नाहीं. सहकारी चळवळींतील सर्वांनीं म्हणजे खालच्या पातळीपासून वरपर्यंत सर्वांनीं या गोष्टींस व अशा व्यक्तींना सह-कारांत जरा सुद्धां थारा देतां उपयोगी नाहीं.


टेलिफोन नं. २४४ ] अल्पावधींतच जनतेच्या विश्वासास पात्र झालेली [ टेलिग्रॅम—"जनताबँक"

# जनता सहकारी बँक लिमिटेड, सांगली.

( रजिस्टर नं. २४०९८ ) कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली (S. Rly.)

| | | ३०-६-६२ | ३०-९-६२ |
|---|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | रु. ५,००,००० | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. १,५६,३७५ | रु. १,६८,३५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ११,२५१ | रु. ११,३०९ |
| एकूण ठेवी | ... | रु. ८,८९,७५२ | रु. १०,१२,५३६ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. २०,५६,०३१ | रु. २१,६३,१७८ |

खास वैशिष्ट्यें | बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात. आकर्षक व्याजानें ठेवी स्वीकारल्या जातात.

ज ] दुसऱ्याच वर्षी बँकेस निव्वळ नफा रु. १४,६६२-९० झाला आहे,

न ] बँकेनें २ टक्के डिव्हिडंड जाहीर केला आहे.

ता] १-७-६१ ते ३०-६-६२ अखेर एकूण उलाढाल. [Turn over] रु. ३,१८,१८,५२६ झाली आहे.

एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर. वसंतरावजी पाटील, व्हा. चेअरमन. एम्. एस्. कराळे, चेअरमन.

# संकल्प आणि सिद्धि ह्यांतील तफावत

## वैफल्याच्या धोक्याचा इशारा

भारतांतून दारिद्य हुसकून लावण्यासाठी आणि देशांत कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी नियोजकांच्या म्हणण्या-प्रमाणें मूलभूत वस्तु आणि सेवा, म्हणजे अन्नधान्यें, पोलाद, कोळसा, सिमेंट आणि वीज या होत. या सर्वहि बाबतींत, दुर्दैवानें, संकल्प आणि प्रत्यक्ष उत्पादनसिद्धि यांतील तफावत एकसारखी वाढतच आहे. आणि म्हणूनच आमची नियोजकांना अशी कळकळीची विनंती आहे कीं, ज्या हेतूसाठी पंचवार्षिक योजनांचा प्रपंच केला जात आहे त्या हेतुला गंभीर स्वरूपांत अडथळा आणणारी ही परिस्थिति विना विलंब संपूर्ण बदलेल असें त्यांनीं प्रयत्न केले पाहिजेत. नियोजित अर्थव्यवस्थेच्या मुळावरच प्रहार करणारी ही गंभीर परिस्थिति नष्ट करण्यासाठी उपाय शोधण्याकडे नव्या दृष्टीनें पाहाणें आणि एक नवेंच वातावरण निर्माण करणें यासाठीं प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच ठरतें. सततची जागृतता, सतत ढोर मेहनत, जीवनाच्या सत्यावर काळजीपूर्वक आधारलेली, खुशीच्या सहकाराची भावना आणि आपल्या उपलब्ध साधनसामग्रीला अपरिहार्यपणें असलेल्या मर्यादा यांची जाणीव यांची त्यासाठी आवश्यकता असते.

### धान्यांचें उत्पादन

आपल्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य लाभण्यासाठी आपलें अन्नधान्यांचें उत्पादन १९६५-६६ सालापर्यंत १ हजार लक्ष टन होणें मूलभूततः आवश्यक आहे. आपली लोकसंख्या सातत्यानें वाढत असतांना जरी अन्नधान्यांचें उत्पादन हजार कोटी टनांपर्यंत वाढलें तरी अन्नधान्यांच्या दृष्टीनें भारत स्वयंपूर्ण होईल अशी खात्री तज्ज्ञांना वाटत नाहीं. अन्नधान्यांच्या बाबतींत स्वयंपूर्णता भारतानें मिळविलीच पाहिजे. तिसऱ्या योजनेनंतर अन्नधान्यें आयात करणें देशाला परवडणार नाहीं. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दुसऱ्या योजने-अखेरीपर्यंतच्या काळांत आपण चार कोटी टन अन्न-धान्यांची आयात केलेली आहे. अमेरिकेचा पब्लिक लॉ ४८० अनुसार धान्य आयातीबाबत उदार सवलत अमेरिकेकडून मिळाली असूनहि वरील कालखंडांत आपण आपल्या तुटपुंज्या परदेशीय चलनांतून १ हजार कोटी रुपये देशांतील लोकांना पोसण्यासाठी आवश्यक तें धान्यआयातींत खर्च केले आहेत. अन्नधान्यांच्या संबंधांत देश स्वावलंबी असतां तर भारतीय अर्थव्यवस्थेचें चित्र कितीतरी वेगळें दिसलें असतें. एक हजार कोटी रुपयांसारखी, प्रचंड बचत आपल्याला करतां आली असती. आपण स्वावलंबी झालों असतों. परदेशांच्या तोंडाकडे परकीय चलनांसाठी आपल्याला पाहण्याची आवश्यकता कमी भासली असती. आणि तिसऱ्या योजनेंतील आपल्या जबाबदाऱ्या आपण सुलभतेनें पार पाडूं शकलों असतों. तेव्हां तिसऱ्या योजना-काळांत उत्पादनाचा संकल्प पार पाडावा यासाठी शक्य ती सर्व उपाय-योजना करावीच लागणार आहे.

तिसऱ्या योजनेंत फार मोठ्या औद्योगिक विकासाची योजना आपण आखलेली आहे. या योजनेच्या काळांत उद्योगांच्या संघटित विभागांत आणि खनिजांच्या व्यवसायांत नवी गुंतवणूक २५७० कोटी रुपयांपर्यंत, देशांत होईल असा अंदाज आहे. पोलाद, कोळसा, वीज, सिमेंट, वगैरेंचें उत्पादन संकल्पाबरहुकूम झाल्याशिवाय व त्यांची वाहातूक करण्यासाठी भरपूर व आवश्यक ती तरतूद केल्याशिवाय योजनेचीं उद्दिष्टें पार पाडणें अशक्य आहे. ही गोष्ट स्फटिकवत् स्पष्ट आहे.

### पोलाद

पोलादाची गोष्ट घेऊं. औद्योगिक, त्याचप्रमाणें शेतीविकासासाठी तें अत्यावश्यकच आहे. घरें बांधण्याचा प्रश्न असो कीं बंदर-विकासाची गोष्ट असो, रेल्वेंत वाढ करायची असो, कीं यंत्र-निर्मिति साधावयाची असो, या प्रत्येक बाबतींत पोलाद महत्त्वाची भूमिका बजावीत असतें. पण पोलादाच्या बाबतींतला आपला दुसऱ्या योजनेंतला संकल्प सिद्धीस गेला आहे काय ? याचें उत्तर सरळ नकारार्थींच आहे. योजनेच्या अखेरीस म्हणजे १९६०-६१ पर्यंत ४५ लक्ष टन पोलादनिर्मितीचा संकल्प करण्यांत आला होता. पण प्रत्यक्ष उत्पादन मात्र २२ लक्ष टनांचेंच झालें. म्हणजे २३ लक्ष टन, याचाच अर्थ १०० टक्के उत्पादन कमी भरलें.

पूर्वींच्या अनुभवानें शहाणे होऊन, तिसऱ्या योजनेंत मात्र नियोजकांनीं तयार पोलादाचा वार्षिक संकल्प १९६०-६१ मध्यें जो ४५ लक्ष टनांचा धरला होता तो तिसऱ्या योजनेच्या पहिल्या वर्षासाठीं म्हणजे १९६१-६२ साठी ३५ लक्ष टनांवर आणून ठेविला आहे. पण हा कमी केलेला संकल्पहि सिद्धीस जाऊं शकला नाहीं. १९६१-६२ चें उत्पादन फक्त २८ लक्ष टनांचेंच झालें. १९६०-६१ च्या संकल्पाशीं तुलना करतां ही तूट १७ लक्ष टनांची म्हणजे ३८ टक्क्यांची होती.

असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, तयार पोलादाचें उत्पादन १९६५-६६ सालापर्यंत ६८ लक्ष टनांपर्यंत वाढाव. आज तरी तें २८ लक्ष टनांपुढें सरकलेलें नाहीं. वाढ होण्याच्या मार्गांत ही जी प्रचंड दरी आहे, व सरकारी क्षेत्रांतील तीनहि कारखान्यांना आपल्या क्षमतेइतपत उत्पादन काढण्यांतहि अजून यश आलेलें नाहीं हा अनुभव विचारांत घेतां, या संकल्पित उत्पादनांतहि गंभीर तूटच येण्याचा दाट संभव आहे. याचाच अर्थ देशांत जवळ जवळ २०० कोटी रुपये भरेल इतक्या नव्या मालाचें उत्पादन तितकेंच कमी येईल. ही परिस्थिति अशीच राहिली तर तिचा परिणाम ज्या व्यवसायांना ते स्थापन होण्यासाठी व त्यांचा दैनंदिन उत्पादनव्यवहार चालण्यासाठी पोलादाची आवश्यकता आहे, त्यांच्या विकासावर होणार आहे. तेव्हां त्या वेळीं नियोजन आंखलें त्या वेळीं उत्पादनाचे संकल्प ठरवितांना या सर्व गोष्टींकडे नियोजन समितीनें पुरेसें लक्ष दिलें किंवा नाहीं याचीच शंका आल्याशिवाय राहात नाहीं.

### कोळसा

कोळशाचीहि तीच गत. कोळशाची भीषण टंचाई निर्माण झाल्याचें व त्यांत आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाल्याचें आपण वाढत्या प्रमाणावर ऐकत असतों. कोळशाच्या या तुटवड्यानें अनेक कारखान्यांच्या, त्यांच्या दैनंदिन उत्पादनावर अनिष्ट परिणाम झाला आहे. त्यामुळें त्यांचें आर्थिक संचलनहि धोक्यांत आलेलें आहे. दुसऱ्या योजनेच्या शेवटच्या वर्षासाठी कोळशाच्या वार्षिक उत्पादनाचा संकल्प ६०० लक्ष टन ठरविण्यांत आला होता. पण प्रत्यक्षांत उत्पादन मात्र ५४० लक्ष

६० हजार टनच हातीं पडलें. तिसऱ्या योजनेचा १९६५-६६ सालचा संकल्प ९७० लक्ष टनांचा आहे. १९६१-६२ साठीं तो ६७० लक्ष टनांचा मुक्रर करण्यांत आला होता. परंतु १९६०-६१ सालासाठीं जें उत्पादन झालें, त्यापेक्षाहि या वेळचें उत्पादन कमीच झालें. लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे नियोजित संकल्प आणि प्रत्यक्ष उत्पादन यांत ५४० लक्ष टनांवरून तफावतीनें १२७० लक्ष टनांवर उडी घेतली आहे. अशा स्थितींत नियोजकांच्या इच्छेनुसार आणि अपेक्षेनुसार नियोजित अर्थव्यवस्था कशी काय कार्य करूं शकेल ? जबाबदार पुढारी आणि विचारवंत यांनीं जर नियोजकांना उपदेश केला कीं, अंथरूण पाहून पाय पसरा, तर लगेंच ते टोमणा मारतात आणि म्हणतात, "भारतांत दारिद्र्य तसेंच राहावें अशी तुमची इच्छा आहे काय ?" भारताच्या या भवितव्य ठरविणाऱ्यांना आम्ही नम्रपणें एक गोष्ट विचारूं का ? अर्थशास्त्राचे सर्व नियम गुंडाळून ठेवून आणि आपल्यापुढें असलेल्या सर्व अडचणी विसरून, केवळ कागदावर संकल्प लिहिलेले आहेत एवढ्यासाठींच ते सिद्धीस जातील असें त्यांना वाटतें काय ?

### सिमेंट

सिमेंट ही अशीच आणखी महत्त्वाची गोष्ट आहे. त्याच्याशिवाय घरें बांधतां येणार नाहींत, रस्ते तयार होणार नाहींत, कारखाने निर्माण होऊं शकणार नाहींत, नदी-खोऱ्यांतल्या योजना आणि धरणें अस्तित्वांत येऊं शकणार नाहींत, पाटबंधारे बांधतां येणार नाहींत, अशा कितीतरी गोष्टी अशक्य ठरतील. तेव्हां सिमेंटउत्पादनाचा संकल्प संपूर्ण स्वरूपांत सिद्धीस जाणें आणि सिमेंट भरपूर आणि वेळेवर मिळत राहाणें ही गोष्ट अत्यंत जरूरीची ठरते.

दुसऱ्या योजनेसाठीं सिमेंटउत्पादनाचा संकल्प १३० लक्ष टनांचा सोडण्यांत आला होता. नंतर त्यांत कपात करून तो ११० लक्ष टनांवर आणून ठेवण्यांत आला. परंतु १९६०-६१ या वर्षामध्यें सिमेंटचें उत्पादन अवघें ८० लक्ष, ५० हजार टन इतकेंच झालें. म्हणजे मूळ संकल्पापेक्षां हें उत्पादन ४० लक्ष ५० हजार टनांनीं आणि दुरुस्त संकल्पापेक्षां २० लक्ष ५० हजार टनांनीं कमीच आलें.

तिसऱ्या योजनेंत सिमेंटउत्पादनाची क्षमता १५० लक्ष टनांची असून प्रत्यक्ष उत्पादन १२० लक्ष टनांचें अपेक्षित आहे. १९६१-६२ मध्यें सिमेंटचें जें उत्पादन झालें तें १९६०-६१ पेक्षा कमीच होतें. तें अवघें ८० लक्ष, २० हजार टनांचें मिळालें. १९६२-६३ मध्यें हें उत्पादन ९० लक्ष टन होण्याची शक्यता आहे. दोन वर्षांमध्यें अवघी ५ लक्ष टनांची ही जी भर पडली ती पाहतां उरलेल्या तीन वर्षांत ३० लक्ष, ५० हजार टनांचें उत्पादन वाढावें ही जी अपेक्षा तीवर कसा काय विश्वास ठेवावा हें समजत नाहीं. आजपर्यंतचा अनुभव विचारांत घेतां आणि ५० लक्ष, ८० हजार टन उत्पादनाचे जे नवे कारखाने काढण्यासाठीं परवानगी मिळाली आहे त्यांतल्या ३० लक्ष, २० हजार टन सिमेंट उत्पादन करूं शकणाऱ्या कारखान्यांचीच आतां कोठें यंत्रसामग्रीची मागणी नोंदली आहे हें पाहतां, वरील उत्पादनाबाबत आशावाद तरी कसा निर्माण व्हावा ? अशा स्थितींत नियोजित अर्थव्यवस्थेखालीं विकासाची ही जी परवड चाललेली आहे ती वैफल्याची वाढती भावना वाढीस लावणारीच आहे.

### वीज

पुरेसा आणि वक्तशीर असा कोळशाचा आणि विजेचा पुरवठा जर झाला नाहीं तर नियोजनांचीं हातीं घेतलेलीं विविध कामें कार्यवाहीत येण्याला प्रारंभच होणार नाहीं, मग तीं सफल होणें दूरच राहिलें. पहिल्या योजनेंत विजेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट १४ लक्ष किलोवॅट होतें; पण प्रत्यक्ष ११ लक्ष किलोवॅटच विद्युत् निर्माण झाली. दुसऱ्या योजनेंत ३४ लक्ष किलोवॅट नवी आणि जादा विद्युत् निर्माण करण्याचा संकल्प होता; परंतु या काळांत फक्त २२ लक्ष किलोवॅट वीज निर्माण होऊं शकली. याप्रमाणें संकल्प आणि प्रत्यक्ष उत्पादन यांतली तफावत पहिल्या योजनेंत ३ लक्ष किलोवॅट होती, ती दुसऱ्या योजनेच्या अखेरीस १२ लक्ष किलोवॅटवर उडी घेती झाली. म्हणजेच ही तफावत चौपटीनें वाढली.

---

### मुंबईत दूरचित्रवाणीचें प्रक्षेपण केंद्र

भारताच्या माहिती व नभोवाणीखात्याचे मंत्री श्री. बी. गोपाल रेड्डी ह्यांनीं कोईमतूर येथील रोटरी क्लबांत बोलतांना सांगितलें कीं, चालू पंचवार्षिक कार्यक्रमाच्या ४ थ्या वर्षांत मुंबईमध्यें दूरचित्रवाणीचें प्रक्षेपण केंद्र उभारण्यांत येईल. दूरचित्रवाणीचे ४०,००० सेटस् त्या सुमारास लागतील असा अंदाज आहे. प्रत्येक सेटला १,३०० ते १,४०० रुपये किंमत पडेल. ह्या चित्रवाणी प्रक्षेपण-केंद्रासाठीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ४० लाख रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि ही रक्कम पुरी पडेल असें सांगतां येत नाहीं. भारतामध्यें चित्रवाणीचे सेट्स तयार करतां येतील अशी आशा सरकारला वाटत आहे. संबंधित कारखाना बहुधा बंगलोरमध्यें प्रथम काढला जाईल. ह्या बाबतींत पुरेसा अनुभव आल्यावर इतर औद्योगिक शहरांतून चित्रवाणीच्या सेट्सचे उत्पादन सुरू करतां येईल.

---

### गुजरात राज्यांत पिकांच्या विम्याची योजना

गुजरात राज्य सरकारनें शेतांतील उभ्या पिकांचा विमा उतरविण्याची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. हें काम युनियन कोऑपरेटिव्ह इन्शुरन्स कंपनीकडे सोपविण्यांत येण्याचा संभव आहे. अशा प्रकारचे विमे उतरविणारी ती एकटीच संघटना आहे. योजना अमलांत आणण्यासंबंधीं गुजरात सरकारचे प्रतिनिधि आणि कंपनीचे अधिकारी ह्यांचे दरम्यान अलीकडेच कांहीं वाटाघाटी झाल्याची वार्ता आहे. भारतांत पिकांचा विमा उतरण्याची पद्धत सध्यां फक्त पंजाब राज्यांतच चालू आहे आणि तीहि दोनच पिकांपुरती मर्यादित आहे. गुजरात राज्य सरकार मात्र सर्व प्रकारच्या पिकांच्या विम्याची योजना सुरू करणार आहे.

---

### बंगलोरमधील अगरबत्तीचा धंदा

म्हैसूर राज्यांत अगरबत्तीचें उत्पादन फारच उच्च दर्जाचें होतें. त्यामुळें म्हैसुरी अगरबत्तीचें नांव सर्व भारतभर मशहूर झालेलें आहे. ह्या धंद्यांतील एकूण उत्पादनापैकी ७५ टक्के उत्पादन एकट्या बंगलोर शहरांत होतें. बंगलोर, कोलार आणि म्हैसूर ह्या जिल्ह्यांत मिळून दरसाल सुमारें ४ कोटी रुपयांची अगरबत्ती तयार करण्यांत येते. ह्यापैकी बहुतेक माल देशांतच खपतो; परंतु बराच माल सीलोन, ब्रह्मदेश, मलाया, इंडोचायना, ब्रिटिश आफ्रिका, ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, इटली आणि फ्रान्स ह्या देशांतहि पाठविला जातो. धंद्यांत रोजगार करणाऱ्या बहुतेक स्त्रिया असून त्यांची संख्या ४७,००० च्या आसपास आहे. बहुतेक लोक अर्धवेळ काम करणारे आहेत.

# भारताच्या निर्यात व्यापाराची निराशाजनक परिस्थिति

## परदेशीय चलनाच्या टंचाईचा प्रश्न

भारताचे पंचवार्षिक कार्यक्रम आंखण्यांत आल्यापासून आणि त्यांच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासून परदेशीय चलनाचा प्रश्न अतिशय महत्त्व पावला आहे. परदेशीय चलनाची टंचाई चांगलीच जाणवूं लागल्यामुळें 'निर्यात करा, नाहींतर नष्ट व्हाल' ह्या जुन्या घोषवाक्याचा पुन्हा उच्चार करण्यांत येऊं लागला आहे. निर्यात केल्याशिवाय भारताचा तरणोपाय नाहीं. निर्यातीशिवाय पंचवार्षिक कार्यक्रमांतील उद्दिष्टें गांठतां येणार नाहींत. भारतामधील उद्योगधंदे व शेती ह्या दोन्हींचा विकास करण्यासाठी परदेशीय यंत्रसामग्री व इतर साधनें आयात करावीं लागतात. त्यासाठींहि निर्यातीची फार गरज आहे. गेलीं कित्येक दशकें भारतामधून प्राथमिक स्वरूपाचा कच्चा माल, असंस्कारित पदार्थ, आणि अलीकडेच कांहीं पक्का माल निर्यात करण्यांत येत आहे. औद्योगीकरणाची व्याप्ति जशी वाढत आहे तशी निर्यात करण्यांत येत असलेल्या मालांतील पक्क्या मालाचें प्रमाण हळूहळू वाढत आहे.

### निर्यातींत नव्या मालाची भर

आतां भारताच्या परदेशीय व्यापारांत पक्क्या मालाच्या निर्यातीला प्रमुख स्थान प्राप्त होऊं लागलें आहे. भारताला सर्वांत अधिक परदेशीय चलन चहा, तागाचा माल आणि सुती कापड ह्यांच्या निर्यातीपासून मिळतें. कारण, निर्यातींत ह्या मालाचें प्रमाण सर्वांत अधिक आहे. ह्या मालाच्या खालोखाल निर्यात मालांत लोहमिश्रित माती, मँगॅनिजचें खनिज, कातडीं व चामडीं, तेलबिया, इत्यादि प्रकारच्या मालाचा अनुक्रम लागतो. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांची पूर्तता झाल्यामुळें आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमास आरंभ झाल्यामुळें निर्यातीच्या मालांत नव्या प्रकारच्या मालाची भर पडली. आतां सायकली, डिझेल तेलावर चालणारीं एंजिनें, विजेवरील पाण्याचे पंप, विजेच्या मोटर्स, दाढीचीं पातीं, छताला लावण्याचे पंखे, टेबलावर ठेवण्याचे पंखे, विजेचे बल्ब, शिवणाचीं यंत्रें, साबण, हा मालहि भारतामधून निर्यात करण्यांत येतो.

### कापडाच्या निर्यातीचें भवितव्य

पण, ह्या मालाची निर्यात कोठवर, किती प्रमाणांत व किती काळपर्यंत होत राहील? त्यांच्या निर्यातीमुळें अधिकाधिक परदेशीय चलन मिळूं शकेल काय? कां निर्यात कमी होऊं लागल्यामुळें परदेशीय चलन मिळण्यांत घट होऊं लागेल? हे प्रश्न उपस्थित होतात. पैकी कापडाच्या निर्यातीचें भवितव्य निराशाजनक आहे. भारतामधील बरेंच कापड ब्रिटनला निर्यात करण्यांत येतें. भारताच्या कापडावरील जकातीची सूट जमेस धरूनसुद्धां ब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या चीन, जपान, हाँगकाँग व पाकिस्तान ह्यांच्या कापडाशीं स्पर्धा करणें भारताला कठीण जातें. ब्रिटन जर युरोपीय सामायिक बाजारपेठेंत सामील झालें तर भारतीय कापडावरील जकातमाफी रद्द होईल आणि त्याला युरोपीय बाजारपेठेंतील कापडाशीं अटीतटीची स्पर्धा करावी लागेल. शिवाय, कापडाच्या जागतिक बाजारपेठेंत भारताच्या कापडापेक्षा इतर देशांचें कापड अधिक स्वस्त मिळतें. निकृष्ट कार्यक्षमता, जबरदस्त कर आणि गिरण्यांची जुनी यंत्रसामग्री ह्यांमुळें असें होत आहे. दुसरें असें कीं सध्यां भारत ज्या परदेशांत कापडाची निर्यात करीत आहे ते देश स्वतःच कापडाच्या गिरण्यांचा धंदा आपआपल्या देशांत स्थापन करीत आहेत. नजीकच्या भविष्यकाळांत भारताची कापडाची निर्यात फारच खालीं येण्याचा संभव आहे. तसें झाल्यास आशिआ, आफ्रिका व इराणचें आखात ह्या भू-भागांतील जे मागासलेले देश स्वतःचा कापडधंदा काढणार नाहींत तेवढ्याच देशांत भारताच्या कापडाची निर्यात होऊं शकेल. ह्या निराशामय चित्राची कल्पना पुढील कोष्टकावरून येऊं शकेल.

**निर्यातीचे आंकडे**

| साल | कोटी वार |
|---|---|
| १९५० | १०० |
| १९६१ | ५० |
| १९६२ (पहिली तिमाही) | १२·५ |

### चहाच्या व तागाच्या निर्यात पेठांत स्पर्धा

सरकारच्या धोरणांत फरक पडला नाहीं तर चहाच्या निर्यातीची सध्यांची परिस्थिति चालू राहण्यास हरकत दिसत नाहीं. गेलीं कित्येक वर्षे चहाच्या निर्यातीनें आपलें स्थान टिकवून धरलें आहे. चहाच्या निर्यातीच्या भारताच्या ज्या बाजारपेठा आहेत त्यांत संयुक्त-अरब प्रजासत्ताक, रशिया व इतर कम्युनिस्ट देश ह्यांची भर पडलेली आहे. तथापि, अमेरिकेंत खपणाऱ्या भारताच्या चहाऐवजीं अलीकडे तेथें सीलोनचा चहा अधिक खपूं लागला आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. अमेरिकेंतील भारतीय चहाचा खप टिकवून धरण्यासाठी आणि तो वाढविण्यासाठी स्पर्धेत टिकण्यासारख्या किंमती, जाहिराती आणि विक्रीची आक्रमक मोहीम ह्या उपायांचा अवलंब करण्यांत आला पाहिजे. तागाच्या मालाच्या निर्यातीबाबत काळजीची परिस्थिति आहे. तागाच्या मालाच्या बाजारपेठांत पाकिस्तान हा देश एक प्रबळ स्पर्धक आहे. कारण, पाकिस्तानच्या तागाचा दर्जा उच्च आहे. शिवाय पाकिस्तानमधील तागाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री अद्ययावत आहे आणि येथें मजुरीहि स्वस्त आहे. पाकिस्तान आपल्या तागाच्या धंद्याचा जोरानें विस्तार करीत असल्यानें तो देश भारताला सध्यांच्या बाजारपेठांतून हुसकावून लावण्याचा संभव आहे. तेव्हां भारताची तागाच्या मालाची बाजारपेठ आकुंचित होण्याची चांगलीच भीति आहे.

### मँगेनीजच्या खाणी अडचणींत

सध्यां मँगेनीजचा निर्यात व्यापारहि फारसा सुस्थितींत नाहीं. भारतांत स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनची स्थापना होण्यापूर्वी कच्चें मँगेनीज मुख्यतः युरोप व अमेरिका ह्यांना निर्यात करण्यांत येत असे. पण, कॉर्पोरेशनची स्थापना झाल्यापासून अमेरिका मँगेनीजच्या पुरवठ्यासाठी दुसऱ्या देशांकडे पाहूं लागली आहे. ब्राझिल देश अमेरिकेला जवळ असल्यानें त्या देशाकडून अमेरिका मँगेनीज घेऊं लागली आहे. रशिआ स्वतःचा मँगेनीजच्या खाणींचा धंदा वाढवीत असून युरोपला तो खनिज पुरवूं लागला आहे. चढ्या किंमतीमुळें भारताला आपल्या कांहीं पूर्वीच्या बाजारपेठा गमवाव्या लागल्या आहेत. जबर कर,

निर्यातीवरील जकात, वहातुकीचे वाढलेले दर, हीं ह्या धंद्याचीं दुखणीं आहेत. त्यामुळें ल्हानसहान खाणी बंद पडल्या असून मोठ्या खाणीहि अडचणींत सापडल्या आहेत. नेहमींच्या निर्यात व्यापाराच्या मानानें नव्या उद्योगधंद्यामधील मालाच्या निर्यातीचा व्यापार आशादायक दिसत आहे. ह्या उद्योगधंद्यांनीं नव्या प्रकारचा माल निर्यात करण्याचा पायंडा पाडल्यामुळें त्याच्या मालाला आशिया, आफ्रिका, मध्यपूर्व युरोपमधील कांहीं देश आणि अमेरिका ह्या ठिकाणीं वाढती बाजारपेठ लाभत आहे. तथापि जुन्या परंपरागत मालाच्या निर्यातींत जी घट येत आहे ती अद्याप नव्या उद्योगधंद्यांच्या मालानें भरून काढलेली नाहीं. आणखी कांहीं वर्षें तरी ही घट भरून येणें शक्य होणार नाहीं. येत्या कांहीं वर्षांत भारताला यंत्रसामग्री व इतर भांडवली माल ह्यांची मोठ्या प्रमाणांत आयात करावी लागणार आहे. ह्या आयातीची किंमत देण्यासाठी परदेशीय चलनाची प्राप्ति करून घ्यावी लागेल. ती प्राप्ति करून घेण्यासाठी भारताला नव्या उद्योगधंद्यांच्या मालाची वाढती निर्यात करावी लागणार आहे.

### रशिआंतील शिक्षणपद्धतीविषयीं अहवाल

रशिआंतील शिक्षणपद्धतीची पाहाणी करण्यासाठी भारत सरकारनें शिक्षणतज्ज्ञांचें एक मंडळ तिकडे पाठविलें होतें. मंडळानें रशिआंत एक महिनाभर फिरून पाहाणीचें काम केलें व आपला अहवाल सरकारला सादर केला. अहवालांत दिलेल्या माहितीप्रमाणें रशिआंतील शिक्षणपद्धति त्या देशाचें ऐक्य बळकट करण्याच्या कामीं फार महत्त्वाची ठरली आहे. हें ऐक्य बळकट करण्याच्या कामीं इतर साधनाप्रमाणें शिक्षणाचा उपयोगहि चांगला झालेला आहे. तथापि, स्थानिक सांस्कृतिक वैशिष्ट्य आणि देशाभिमान ह्यांची सांगड घालण्यांतहि रशिअन शिक्षणपद्धति यशस्वी झालेली आहे. रशिआंतील सरकारनें व शिक्षणतज्ज्ञांनीं शिक्षणाच्या कसावर व दर्जावर चांगला जोर दिलेला आढळून आला. रशिअन शिक्षणपद्धतींत शिक्षकांना शिक्षण देऊन तयार करण्यास फार महत्त्व दिलेलें आहे.

### पिंपरी येथील कारखान्याचें यश

पिंपरी येथील सरकारी मालकीच्या कारखान्यानें ७ वर्षांच्या अवधींत ३८२ लाख रुपयांचा राखीव निधि शिल्लक टाकला आहे. १९६१–६२ सालांत कंपनीनें भागभांडवलावर ६·२५ टक्के नफा जाहीर केलेला आहे. त्याशिवाय कंपनीनें स्वतःच्या उत्पन्नामधून ४०१ लाख रुपये खर्च येणारी विस्तारयोजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. कंपनीनें तयार केलेलें पेनिसिलीन हें औषध लवकरच पश्चिम आशिआंतील देश आणि अतिपूर्वेकडील देश ह्यांच्याकडे निर्यात करण्यांत येऊं लागेल. पुढील वर्षाच्या उत्पादनांपैकीं ७ ते १० टक्के उत्पादन निर्यातीसाठीं राखून ठेवलें जाईल.

### गुजरातमधील स्टेट ट्रॅन्सपोर्ट

गुजरात राज्य सरकारनें राज्यांतील तीन सहकारी वाहातूक संघटनांना नुकसानभरपाई देऊन त्यांचेकडे असलेल्या मार्गांवरील वाहातूक स्वतःकडे घेण्याचें ठरविलें आहे. ह्या संघटनांना नुकसानभरपाईपोटीं सुमारें १३,७५,००० रुपये द्यावे लागणार आहेत. आणखी १०० मार्गांवरील वाहातूक त्या मार्गांवरील संघटनांचे परवाने संपल्यावर हातीं घेण्यांत येणार आहे.


उसाची शेती व सहकारी तत्त्वावर कारखानदारी यांत आघाडीवर असलेली शेतकऱ्यांच्या मालकीची संस्था

★

## दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर

—स्थापना १९३२—

मुंबई ऑफिस :
सर विठ्ठलदास चेंबर्स,
१६ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई.
टेलिफोन नं. २५२५३४

रजिस्टर्ड ऑफिस
माळीनगर, जि. सोलापूर.
टेलिफोन नं. २१

तारेचा पत्ता : 'माळीशुगर' माळीनगर व मुंबई.

★

दिवाळीनिमित्त शेतकरी, कामगार, व्यापारी आणि सर्व हितचिंतकांचें अभिष्टचिंतन करीत आहे.



श्री. म. गे. गिरमे — चेअरमन

श्री. ह. ब. गिरमे — मॅनेजिंग डायरेक्टर

★

—संचालक मंडळ—

श्री. शं. मा. राऊत
रा. ब. ना. सो. बोरावके
श्री. मा. खं. पांढरे
श्री. र. सो. इनामके
श्री. म. मा. जाधव
श्री. पं. ह. गिरमे
श्री. कृ. ल. गिरमे
श्री. ज. ग. रासकर

# कंपन्यांच्या कारभारांतील डायरेक्टरांचें स्थान व जबाबदाऱ्या

कंपनी कायद्यांत डायरेक्टरची व्याख्या करतांना 'जो मनुष्य डायरेक्टरच्या जागेवर असतो' त्या मनुष्याचीहि व्याख्येंत गणना करण्यांत आलेली आहे. ही व्याख्या फारशी उद्बोधक म्हणतां येणार नाहीं. डायरेक्टर हा सूचना अगर आदेश देतो आणि कंपनीचे कार्यकारी सेवक त्या पाळतात. परंतु ज्या कंपनींत मॅनेजिंग एजंटस् असतात त्या कंपनींत डायरेक्टर्स, खऱ्या अर्थानें आदेश देतात असें म्हणतां येईल किंवा नाहीं ह्याबद्दल शंका वाटते.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१९६० च्या दुरुस्ती कायद्यानंतर प्रत्येक सार्वजनिक कंपनीला निदान तीन आणि प्रत्येक खाजगी कंपनीला निदान दोन डायरेक्टर्स असले पाहिजेत, असें बंधन आहे. हा दुरुस्त कायदा होण्यापूर्वी ज्या खाजगी कंपन्या सार्वजनिक कंपन्यांच्या उप-कंपन्या होत्या त्यांना तीन डायरेक्टर्स असावे लागत. आतां त्यांना दोन डायरेक्टर्सच पुरतात. ह्या दुरुस्त कायद्याप्रमाणें निर्माण करण्यांत आलेल्या 'मानीव' सार्वजनिक कंपन्यांना कलम २५२ लावण्यांत अडचण उत्पन्न होण्याचा संभव आहे. कलम २५५ प्रमाणें सार्वजनिक कंपन्या आणि सार्वजनिक कंपन्यांच्या उपकंपन्या असलेल्या खाजगी कंपन्या, ह्यांमधील दोनतृतीयांशापेक्षा कमी नाहीं इतक्या डायरेक्टर्सनीं आळी-पाळीनें निवृत्त झालें पाहिजे. जे डायरेक्टर्स निवृत्तीच्या कक्षेंत येतात त्यांच्यापैकीं एकतृतीयांश डायरेक्टर्सनीं प्रत्येक वार्षिक सभेच्या वेळीं निवृत्त झालें पाहिजे. पण समजा, वार्षिक सभा तीन अगर चार वर्षें भरविण्यांतच आली नाहीं, तर अशा परिस्थितींत डायरेक्टर्सची सेवानिवृत्ति होणारच नाहीं. शिवाय, कलम २५६ (४) प्रमाणें हे डायरेक्टर्स आपल्या जागीं डायरेक्टर्स म्हणून राहतील. डायरेक्टर्सच्या नेमणुकीबाबत कांहीं बंधनें घालण्यांत आलेलीं आहेत. ज्या डायरेक्टर्सवर आळी-पाळीनें निवृत्त होण्याचें बंधन नाहीं, त्यांनीं वार्षिक सभेच्या पूर्वी १४ दिवस आधीं आपल्या उमेदवारीची लेखी नोटीस कंपनीच्या कचेरीला दिली पाहिजे; किंवा अशी नोटीस कंपनीच्या एखाद्या सदस्यानें तरी दिली पाहिजे. कंपनीच्या सदस्यांवर अशा उमेद-वारीच्या व्यक्तिशः नोटिसा कंपनीनें बजावल्या पाहिजेत. ही गोष्ट कंपनीच्या कचेरीच्या ठिकाणाच्या एका इंग्रजी व एका स्थानिक वृत्तपत्रांत नोटीस देऊनहि करतां येईल. दुरुस्त कायद्यापूर्वी निवृत्तीच्या नियमाबाहेर असलेल्या डायरेक्टरला डायरेक्टर म्हणून काम करण्याबद्दलची आपली संमति रजिस्ट्रारकडे नोंदवावी लागे. आतां अशा डायरेक्टरची नियुक्ति झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत त्याला आपली संमति कळवितां येते. निवृत्तीच्या नियमांत बसणाऱ्या डायरेक्टर्सना आपली संमति कंपनीकडे कळवावी लागते. एखाद्या माणसानें डायरेक्टर म्हणून काम करण्याबद्दलची आपली लेखी संमति रजिस्ट्रारकडे कळविल्याशिवाय आणि डायरेक्टरला घ्यावे लागणारे भाग घेतल्याशिवाय, अगर ते घेण्याचें रजिस्ट्रार-कडे लेखी कबूल केल्याखेरीज अशा माणसाचें नांव कंपनीच्या आर्टिकल्समध्यें अगर प्रॉसपेक्टसमध्यें धरतां येत नाहीं.

### डायरेक्टरांचे प्रकार

एखाद्या डायरेक्टराची नेमणूक सदोष असेल तरी तो व्यवहारतः डायरेक्टर होऊं शकतो. उदा. जरूर तें भाग-भांडवल न घेतलेला डायरेक्टर. असा डायरेक्टर हा ज्याची नेमणूकच मुळीं झाली नाहीं अशा उपटसुंभ अगर तोतया डायरेक्टरपासून अर्थातच वेगळा समजला पाहिजे. कलम २ (१३) मध्यें डायरेक्टराची जी व्याख्या दिली आहे तीमुळें परिस्थिति गोंधळाची झाली आहे. ह्या व्याख्येंतील 'डायरेक्टरच्या जागेवर असणारा' माणूस जागेवर कसाहि, म्हणजे बेकायदेशीर आला असला तरी डायरेक्टर होतो काय ? कलम ३०३ अगर ३०७ कलमाप्रमाणें ज्या कोणा माणसाच्या सूचनांप्रमाणें अगर आदेशाप्रमाणें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स वागतो तो कंपनीचा डायरेक्टर समजला जातो. ह्या अर्थानें एखाद्या मुख्य कंपनीचा अध्यक्ष त्याच कंपनीच्या उपकंपनीचा डायरेक्टर समजला जाईल. 'को-ऑप्ट' केलेले डायरेक्टर्स कंपनीच्या पुढील वार्षिक सभेपर्यंतच अधिकारा-वर असतात. एखाद्या डायरेक्टरच्या मृत्यूमुळें अगर राजीनाम्या-मुळें रिकाम्या झालेल्या नैमित्तिक जागेवर एखाद्याची डायरेक्टर म्हणून नेमणूक झाल्यास, ती मूळच्या डायरेक्टरच्या मुदतीपर्यंतच चालू राहते. कंपनीच्या परवानगीनें एखाद्या गैरहजर डायरेक्टर-च्या जागीं काम करण्यासाठी पर्यायी डायरेक्टर कमींत कमी तीन महिनेपर्यंत नेमतां येतो. मूळच्या डायरेक्टरची मुदत भरल्यावर पर्यायी डायरेक्टरला आपली जागा सोडावी लागते; त्यासाठी मूळच्या डायरेक्टरनें परत आलेलें असलेंच पाहिजे असें नाहीं. कंपनीचा कारभार चालविण्यासाठी भरपूर अधिकार दिला गेलेला डायरेक्टर म्हणजेच मॅनेजिंग डायरेक्टर होय.

### डायरेक्टरांच्या नेमणुकीवरील निर्बंध

कोणालाहि २० कंपन्यांपेक्षा अधिक कंपन्यांत डायरेक्टरचें पद आपल्याकडे ठेवतां येणार नाहीं. ह्या बाबतींत कांहीं अपवाद ठेवण्यांत आले आहेत. एखाद्याची २० पेक्षा अधिक कंपन्यांत नेमणूक झाल्यास त्याला कांहीं कंपन्यांचे आपल्या इच्छेनुरूप राजीनामे देतां येतील. ६५ वर्षे पूर्ण झाल्यावर कोणालाहि सार्वजनिक कंपनींत अगर खाजगी उपकंपनींत डायरेक्टर म्हणून नेमतां येणार नाहीं. अशी नेमणूक करावयाची झाल्यास कंपनीला सर्वसाधारण सभेंत ठराव करावा लागेल. ६५ वर्षें पुरीं झाल्यावर डायरेक्टरला आपल्या जागेवरून निवृत्त व्हावें लागतें. तथापि, नेमणूक झाल्यावर तीन वर्षांच्या आंत ६५ वर्षें पुरीं झालीं म्हणून त्याला जागा खाली करण्याचें कारण नाहीं. कंपनीनें ठरविलेलें पात्रतेचें भाग-भांडवल डायरेक्टरनें नेमणूक झाल्यापासून २ महि-न्यांत घेतलें पाहिजे. पात्रतेचें भाग-भांडवल घेतल्याचें रजिस्ट्रारला नेमणुकीपासून दोन महिन्यांत कळविण्यांत आलें पाहिजे. कांहीं कंपन्यांत सरकार गैरव्यवहार अगर जुलूम टाळण्यासाठी स्वतः-तर्फे डायरेक्टर्स नेमतें. अशा डायरेक्टर्सना पात्रतेच्या भाग-भांडवलाची जरूर लागत नाहीं. सरकारी मालकीच्या कंपन्यांच्या डायरेक्टरांनाहि पात्रतेचें भाग-भांडवल घेणें जरूर असतें.

महाराष्ट्र राज्यांत अग्रेसर असलेली नागरी बँक

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

### अहमदनगर

मुख्य कार्यालयः—अहमदनगर.

शाखाः—(१) संगमनेर (२) श्रीरामपूर (३) वांबोरी (४) श्रीगोंदा (५) शेवगांव (६) बेलापूर टाऊन (७) पाथर्डी

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,३२,२५०·०० |
| रिझर्व्ह फंड | रु. | ३,४९,७५३·९१ |
| इतर फंड | रु. | ४,३३,५६२·२६ |
| ठेवी | रु. | ८२,८९,८०२·०६ |

**एकूण खेळतें भांडवल रु. १,०१,०४,५४२·४३**

मुख्य कार्यालयांत व श्रीरामपूर येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. नित्योपयोगी वस्तु खरेदी करणेसाठी कर्जे देणेची योजना. बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

स्पेशल सेव्हिंग्ज व सुवर्ण महोत्सव ठेव रोख्यांत बचतीची आकर्षक योजना.

आमचे ग्राहक, हितचिंतक व सभासदांस दीपावली व नूतन वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो ही प्रार्थना.

पां. का. मुळे, मॅनेजर. ज्यं. वि. निसळ, जनरल मॅनेजर. नवनीतभाई बार्शीकर, चेअरमन.

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर.

महाराष्ट्र राज्यांतील एक आदर्श अर्बन सहकारी बँक

## धी भुसावळ पीपल्स को. बँक लि.

स्टेशन रोड, भुसावळ ( जि. जळगांव )

फोन नं. ३६ ] स्थापना १९२५ [ पोस्ट बॉक्स नं. ३

३०-६-१९६२ चे बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| खपलेलें | ... | रु. १,८९,१५० |
| रिझर्व्ह फंड | ... | रु. १,७१,१९५ |
| इतर रिझर्व्हज् | ... | रु. १,१९,५८७ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | | रु. ३५,७९,६९९ |
| खेळतें भांडवल | ... | रु. ४१,२५,३८१ |

*डायरेक्टर मंडळ व अधिकारी*

श्री. रामकृष्ण सोनजी पाटील, चेअरमन
श्री. सदाशिव दामोदर नाईक, व्हाइस चेअरमन
श्री. प्रभाकर सेनू महाजन, श्री. नामदेव पुरुषोत्तम फालक,
श्री. वैद्य ब्रह्मदत्त शर्मा शास्त्री, श्री. सदाशिव विठ्ठल वाढ,
श्री. निवृत्ति रामचंद्र फालक.
श्री. विश्वनाथ सदाशिव पाटील, मॅनेजर
श्री. रतनजी एन्. देसाई, असि. मॅनेजर

सभासद व बिगर-सभासद यांचेकडून बँक करंट, सेव्हिंग्ज आणि मुदतीच्या ठेवी सोईस्कर व्याजाच्या दरानें स्वीकारते. कर्जदारांना रिबेट हें बँकेचें खास वैशिष्ट्य आहे. मेंबर प्रॉव्हिडंट फंड या नांवाची बचत योजना अमलांत आहे. बँकेनें स्वतःचें जागेंत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे. बँक सभासदांना वैद्यकीय मदतीची व्यवस्था करते. शेअर्स, रोखे, विमा पॉलिसी, शेतीचा व औद्योगिक माल, सोन्याचांदीचे दागिने, ह्यांच्या तारणावर बँक सभासदांस कर्ज देतें.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

## आपली बचत

आपण कोणत्याहि बँकेंत ठेवूं शकतां, पण आपल्या कुटुंबासाठी व राष्ट्रासाठी

बचतीची संवय लावून घ्या.

## दि सारस्वत

### को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

सर्वांत मोठ्या व सर्वांत सक्षम बँकेप्रमाणें आपल्या ठेवीवर व्याज देत आहे.

**४३ हून अधिक वर्षें, अल्प उत्पन्नाच्या नागरिकांच्या अविरत सेवेंत.**

कर्जाचें ठेवीशीं प्रमाण : ३३ टक्के

सरकारी रोख्यांचें ठेवीशीं प्रमाण : ७० टक्के

मुख्य कचेरी : सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई ४. [ जेलि. २७०९४

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.

-:आर्थिक स्वावलंबन हेंचि एक ध्येय:-

## दि सातारा डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा

—३० जून, १९६२ चें आर्थिक दर्शन—

| | |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | ... ५५ लाख |
| वसूल भाग भांडवल व स्वतःचे निधि | ... ४४ लाख |
| ठेवी | ... १६३ लाख |
| बँकेनें दिलेलीं कर्जें | ... २५५ लाख |
| इतर गुंतवणूक | ... ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... ३४६ लाख |

ठेवीदारांच्या सेवेशीं सदैव दक्ष असलेल्या व बँकिंगचे सर्व व्यवहार विशेष सवलतीनें करणाऱ्या आपल्या बँकेच्या जिल्ह्यांतील कुठल्याहि कचेरीला भेट द्या.

प्रे. ल. कर्नाटकी, मॅनेजर — र. दौ. पाटील, चेअरमन

## डायरेक्टर्सना काढणें

एखादा डायरेक्टर वेडा झाला अगर नादार ठरला, अगर त्यानें पात्रतेचें भाग-भांडवल घेतलें नाहीं, अगर त्यानें भाग-भांडवलाचे हप्ते दिले नाहींत, अगर तो बोर्डाच्या तीन बैठकांना लागोपाठ गैरहजर राहिला, अगर त्यानें कंपनीकडून कर्ज घेतलें, अगर त्याच्यावर एखादा नीतिविरुद्ध गुन्हा शाबीत झाला, तर त्याला आपली जागा सोडावी लागते. जागा सोडल्यावर डायरेक्टरचें काम करीत राहणें धोक्याचें आहे. कारण त्याबद्दल दररोज रु. ५०० दंडाची शिक्षा ठेवण्यांत आली आहे. एखाद्या डायरेक्टरला काढावयाचें झाल्यास कंपनीच्या एखाद्या सभासदानें कंपनीस १४ दिवसांची खास नोटीस दिली पाहिजे. नंतर कंपनी डायरेक्टरला काढण्यासाठी आलेल्या ठरावाची ७ दिवसांची नोटीस सभेपूर्वी सर्व सभासदांना देते. संबंधित डायरेक्टरला आपलें म्हणणें कंपनीमार्फत सभासदांना ऐकवतां येईल. डायरेक्टरला काढण्यासाठी साधा ठराव चालतो. अशा काढलेल्या डायरेक्टरला काढल्याबद्दल नुकसानभरपाई मागण्याचा हक्क आहे. कंपनीच्या साधारण बैठकींत मॅनेजिंग डायरेक्टरला जागेवरून काढून टाकण्यांत आलें तर त्याला मॅनेजिंग डायरेक्टरशिपसंबंधींचा करार मोडल्याबद्दल नुकसान-भरपाई मागतां येते कीं नाहीं असा प्रश्न उपस्थित होतो. हा प्रश्न कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील तरतुदीवर अवलंबून आहे. चांगल्या तऱ्हेनें करण्यांत आलेल्या बहुतेक आर्टिकल्समध्यें डायरेक्टरचें पद गमावल्यामुळें अधिकाराची जागा गेल्यास, ह्या परिस्थितींत कराराच्या शर्तींना प्राधान्य देण्यांत आलेलें असतें. कंपनी कायद्यांतील कलम ९ हें आर्टिकल्सपेक्षा अधिक अधिकृत केलें गेलें असल्यानें कराराच्या शर्तींनाच अशा परिस्थितींत महत्त्व प्राप्त होतें.

## डायरेक्टर्सचे अधिकार आणि कामें

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचीं मुख्य कामें पुढीलप्रमाणें आहेत: (१) नफ्याचा दर ठरविणें (२) नव्या भांडवलाची रचना ठरविणें (३) शेअरहोल्डर्सचे विश्वस्त ह्या नात्यानें कंपनीच्या कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवणें (४) चालकांना योग्य ते प्रश्न विचारणें (५) निरनिराळया कंपनींत डायरेक्टर होऊन त्यांच्यांत संबंध राखणें (६) वरिष्ठ नोकरवर्गाच्या नेमणुका करणें अगर त्यांना काढणें, त्यांचे पगार वगैरे ठरविणें (७) नव्या नोकरीच्या जागा निर्माण करणें, जुन्या रद्द करणें अगर असणाऱ्या जागांत बदल करणें (८) कोणता माल करणें, किती करणें, त्याची किंमत ठरविणें, इत्यादि. साधारण सभेंत कंपनीलाच फक्त ज्या गोष्टी करतां येतात त्या सोडून बाकीच्या सर्व गोष्टी बोर्डाला करतां येतात. सार्वजनिक कंपनीच्या बोर्डाला अगर खाजगी उपकंपनीच्या बोर्डाला पुढील गोष्टी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीशिवाय करतां येत नाहींत. (१) कंपनीचा धंदा पूर्णांशानें विकणें अगर भाडेपट्टयानें देणें (२) डायरेक्टरांकडून येणें असलेल्या रकमेची सूट देणें अगर तीसाठीं मुदत देणें. बँकिंग कंपनीनें आपल्या डायरेक्टरला धंद्यांतील मामुली पद्धती-प्रमाणें दिलेल्या कर्जाची मुदत मात्र वाढवितां येते. (३) कंपनीचा धंदा सक्तीनें ताब्यांत घेतला गेल्यास मिळणारी नुकसान-भरपाई ट्रस्ट रोख्यांत न गुंतवितां इतरत्र गुंतविणें. (४) कंपनीचें वसूल भांडवल आणि मुक्त निधि ह्यापेक्षा अधिक रक्कम कर्जाऊ काढणें. तात्पुरतीं कर्जे, क्रेडिट्स् ह्यांसारखे व्यवहार अपवाद आहेत. कर्जाच्या अंतिम मर्यादा शेअरहोल्डर्सनीं ठराव करून ठरवावयाच्या असतात. (५) कोणत्याहि एखाद्या आर्थिक वर्षी धर्मदाय अगर इतर निधीसाठी २५,००० रुपयांपेक्षा अगर त्यापूर्वीच्या तीन वर्षांत झालेल्या निव्वळ नफ्याच्या ५ टक्क्यांपेक्षा कमी रक्कम देणगी म्हणून देणें. असा निधि कंपनीच्या धंद्याशीं संबंधित असतां कामा नये. नव्या २९३ अ कलमाप्रमाणें कंपनीच्या सर्वसाधारण सभेलाहि राजकीय पक्षांना अगर राजकीय हेतूसाठी वरील रकमेपेक्षा अधिक रक्कम देण्याचा अधिकार नाहीं. धर्मदाय व इतर निधीसाठी द्यावयाच्या रकमांची अंतिम मर्यादा सर्वसाधारण सभेनेंच ठरवावयाची आहे. नव्या दुरुस्त कायद्याचा परिणाम असा झाला आहे कीं, राजकीय पक्षांना द्यावयाच्या देणग्या बोर्डाच्या अखत्यारांत आल्या असून, रु. २५,००० पेक्षा अधिक मोठ्या देणग्या धर्मदाय अगर इतर निधींना देण्यांत आल्या असल्या तर सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणें जरूर झालें आहे. राजकीय पक्षांना देण्यांत आलेल्या देणग्यांचा निर्देश नफातोटापत्रकांत करावा लागतो. शिवाय एकूण रक्कम आणि पक्षाचें नांवहि द्यावें लागतें.

## बोर्डाच्या बैठका आणि वृत्तान्त

प्रत्येक तीन महिन्यांच्या कालांत निदान एक तरी बोर्डाची बैठक घेणें जरूर असतें. ह्याचाच अर्थ असा कीं वर्षांतून ४ तरी बोर्डाच्या बठका घेण्यांत याव्या. बोर्डांतील एकूण सभासदांच्या संख्येची एक-तृतीयांश संख्या अगर दोन डायरेक्टर्स, ह्यांपैकी जी संख्या अधिक असेल ती कोरम म्हणून धरली जाते. बोर्डाचे ठराव कोरम-बाबतचे नियम पाळून पत्रानें मंजूर करतां येतात. तथापि कांहीं बाबतींत असे ठराव चालत नाहींत. ह्या बाबी अशा: शेअर्सवरील कॉल मागणें, डिबेंचर्स काढणें, डिबेंचर्सखेरीज इतर मार्गांनीं कर्जे काढणें, कंपनीचे पैसे गुंतविणें, कर्जे देणें, इत्यादि. दुरुस्त कायद्या-प्रमाणें आतां कर्जे काढणें, कर्जे देणें, पैसे गुंतविणें इत्यादि कामें बोर्डाच्या कमिटीकडे अगर मॅनेजिंग एजंट अगर डायरेक्टर ह्यांच्या-कडे सोंपवितां येतात. बँकिंग कंपन्यांचे कर्जे देण्याघेण्याचे व्यवहार मात्र अपवाद आहेत. बोर्डाच्या सभेचे व कमिट्यांच्या सभेचे वृत्तान्त सभेनंतर चौदा दिवसांचे आंत तयार करण्यांत आले पाहिजेत व ते योग्य त्या पुस्तकांत लिहिण्यांत आले पाहिजेत. वृत्तान्त टंकलिखित करून पुस्तकांत डकविण्यावर बंदी घालण्यांत आलेली आहे. वृत्तान्त हातानेंच लिहिण्यांत आले पाहिजेत असें बंधन आहे. वृत्तान्त लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर अध्यक्षाची सही असली पाहिजे, आणि अखेरच्या पाना-वर त्याची अगर पुढील सभेच्या अध्यक्षाची सही आणि तारीख असली पाहिजे. वृत्तान्त डायरेक्टरांकडे पत्रानें पाठविण्याची व पुढील बैठकीच्या वेळीं त्यांना मंजुरी घेण्याची प्रचलित पद्धत दुरुस्त कायद्याप्रमाणें बरोबर नाहीं.

कोठल्याहि सार्वजनिक अगर खाजगी कंपनीला मध्यवर्ती सरकारच्या आगाऊ परवानगीशिवाय प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें कंपनीच्या कोणत्याहि डायरेक्टरला कर्ज देतां येणार नाहीं अगर अशा कर्जाच्या परतफेडीबद्दल कोणाला हमी देतां येणार नाहीं. बँकिंग कंपन्यांनीं हमी दिलेलीं कर्जे, मॅनेजिंग एजंटांनीं ते चालवीत असलेल्या कंपनीला दिलेलीं कर्जे, आणि मूळ कंपनीनें उपकंपनीला दिलेलीं कर्जे मात्र अपवाद आहेत. ह्या कलमाचा भंग करून कर्जे घेतल्यास कर्ज घेणाऱ्याला ५,००० रुपयांपर्यंत दंडाची अगर ६ महिनेपर्यंत कैदेची शिक्षा ठेवण्यांत आली आहे. एखाद्या कंपनीच्या डायरेक्टरला अगर त्याच्या नातेवाइकाला त्याच कंपनीशीं खरेदी-विक्रीचा, अगर तिच्यातर्फे शेअर्सची हमी घेण्याचा करार, बोर्डाच्या परवानगीशिवाय करतां येणार नाहीं. तथापि रोख किंमत घेऊन बाजारभावानें विक्रीचे व्यवहार करणें परवानगीशिवाय करतां

येईल. मात्र विक्रीचे व्यवहार डायरेक्टरच्या नेहमींच्या व्यवसायांतील असले पाहिजेत आणि त्यांची किंमत दरसाल ५,००० रुपयांपेक्षा अधिक नसली पाहिजे. विमाकंपन्या आणि बँकिंग कंपन्या ह्यांच्या व्यवहारांतील नेहमींचे सौदे अपवादभूत आहेत. तांतडीच्या बाबतींत बोर्डाची परवानगी न घेतांहि रु. ५,००० पेक्षां अधिक किंमतीचा माल पुरविण्याबाबत करार करतां येईल. मात्र अशा कराराला तीन महिन्याच्या आंत बोर्डाची मंजुरी मिळवावी लागेल. ही मंजुरी पत्रानें दिलेली चालणार नाहीं; बोर्डाच्या बैठकींतच ती घेतली पाहिजे. संबंधित कलमाचा भंग करून करार केल्यास तो बोर्डाच्या मर्जीला वाटल्यास रद्द करतां येईल.

## डायरेक्टरांचे हितसंबंध

कंपनीच्या एखाद्या व्यवहारांत एखाद्या डायरेक्टरचा हितसंबंध असल्यास त्या डायरेक्टरानें बोर्डाच्या बैठकींत आपला हितसंबंध स्पष्टपणें सांगितला पाहिजे. एखाद्या कंपनीच्या डायरेक्टराचे दुसऱ्या एखाद्या कंपनींतील वसूल भांडवलापैकीं २ टक्क्यापेक्षा अधिक भांडवल मालकीचें नसलें तर त्याला आपले हितसंबंध बोर्डाच्या बैठकींत उघड करून सांगण्याचें कारण नाहीं. २९७ कलमाचा त्रास देण्यासाठी उपयोग करतां येऊं नये म्हणून व किरकोळ बाबी बोर्डापुढें येऊं नयेत म्हणून ही तरतूद करण्यांत आली आहे. २९७ अगर २९९ कलमांत बसणारे सर्व करार एका वेगळ्या रजिस्टरांत नोंदून ठेवावे लागतात. तथापि रु. १,००० पेक्षा अधिक किंमतीचे नसलेले करार त्या त्या वर्षासाठी रजिस्टर-मध्यें नोंदवावे लागतात. रु. ५,००० पेक्षा कमी किंमतीचे करार बोर्डाच्या संमतीशिवाय करतां येत असले तरी त्यांचीहि नोंद रजिस्टरांत करावी लागते. कलम ३००, प्रमाणें कोणत्याहि डायरेक्टराला त्याचा हितसंबंध असलेल्या कोणत्याहि करारावरील चर्चेत भाग घेतां येणार नाहीं अगर त्यावर मत देतां येणार नाहीं. उद्योगधंद्याची प्रगति साधण्यासाठी मध्यवर्ती सरकारला ह्या कलमांतून एखाद्या सार्वजनिक अगर खाजगी उप-कंपनीची मुक्त करतां येईल. ३०२ कलमाप्रमाणें मॅनेजरच्या, मॅनेजिंग डायरेक्टरच्या, मॅनेजिंग एजंटसूच्या, सेक्रेटरीच्या अगर खजिनदाराच्या नेमणुकीबाबत एखाद्या डायरेक्टरचा हितसंबंध असल्यास अशा हितसंबंधाची नोटीस कंपनीच्या सभासदांना देण्याचें बंधन आहे. एखाद्या डायरेक्टरला अगर त्याच्या भागी-दाराला अगर नातेवाइकाला ५०० रुपये अगर ५०० रुपयां-पेक्षा अधिक मासिक मेहनताना असलेली जागा स्वीकारतां येणार नाहीं. अशी जागा स्वीकारावयाची असल्यास कलम ३१४ प्रमाणें खास ठराव करून कंपनीची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल. अशा जागेची पगाराची श्रेणी खास ठरावानें कालावर ठरविण्यांत आलेली असल्यास पुढील बढती देण्यासाठी खास ठरावाची जरुरी लागणार नाहीं. अशी नेमणूक चुकीनें करण्यांत आल्यास नेमणूक झाल्यापासून तीन महिन्यांच्या आंत खास ठराव करून ती दुरुस्त करता येईल. ह्या कलमाच्या विरुद्ध वागून एखाद्या डायरेक्टरानें अशी जागा स्वीकारल्यास त्याला आपलें डायरेक्टराचें पद गमवावें लागेल आणि जागा स्वीकारण्यामुळें मिळालेला मुशाहिरा परत करावा लागेल.

## डायरेक्टर्सना मिळणारा मेहनताना

डायरेक्टर्सना द्यावयाचा मेहनताना आर्टिकल्सप्रमाणें ठरविण्यांत येतो, अगर त्यासाठी कंपनी साधारण अगर खास ठरावहि करूं शकते. दुरुस्त कायद्याप्रममाणें आतां पूर्ण वेळ काम करणारे डायरेक्टर्स व मॅनेजिंग डायरेक्टर्स ह्यांनाच फक्त मासिक पगार घेता येतो. ज्या डायरेक्टरांना २८ डिसेंबर १९६० पूर्वी मासिक फी देण्यांत येत होती त्यांना त्या तारखेपासून दोन वर्षेपर्यंत अगर त्यांची मुदत संपेपर्यंत, दोहोंपैकीं जो कमी काळ असेल तेथपर्यंत तशीच फी देता येईल. पूर्ण वेळ काम करणारे डायरे-क्टर्स व मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांना मासिक वेतन देतां येईल अगर निव्वळ नफ्यांतील कांहीं टक्केवारी देतां येईल. अगर अंशतः दोन्ही तऱ्हांनीं वेतन देतां येईल. मध्यवर्ती सरकारची मंजुरी घेतल्या-खेरीज हें वेतन एका डायरेक्टराला निव्वळ नफ्याच्या पांच टक्क्यापेक्षा अधिक असूं शकणार नाहीं. डायरेक्टर्स एकापेक्षा अधिक असतील तर सर्वांना मिळून १० टक्क्यापेक्षा अधिक असूं शकणार नाहीं. कंपनींत जर मॅनेजिंग डायरेक्टर अगर पूर्ण वेळ काम करणारा डायरेक्टर असेल तर इतर अपुरा वेळ काम करणाऱ्या डायरेक्टरांना (मासिक वेतन देण्यांत येत नसेल तर) निव्वळ नफ्याच्या एक टक्क्यापर्यंत कमिशन देतां येईल. इतरांना शेअर होल्डर्सचा ठराव करून निव्वळ नफ्याच्या तीन टक्क्यापर्यंत कमिशन देतां येईल. ह्यासाठी विशेष ठराव करावा लागतो. ह्या दरापेक्षा अधिक दरानें वेतन द्यावयाचें असेल तर मध्यवर्ती सरकारची परवानगी आणि साधा ठराव ह्यांची जरुरी लागते. कंपनीच्या कामानिमित्त होणारा प्रवास खर्च आणि जेवण्याराहण्याचा खर्च डायरेक्टर्सना देण्याची व्यवस्था बहुधा आर्टिकल्समध्यें करण्यांत आलेली असते.

एखाद्या कमिटीवर काम करणारा डायरेक्टर, अगर कंपनीच्या व्यवसायाकडे खास लक्ष पुरविणारा डायरेक्टर, अगर डायरेक्टरच्या नेहमींच्या कक्षेपलिकडील एखादें काम करणारा डायरेक्टर ह्यांना ऑर्टिकल्समध्यें तरतूद केली असेल तर खास पगार अगर नफ्यां-तील वांटा देता येईल. आर्टिकल्समध्यें व्यवस्था असेल तरच डायरेक्टरांना वेतन घेतां येतें; केवळ डायरेक्टर आहे म्हणून घेता येत नाहीं. ३०९ कलमाप्रमाणें फक्त मॅनेजरच्या पदाचें वेतन ठरविण्यांत आलेलें आहे. त्यांत तांत्रिक कामाबद्दलच्या वेतनाचा अंतर्भाव नाहीं. ३४८ कलमाप्रमाणें मात्र मॅनेजिंग एजंटाच्या मेहनतान्याचा जास्तींत जास्त मर्यादेंत तांत्रिक कामाबद्दल द्याव-याच्या मोबदल्याचाहि समावेश करण्यांत आलेला आहे.

## एजंट आणि विश्वस्त

डायरेक्टर्स हे कायद्याच्या दृष्टीनें कंपनीचे एजंटस् असतात. म्हणून त्यांचे परस्पर संबंध त्यासंबंधींच्या म्हणजे प्रिन्सिपल व एजंट ह्यांच्या संबंधींच्या कायद्याप्रमाणें मानण्यांत येतात. कंपनी-तर्फे करण्यांत आलेल्या करारांची जबाबदारी डायरेक्टर्सवर व्यक्तिशः पडत नाहीं. त्यांनीं तशी जबाबदारी घेतली असली तर मात्र गोष्ट वेगळी. पण डायरेक्टर्स हे केवळ एजंटस् नाहींत. एका अर्थानें ते विश्वस्त अथवा विश्वस्तांच्या जागीं असतात. अर्थात् विश्वस्तापेक्षा त्यांचें स्थान वेगळें असतें. उदाहरणार्थ, तशा सूचना नसतील तर कंपनीजवळील वरकड पैसा ट्रस्ट रोख्यांत गुंतविण्याचें बंधन त्यांच्यावर नसतें. त्यांच्या हातांतील अगर त्यांच्या नियंत्रणाखालीं असणाऱ्या पैशाचें ते विश्वस्त अस-तात हें खरें; परंतु ह्याचा अर्थ त्यांचें व भागधारकांचें नातें विश्वस्त व लाभाधिकारी असें असतें असें नाहीं. कोणत्याहि डायरेक्टराला आपल्या स्थानाचा उपयोग करून नफा मिळविता येणार नाहीं. तसें करण्यापूर्वी त्याला आर्टिकल्सचा आधार घ्यावा लागेल अगर कंपनीच्या साधारण सभेंत ठराव करून घ्यावा लागेल. ह्या बाबतींत पुढील निवाडा उद्बोधक आहे. एका कंपनीच्या मालकीचें एक सिनेमागृह होतें. कंपनीला दुसऱ्या दोन सिनेमा-गृहांचें भाग-भांडवल विकत घ्यावयाचें होतें. परंतु कंपनीजवळ

पुरेसे पैसे नव्हते. म्हणून कमी पडलेला पैसा डायरेक्टरांनीं दिला. पुढें ह्या दोन सिनेमागृहांची विक्री झाली व त्या व्यवहारांत कंपनीला व डायरेक्टरांना नफा झाला. कोर्टानें असा निकाल दिला कीं, डायरेक्टरांनीं त्यांना झालेला नफा कंपनीला परत केला पाहिजे. विश्वस्तांसारख्या स्थानाचा उपयोग करून जे लोक नफा मिळवितात त्यांनीं नफा होणाऱ्या व्यवहारांत लबाडीच केली असली पाहिजे, अगर त्यांची वागणूक सरळ नसली पाहिजे, असेंच कांहीं नाहीं. नफा मिळविणारे कितीहि प्रामाणिक अगर शुद्ध हेतूचे असले तरी तें गैरलागू आहे. संबंधित परिस्थितींत त्यांनीं नफा मिळविला कीं नाहीं, हाच काय तो महत्त्वाचा व न्यायाच्या दृष्टीनें मुद्द्याचा प्रश्न आहे. तसा नफा मिळविला असेल तर त्याबद्दलचा जबाब त्यांनीं कंपनीला देणें हेंच रास्त ठरतें. डायरेक्टर्स हे विश्वस्तांसारखे असल्यामुळें डायरेक्टर्स ह्या नात्यानें एका विशिष्ट प्रकारें मतें देण्याचें बंधन ह्यांनीं स्वत:वर घालून घेणें बरोबर होणार नाहीं.

### डायरेक्टर्सनीं व्यावयाची काळजी

आपलें काम करतांना योग्य व वाजवी काळजी घेण्याचें बंधन डायरेक्टर्सवर आहे; त्याचबरोबर प्रामाणिकपणाची अपेक्षाहि त्यांच्याकडून आहे. कंपनीचा कारभार करतांना त्या त्या विशिष्ट धंद्याचें मामुली ज्ञान त्यांना आहे, असें समजलें पाहिजे. तशा ज्ञानाशीं विसंगत अशी त्यांची वागणूक झाल्यास त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका उत्पन्न होण्याचा संभव असतो. असें असलें तरी पुढें झालेल्या घटनांवरून त्यांच्याबद्दलचें मत बनविणें योग्य होणार नाहीं. एकतर व्यापारधंद्यांतील व्यवहार आणि सामान्य जीवनांतील व्यवहार ह्यांच्यांत फरक असतो. दुसरें असें कीं एखाद्या चमत्कारिक व अडचणीच्या परिस्थितींत निरनिराळीं माणसें अगदीं वेगवेगळे निर्णय घेऊं शकतात. त्या निर्णयांच्या परिणामावरून डायरेक्टर्सच्या प्रामाणिकपणाविषयीं शंका घेणें योग्य होणार नाहीं. डायरेक्टरानें आपलें काम करतांना आपल्या इतक्याच तोलाच्या माणसाइतकें कौशल्य प्रकट केलें म्हणजे पुरें. त्यापेक्षा अधिक कुशलता दाखविण्याचें बंधन त्याच्यावर नाहीं. कंपनीच्या कामांतच सर्व लक्ष घालण्याची जबाबदारी डायरेक्टरवर नाहीं. बोर्डाच्या सभेच्या वेळीं अधूनमधून करण्याचें त्याचें काम असतें. त्या सर्वच सभांना त्यानें हजर राहिलें पाहिजे असें नाहीं. तो एखाद्या सभेला अगर सभांना हजर राहिला नाहीं, तर लगेच त्याला निष्काळजीपणा चिकटवितां येणार नाहीं. धंद्याचें स्वरूप व आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमधील तरतुदी ह्यांचा विचार करतां जीं कामें कंपनीच्या नोकरांकडून करून घ्यावयास हरकत नाहीं, अशीं कामें त्यांच्यावर सोपविण्यास डायरेक्टरला हरकत असण्याचें कारण नाहीं. शंका येण्यास जागा नसेल, तर अशीं कामें संबंधित नोकर प्रामाणिकपणें करीत आहे असें समजण्यासहि हरकत नाहीं. ह्या बाबतींत एक निवाडा लक्षांत घेण्यासारखा आहे. एका कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरला सरकारमान्य रोख्याच्या तारणावर कर्जें देण्याचे अधिकार ऑर्टिकल्सप्रमाणें होते. ह्या व्यवहारांना बोर्डाच्या मंजुरीची आवश्यकता होती. कांहीं बाबींत तारण न घेतांहि कर्जें देण्याचे अधिकार मॅनेजिंग डायरेक्टरला मुखत्यारपत्रान्वयें देण्यांत आलेले होते. मॅनेजिंग डायरेक्टरनें १९४६, १९४७, १९४९ ह्या वर्षांत कांहीं कर्जें विनातारण दिलीं हे व्यवहार त्यानें बोर्डापुढें मांडले नाहींत. १९४७ पूर्वीं ज्या डायरेक्टरांच्या नेमणुका झाल्या होत्या व ज्यांना ह्या व्यवहाराचें ज्ञान होतें, त्यांना ह्या व्यवहाराबद्दलची सर्व जबाबदारी झटकून टाकून मोकळे होतां येणार नाहीं, असा निकाल कोर्टानें दिला. हे डायरेक्टर्स जर अधिक जागरूकपणें वागले असते आणि त्यांनीं जर मॅनेजिंग डायरेक्टरकडून हिशेबाचे मासिक तक्ते मागविले असते तर मॅनेजिंग डायरेक्टरानें केलेल्या अयोग्य व्यवहारांचा पत्ता त्यांना लागला असता हें खरें; पण त्यांनीं असें केलें नाहीं याचा अर्थ ते बेजबाबदार, निष्काळजीपणानें अगर हेतुपूर्वक गैर वागले, असा करतां येत नाहीं. कारण, मॅनेजिंग डायरेक्टरच्या अयोग्य गुंतवणुकीची माहिती कळल्याबरोबर त्यांनीं एक चौकशी कमिटी नेमण्याचा ठराव केलेला होता.


# नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,

फोन नं. १४९ ] केंद्र कार्यालय : नाशिक [ पो. बॉ. नं. १९

जिल्ह्यांतील ३० शाखांमार्फत शेती व सहकारी उद्योग यांसाठीं भांडवलाचा पुरवठा करणारी एकमेव बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेलें भाग भांडवल | रु. ५३ लाख | दिलेलीं कर्जें | रु. ३६५ लाख |
| ठेवी | रु. १९१ लाख | खेळतें भांडवल | रु. ४७३ लाख |

सेव्हिंग्ज बँक : २½ टक्के] ठेवींवरील व्याजाचे दर [ मुदतीच्या ठेवी : ३½ ते ५ टक्के

केंद्र सरकारनें गौरविलेली
" अल्प ठेव योजना "
दैनिक ०=२५ न. पैसे किंवा त्याचे पटींत
नियमित ५ वर्षे – ३ टक्के व्याज
तूर्त :-मालेगांव, टिळकरोड शाखा, मालेगांव, येवला, नासिक व सिन्नर शाखेंत सुरू.

खातेदारांची अधिकृत प्रतिनिधि मार्फत घरपोंच सेवा

बँकेनें नव्यानें सुरू केलेल्या
" रिकरिंग ठेव ".
योजनेंत दरमहा रु. ५, १० रु. व त्याचे पटींत १ ते ५ वर्षे नियमितपणें बचत केल्यास भरपूर व्याजासह परत मिळतात.

वि. ना. कायदे, मॅनेजर. श्री गो. पुराणिक, चेअरमन.

# बँकेचा चेअरमन कसा असावा ?

बँकेच्या चेअरमनचीं कामें बँकेप्रमाणें भिन्न असतील. एका बँकेचा चेअरमन रोजच्या व्यवहारांत भरपूर लक्ष घालील, तपशिलांत शिरेल तर दुसऱ्या बँकेचा चेअरमन तें काम सर्वस्वी मॅनेजरावर व त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यांवर सोपवील. पण, प्रत्येक बँकेंत मॅनेजरनें बोर्ड ठरवील त्याचीच अंमलबजावणी केली पाहिजे. धोरणें ठरविण्याचें काम बोर्डाचें आहे; त्या बाबतींत बोर्ड अधिकाऱ्यांचा सल्ला घेईल; पण मुख्य जबाबदारी चेअरमन-वरच पडते. बोर्डावरील इतर डायरेक्टरांमध्यें धोरणाच्या बाबतींत एकमत घडवून आणणें आणि त्याप्रमाणें अधिकाऱ्यांना स्पष्ट, असंदिग्ध सूचना देणें हें चेअरमनचें कर्तव्य असतें.

बोर्डाचे अधिकार आणि हुकमत किती आणि अधिकाऱ्यांची किती, हें इतर जॉइंट स्टॉक कंपन्यांप्रमाणें बँकांतहि संबंधित माण-सांच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून राहते. जी गोष्ट आपल्याला पटत नाहीं, ती चेअरमननें करायला सांगितली तरी त्याला स्पष्ट नकार देणारे समर्थ मॅनेजर असूं शकतात. पण तो अपवादच समजायला हवा.

चेअरमनला चांगलीं माणसें पारखून वेचून घेतां यायला हवींत. बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतांना त्याच्याच मताला महत्त्व मिळायला हवें. हें काम त्याला जबाबदारीनें पार पाडतां यावयाचें असेल, तर त्याचा सर्व नोकरांशीं परिचय व्हायला हवा. म्हणजे, त्यानें वेगवेगळया शाखांना वरचेवर भेटी दिल्या पाहिजेत. नव्या शाखा उघडण्याचे आणि इतर समारंभ आणि स्टाफच्या बोलाविलेल्या बैठका, ह्यांस त्यानें न चुकतां उपस्थित राहायला हवें. बोर्डावरील आपले सहकारीहि त्यानेंच निवडावयाला हवेत; आपल्या मागून कोण चेअरमन व्हावा, हें त्यानेंच योजून त्याला त्या जागेसाठी तयार करायला हवा. कित्येक नामवंत, यशस्वी, चेअरमननीं ह्या बाबतींत जबाबदारी पार पाडलेली नाहीं, असा कितीतरी बँकांचा अनुभव आहे. माझ्या पाठीमागून कांहीं का होईना, ह्या वृत्तीमुळें संस्थेचें अपरिमित नुकसान होऊं शकतें.

बँकेच्या अंतर्गत कारभारांत 'यथा राजा तथा प्रजा' ही म्हण तंतोतंत लागूं पडते. चेअरमनची जशी छाप पडेल, तसें बँकेचे नोकर वागणार. बाहेरच्या जगाशीं वागतांना तो बँकेचें प्रतिनिधित्व करीत असतो; तो म्हणजे बँकेचें प्रतिबिंबच होय. उदाहरणार्थ, रिझर्व्ह बँकेनें बोलाविलेली बँकर्सची परिषद किंवा इंडियन बँक्स असो-सिएशनची सभा, अशा प्रसंगीं बँकिंगविषयीं सर्वसामान्य धोर-णाची चर्चा होते आणि निर्णय घेतले जातात. इतर एखाद्या क्षेत्रांत चेअरमन कितीहि लायक आणि नामवंत असला तरी त्यानें बँकिंगचा कसून अभ्यास केलेला नसेल, तो त्या बाबतींत नवशिक्या असेल, तर त्याच्या बँकेस तें अनुपकारक ठरेल.

वार्षिक सभेतील आपल्या भाषणाच्या द्वारें बँक चेअरमन भागदारांना भेटत असतो. कांहीं चेअरमन स्वतःचीं मतें मांडताना मॅनेजरनें विटा मांडून चुना ओतला असला, तरी आर्किटेक्ट हा चेअरमनच असतो. ह्या उलट, कांहीं बँकांच्या चेअरमनचीं भाषणें तळघरांतल्या कारकुनांनीं तयार केलेलीं असतात; चेअरमन उपसंपादकाचें फक्त काम करतो!

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांवरील आपलीं मतें बँकेच्या भागदारांच्याच नव्हे, तर सर्व जनतेच्या हितासाठी व्यक्त करणें हेंहि चेअरमनच्या कक्षेंत येतें का? असा प्रश्न कित्येकदा विचारला जातो. त्यानें बँकेच्या कारभारापलीकडे वक्तव्यें कां करावीं? ताळेबंद, नफातोटापत्रक, पुढील वर्षाच्या नफ्याचा अंदाज, ह्याचेबाहेर त्यानें लुडबुड कां करावी? ह्याचें कारण असें कीं, आर्थिक धोरणें आता बँकांच्या द्वाराच अमलांत आणलीं जातात; त्याचा बँकांच्या लक्षावधि गिऱ्हाइकांवर परिणाम होत असतो. अशा धोरणांची इष्टानिष्टता आणि त्यांचे अपेक्षित परिणाम ह्यांची जाणीव बँकरला योग्य प्रकारें असूं शकते. ज्या व्यवहारांशीं त्याचा घनिष्ट संबंध येतो त्यांचेसंबंधीं मत व्यक्त करणें हें त्याचें कर्तव्यच ठरतें. आपल्या देशाचा आर्थिक कारभार कसा चालवला जात आहे, हें समजण्याचें उत्कृष्ट आणि विश्वासाहे साधन ह्या दृष्टीनें त्याच्या भाषणाकडे व्यापारी वर्ग बघत असतो. ज्या बँकेचा चेअरमन हिशेबपत्रकांपलीकडे बघत नाहीं, बोलत नाहीं, त्याच्या दृष्टिकोण विशाल नाहीं, त्याला दृष्टीच नाहीं, असें समजलें जाऊन त्याच्या बँकेच्या सुबुद्ध गिऱ्हाइकांवर दुष्परिणाम झाल्याविना राहणार नाहीं.

व्यापक दृष्टिकोण, व्यावहारिक अनुभव, ह्यांना महत्त्व निर्विवाद आहे; पण त्यांच्या जोडीला बँकेच्या इमारतीबाहेरील क्षितिजांकडे ज्याचें लक्ष आहे, जो स्वतः अवलोकन करून, दुसऱ्यांच्या अवलोकनाचा तारतम्यानें विचार करून, त्याची छाप बँकेवर पाडूं शकतो, असाच चेअरमन असायला हवा.

### रिकाम्या खिशाचे बडे लोक

जितका मनुष्य मोठा, तितकी त्याची पत जास्त; जवळ बाळ-गावयाची रोख रक्कम कमी. राणीच्या खिशांत कधींच पैसे नस-तात. कोट्यधीशांना चिल्लर कधींच लागत नाहीं. मोठ्या लोकांचे सेक्रेटरी, मोटार ड्रायव्हर, इत्यादि नोकरांच्या जवळ मात्र भरपूर चिल्लर ठेवलेली असते.


फोन नं. ४२४८४

माधवाश्रम प्रा. लि.

तार : माधवाश्रम बॉम्बे

भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.

तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था. ● विवाह-कार्यांची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय. ● कुटुंबासह राहणारांसाठी स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम प्रा. लि., गिरगांव, मुंबई ४. ★

# कर्जे देतांना काय पाहणार ? : नफा कीं सुरक्षितता ?

जें कर्ज बुडण्याचा संभव आहे, असें कर्ज बँका कधींच देत नाहींत. जेव्हां कर्ज बुडतें, तेव्हां कांहींतरी अनपेक्षित घडलेलें असतें, असें म्हणायला हरकत नाहीं. कर्ज बुडण्याचा धोका टाळायचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे योग्य प्रकारच्या, पुरेशा तारणाखेरीज कर्ज न देणें.

एखाद्या जुन्या गिऱ्हाइकाला किंवा चांगल्या घराण्यांतल्या पण बेताच्या प्राप्तीच्या ओळखीच्या माणसाला तारण न घेतां कर्ज देण्यास नकार देणें जिवावर येतें. पण, बँकिंगमध्यें भावनेला फारशी जागा नसते. एखाद्याचे बरोबर पत्ते खेळायला जाण्यास नकार देतांना जेवढें वाईट वाटेल, त्यापेक्षा जास्त, कर्जाला नकार देतांना वाईट वाटून चालणार नाहीं. संकोचाला बँकिंगच्या क्षेत्रांत जागाच नाहीं.

" तारण योग्य प्रकारचें आणि भरपूर असावें, हें मान्य केलें, तरी प्रत्येक बाबतींत त्याचा आग्रह धरतां येत नाहीं; कारण त्यामुळें कांहीं चांगलीं खातीं दुसऱ्या बँकेंत जाण्याचा संभव असतो." असें म्हटलें जातें. तुमच्या अटी फार कडक आहेत, इतर बँका जास्त सवलती देतात, अशी गिऱ्हाईक तक्रार करतात. त्याबाबत चौकशी केली, तर त्या तक्रारी खोट्या असल्याचेंच आढळतें. तरीसुद्धां, ठराविक नियमांचा आग्रह धरला तर कांहीं खातीं दुसरीकडे जाण्याचा संभव राहणारच; हा संभवहि टाळण्याचा बँकांचा प्रयत्न असतो. साहजिकच, नियम थोडा सैल करावासा वाटतो. त्यामुळें, सुरक्षितपणाची रेषा ओलांडली जाण्याचा धोका असतो. हा धोका सर्वच बँकांना पटला, तर त्याला मर्यादा घातली जाईल व पाळली जाईल.

बिगर-तारणाच्या प्रत्येक व्यवहाराची सुरक्षितता कर्जदाराची आर्थिक परिस्थिति आणि पत ह्यांच्या केलेल्या मूल्यमापनावर अवलंबून राहते. पण, " माझा निष्कर्ष अचूक ठरेल " असें कोणीतरी निश्चयपूर्वक सांगूं शकेल का ? योग्य तारणाची बरोबरी त्याला करतां येईल का ? एका बँकेनें, समजा, एका गिऱ्हाइकाला कांहीं तारण न घेतां, त्याच्या पतीच्या लौकिकावर १०,००० रु. तीन महिन्यांसाठी कर्जाऊ दिले. पण त्याला त्यांतले फक्त २,००० रु. परत करतां आले, बाकीची रक्कम वसूल होऊं शकली नाहीं. बँकेला ह्या व्यवहारांत फार तर १०० रु. नफा झाला असता; पण प्रत्यक्ष नुकसान मात्र ८,००० रु. झालें. दहापैकी नऊ बाबतींत बँकरचा अंदाज बरोबर ठरला, तरी उरलेल्या एका प्रकरणांत जी खोट येईल तिच्यामुळें बाकीच्या सर्व व्यवहारांतील नफा नाहींसा होईल; पत्करलेला धोका, केलेले कष्ट आणि वाहिलेली चिंता ह्यांच्या वांट्याला शेवटीं तोटाच उरेल.

बिगर-तारणाचीं कर्जें बहुधा सत्वर फेडलीं जात नाहींत. कर्जदार कर्जफेड होण्यापूर्वीं मृत्यु पावण्याचा संभव असतो; अशा प्रसंगीं, कर्जफेड होणें खूपच लांबणीवर पडतें.

तारणाशिवाय कधींहि कर्ज न देणें, हाच सर्वांत सुरक्षित नियम आहे. शेंकडों बाबतींत तो नियम कटाक्षानें पाळला तरी भागणार नाहीं; कारण एखाद्या प्रकरणांतील नुकसानीनें सगळ्या यशावर पाणी पडेल. प्रत्येक बाबतींतच त्याची कसोशीनें अंमलबजावणी झाली पाहिजे.

जेव्हां एखादा घरदारवाला पैसे कर्जाऊ मागतो, तेव्हां त्याची मालमत्ता गहाण लावून घेणें ही नित्याची बाब असते; त्यांत कांहीं विशेष आहे असें कुणालाच वाटत नाहीं. अशाच प्रकारचें इतर तारण न घेतां बँकेनें कर्ज द्यावें, अशी कर्जदारांनीं अपेक्षा कां बाळगावी ? तात्पुरतें कर्ज आणि मालमत्तेच्या तारणावरील दीर्घकालीन कर्ज ह्यांत फरक आहे, असें म्हटलें जाईल. पण, तात्पुरत्या मुदतीचें कर्ज सुरक्षित राहीलच, असें अनुमान काढणें मात्र चुकीचें ठरेल. तात्पुरत्या कर्जाचें पुढें संशयित आणि बुडीत कर्जांत रूपांतर झाल्याचीं उदाहरणें नेहमीं घडून येतात.

कांहीं कर्जदारांना तारणाशिवाय कर्ज दिलें आणि कांहींकडून मात्र तारण मागितलें, तर बँकरवर वशिलेबाजीचा आरोप केला जाईल. तारण न देणारांपैकी कोणता धोकादायक आणि कोणता नाहीं, ह्याची बिनचूक विभागणी करतां येणें अशक्य आहे. अ गरीब वाटतो म्हणून त्याच्याकडून तारणाची मागणी करावयाची, पण ब श्रीमंत दिसतो म्हणून त्याला तारणाशिवाय जरूर तें कर्ज द्यावयाचें, हें रूढीला धरून आहे; पण दोघांचेहि कडून तारण घेणें न्यायाचें होणार नाहीं काय ? इतरांना बिगर-तारण कर्ज दिलें जात असतांना आपल्यासारख्या जुन्या खातेदाराला तें नाकारलेलें अ ला खपणार नाहीं. ज्यांचेजवळ तारण देण्याला भरपूर आहे, ते तारण देण्यास इतका विरोध करीत नाहींत; ज्यांचेजवळ नाहीं तेच वाद घालतात. "तारण मी केव्हांहि देऊं शकेन; पण आमच्यासारख्यांनीं तें देण्याला माझा तत्त्वत: विरोध आहे" असें ते सांगतात !

बुडीत होण्याचा संभव असणारें कर्ज जाणूनबुजून कोणताच बँकर देत नाहीं. परंतु, बिगर–तारणाच्या कर्जांचे बाबतींत बहुधा अनपेक्षित घटना घडतात. बिगर–तारणाचीं कर्जें मुळींच न देण्याचा निर्धार सर्व बँका करीत नाहींत, तोंवर अशीं कर्जें दिलीं जाणारच. पण अशा ओव्हरड्राफ्टवरचा नफा पुढील नुकसानी खाऊन टाकील, हें लक्षांत बाळगायला हवें. ह्यापुढें तारण न घेतां कर्जें न देण्याचा करार सर्व बँका एकत्र येऊन करूं शकणार नाहींत का ?

सचोटीला बँकिंगच्या व्यवहारांत कांहीं स्थान आहे किंवा नाहीं, असा प्रश्न उपस्थित होतो.

सचोटी हेंहि एक प्रकारचें तारणच असलें, तरी अनपेक्षित आपत्तीपुढें सचोटीचा आणि सत्प्रवृत्तीचा टिकाव लागूं शकत नाहीं. सचोटी ओळखणें हें कांहीं सोपें काम नाहीं. बँकर हाहि माणूसच असतो; तो भावनेच्या आहारीं जाऊन लक्ष्मण–रेषा केव्हां ओलांडण्यास प्रवृत्त होईल, हें कोणीं सांगावें ?

एखाद्या साधारण उत्पन्नाच्या गिऱ्हाइकानें तारण न देतां तात्पुरतें कांहीं कर्ज मागितलें आणि त्याची अडचण अनपेक्षित असल्याचें बँकरला पटलें, कर्जफेडीसाठी लागणारी रक्कम त्याच्या हातीं लवकरच येणार असल्याचें आढळून आलें, त्याच्याशीं पूर्वीं झालेले व्यवहार समाधानकारक असले, त्यावरून त्याची सरळ वृत्ति दिसून आली असली, तर त्याचे बाबतींत अपवाद करायला हरकत नाहीं. असें कर्ज देणें म्हणजे दृष्टिक्षेपांत असलेल्या पैशाकडे पाहूनच कर्ज देणें होय; कर्जदाराची आयत्या वेळीं बुद्धि फिरली आणि तो दीर्घकाळ जतन केलेली पत घालविण्यास एकाएकी प्रवृत्त झाला, तर गोष्ट वेगळी. एखाद्याला धंद्यांत घालण्यासाठी विना-तारण कर्ज देणें आणि वरील प्रकारची तात्कालिक, अपवाद म्हणून मदत करणें, ह्यांत फरक आहे.

सुरक्षितपणाच्या कसाला लावूनच कर्जें दिलीं पाहिजेत; नफ्याकडे पाहून नाहीं. एखाद्या खात्याच्या व्यवहारांत बँकेला होणाऱ्या नफ्याच्या आशेनें, मुद्दल गमावण्याची तयारी घातकच ठरते.

# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणें ४.
फोन नं. ५७१८६

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें.
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या, व प्रत्येक खोलींत पंखा.

**शिवाजीराव शिरोळे,**
मॅनेजिंग पार्टनर

**पत्रानें आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.**



# सरदारगृह

**मुंबईत**
**राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी
सोईस्कर ठिकाण.

☆

—आमचीं वैशिष्टें—

☆ हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

☆ टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७ सरदारगृह प्रा. लि. तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.



# सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | ... | रु. ३२,५१,४०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | | रु. ४,२५,८८४ |
| ठेवी | ... | रु. १,१३,४४,५६६ |
| खेळतें भांडवल | ... | रु. दोन कोटी, ६९ लाखांचे वर |

★(१) सांगली जिल्ह्यांत बँकेच्या ११ शाखा कार्य करीत आहेत.
★(२) सरकारनें या बँकेचे रु. ८ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.
★(३) सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठी प्रामुख्यानें कर्जें दिलीं जातात.
★(४) कायम ठेवी द. सा. द. शें ४ ते ५ टक्के व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.
★(५) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

गुलाबराव रघुनाथराव पाटील
चेअरमन

पंडित भाऊराव टाकवेकर
मॅनेजर



**नवीन माल : : योग्य किंमत**

☆ जरीचीं लुगडीं,
☆ साड्या,
☆ सुंदर बनारसी शालू

व

**—सर्व मिलचा माल—**

याकरितां

# शहाडे आठवले प्रा. लि., दादर

**मुंबई २८.**

( टे. नं. ६०५५४ )

# रशिआंतील बँकिंगच्या पद्धतीचें कांहीं विशेष

## नियोजित अर्थव्यवस्थेचीं उद्दिष्टें गांठण्याचें महत्त्वाचें साधन

रशियांत प्रचलित असलेली बँकिंगची पद्धत आणि पश्चिम युरोपांतील बँकिंगची पद्धत ह्यांच्यांत कांहीं बाबतींत साम्य आहे. पण, त्याचबरोबर ह्या दोन पद्धतींत कांहीं मूलगामी फरक आहेत. म्हणून ह्या दोन पद्धतींची तुलना करण्यापूर्वी फरकांचें स्वरूप नीट लक्षांत घेणें आवश्यक आहे. सोव्हिएट अर्थव्यवस्था ही नियोजित आहे आणि रशियांतील बँकिंगचा धंदा हा सरकारी मक्तेदारीचा आहे. रशियांतील बँकाहि लोकांना सोयीसवलती पुरवतात हें खरें असलें तरी त्या बँकांची ही पार्श्वभूमि नेहमींच मनांत वागविली पाहिजे. रशियांतील बँकिंगची पद्धत ही सर्वंकष आहे आणि अत्यंत सामर्थ्यसंपन्न आहे. ही गोष्ट आश्चर्य वाटण्यासारखी आहे ह्यांत शंका नाहीं. ज्या अर्थव्यवस्थेतील अग्रहक्कांचा क्रम नियोजक ठरवितात आणि जींत द्रव्यनिधींचा संचय करणें अर्थशून्य आहे, त्या अर्थव्यवस्थेंत बँकांच्या कार्याला जागाच कोठें राहते असें वाटणें साहजिकच आहे. पण तसें नाहीं. कारण रशियांत कार्यक्षमतेचें मापन करण्याचें एक साधन म्हणून पैशाचा उपयोग करण्यांत येत असतो. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं बँकेनें केलेल्या एखाद्या गुंतवणुकीच्या व्यवहाराचा शहाणपणा त्यावर मिळणाऱ्या नफ्यानें जोखला जातो.

### पैशाचा उपयोग

जे आर्थिक कार्यक्रम आखण्यांत येतात ते देशांत सर्वत्र कार्यक्षमतेनें अमलांत आणण्यांत येतात कीं नाहीं हें निरीक्षण करण्याचा एक सोपा व परिणामकारक उपाय म्हणून पैशाचा उपयोग रशियांत करण्यांत येतो. त्यामुळें लांचलुचपत व भ्रष्टाचार कमींतकमी राहण्यास मदत होते आणि महत्त्वाच्या साधन-संपत्तीचा प्रवाह भलतीकडे वळविणें कठीण जातें. रशियांतील सर्व कारखाने व औद्योगिक संघटना बँकांप्रमाणेंच सरकारच्या मालकीच्या आहेत. कोणत्याहि कारखान्यानें अगर संघटनेनें मिळविलेला नफा त्यांच्या मालकीचा नसतो. तो सरकारच्या मालकीचा असतो. बँकाहि अर्थातच नफा मिळवितात, परंतु नफा मिळविण्याच्या त्यांच्या कार्याकडे पाहाण्याची दृष्टि पाश्चिमात्य देशांतील दृष्टीपेक्षा वेगळी असते. बँकांनीं जीं कर्जें दिलेलीं असतात त्यांवर त्यांना व्याज मिळतें आणि उलट ठेवीदारांना त्यांच्या ठेवींवर बँका व्याज देतात. आपला स्वतःचा खर्चहि बँका स्वतः मिळवितात. उरलेल्या शिलकेपैकी ५० टक्के रक्कम सरकारच्या अंदाजपत्रकाला आदा करण्यांत येते आणि ५० टक्के बँकेच्या निधींत जमा करण्यांत येते. बँकांजवळील ह्या निधींतून अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या शाखांना पुन्हां कर्जें देण्यांत येतात. म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाची फेरवांटणी करण्याचें एक साधन म्हणून बँकेच्या नफा मिळविण्याच्या कार्याकडे पाहाण्यांत येतें.

### चार प्रकारच्या बँका

निर्बंधरहित स्वतंत्र अर्थव्यवस्था आणि नियोजित अर्थव्यवस्था ह्यांच्यामधील मूलभूत फरकाचें उदाहरण म्हणून रशियांतील नागरिक त्याला मिळणारा पैसा कसा वापरूं शकतो तें पाहूं. रशियांतील नागरिकाला कष्ट करून मिळविलेला पैसा शिल्लक टाकतां येतो. तथापि त्याची गुंतवणूक करावयाची म्हटलें तर बँकेकडे ठेव ठेवण्याशिवाय दुसरा मार्ग त्याला नसतो. त्या पैशाचा उपयोग करून त्याला आपल्या मालकीची, बिऱ्हाडाची जागा घेतां येणार नाहीं व तो तसें करणारहि नाहीं. रशियांतील किंमतींची भांजणी नियोजित असते, आणि थोडीशी लवचिकहि असते. मागणी व पुरवठा ह्यांच्यांत जी क्रिया-प्रतिक्रिया होते त्यांच्या ओढाताणीनें ही भांजणी ठरत नाहीं, हें उघडच आहे. समजा, रशियांत एखाद्या ठिकाणीं बटाट्यांचा तुटवडा आहे. अशा ठिकाणीं बटाट्यांची किंमत चढणार नाहीं; पण ग्राहकांच्या रांगा मात्र लांबत जातील. म्हणजे रशियांतील बँका दोन प्रकारचीं कार्यें करतात. देशांतील सर्व आर्थिक व्यवहारांचा कार्यक्षम व विश्वासार्ह रीतीनें हिशेब ठेवण्याचें कार्य बँका करतात. रशियांतील प्रत्येक कारखान्याला अगर औद्योगिक संघटनेला गुणात्मक, संख्यात्मक आणि उत्पादनविषयक उद्दिष्टें ठरवून दिलेलीं असतात. ह्या गुंतागुंतीच्या औद्योगिक यंत्रणेला लागणाऱ्या द्रव्य-पुरवठ्याचें नियमन करणाऱ्या सरकारी संस्था म्हणूनहि बँका कार्य करीत असतात. सर्व उद्दिष्टांचें मिळून जें एक चित्र तयार होतें, तें चित्र म्हणजेच सरकारच्या आर्थिक नियोजन समितीनें तयार केलेला संपूर्ण आर्थिक कार्यक्रम होय. रशियांत चार प्रकारच्या बँका आहेत. (१) परदेशी व्यापाराची बँक (२) पैशाची गुंतवणूक करणारी बँक (३) स्टेट बँक आणि (४) सेव्हिंग्ज बँक. पहिल्या दोन बँकांविषयीं फारसें कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं. अविकसित देशांना देण्यांत येणारीं दीर्घ मुदतीचीं कर्जें, पूर्व युरोपमधील समाजवादी देशांबरोबर होणारे आर्थिक व्यवहार, परदेशीय हुंडणावळ, आणि आयाती–निर्यातीबाबतचे द्रव्यविषयक व्यवहार, हीं कामें पहिली बँक करीत असते.

### इन्व्हेस्टमेंट बँक आणि स्टेट बँक

रशियांतील अंतर्गत अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी लागणारी दीर्घ मुदतीचीं कर्जें, पैसे गुंतविणारी अथवा इन्व्हेस्टमेंट बँक पुरवीत असते. आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत मोठ्या प्रमाणावर भांडवल लागणारीं जीं कामें असतात त्यांच्याकडे ही बँक खास लक्ष पुरवितें. भांडवली खर्चांवर बारीक नजर ठेवणें, अशा कामांच्या खर्चांत बचत करणें आणि द्रव्यविषयक शिस्तीचें पालन करणें हीं कामें ह्या बँकेकडे सोंपविलेलीं असतात. द्रव्यविषयक व्यवहारांच्या शिस्तीवर जो जोर देण्यांत आला आहे त्यावरून असें दिसतें कीं गेल्या कांहीं वर्षांत औद्योगिक बांधकामाच्या संघटनेंत बरीच उधळमाधळ व भ्रष्टाचार माजला असावा. ह्या बँकेजवळील ७० टक्के पैसा सरकार आपल्या अंदाजपत्रकांतून देतें; बाकीचा ३० टक्के पैसा घसारा फंडांतून आणि औद्योगिक संघटनांच्या नफ्यांतून बँकेला स्वतःच मिळवावा लागतो. कांहीं प्रचंड औद्योगिक संघटनांना एकदम मोठें द्रव्यसाह्य देण्यांत येतें व त्यांच्याकडून नफ्याची अपेक्षा बरींच वर्षें करण्यांत येत नाहीं. स्टेट बँक व सेव्हिंग्ज बँक ह्यांच्या शाखांचें जाळें सर्व देशभर पसरलेलें आहे. सर्व औद्योगिक संघटना आणि संस्था ह्यांना स्टेटबँकेंत आपलें खातें उघडावें लागतें. हीच बँक मध्यवर्ती बँक म्हणून काम पाहातें. आपल्या निरनिराळ्या कचेऱ्या, शाखा, एजन्सीज व सब एजन्सीज ह्यांच्या

सुवर्ण महोत्सव साजरी करणारी कोल्हापुरांतील आद्य सहकारी संस्था

# दि कोल्हापूर अर्बन

## को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

[ स्थापना १९१३ ]

र. नं. १८,३२२) ( फोन नं ५०२

अधिकृत व खपलेलें

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १,२९,४६२ |
| इतर फंडस् | रु. | ६९,१८८ |

समासद संख्या ४२२१

★सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्विकारल्या जातात.

★रिकरिंग डिपॉझिट खातें व दैनिक भिशीचे व्यवहार सुरू आहेत.

★सोनें-चांदीचे जिन्नस, व्यापारी माल व मुदतबंद ठेवी तारणावर 'ब' वर्ग सभासदांनाहि कर्जें देण्याची सोय केली आहे.

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

ए. ए. बोगार, मॅनेजर. बाळकृष्ण श्रीपतराव शिंदे, प्रेसिडेंट.

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेडयूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षे—४½ टक्के, ३ वर्षे—४¾ टक्के, ४ वर्षे—५ टक्के, ५ वर्षे—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा—विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. इलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,३५,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., *जनरल मॅनेजर.* रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

सेवा व सुरक्षितता यांसाठी

# श्री वीरशैव

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

(स्थापना १९४२)

हेड ऑफिस : कोल्हापूर.

ब्रँच : गडहिंग्लज

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,१५,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,१५,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु. | ६१,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,५३,३०० |

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा आपल्या बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

व्याजाचे आकर्षक दर

चालू १%

सेव्हिंग्ज ३%

मुदत ठेव ३% ते ५½%

*इतर सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

एस. डी. घाटी, बी. ए., बी. कॉम्, एलएल. बी. मॅनेजर एस. व्ही. नष्टे, अध्यक्ष

"संस्थेच्या स्थापनेपासून सतत "अ" वर्गांत असलेली कोल्हापुरांतील एकमेव नागरी सहकारी बँक"

# श्री महालक्ष्मी

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

[ स्थापना १९३३ ]

मुख्य कार्यालय : २८, सी, गुजरी, कोल्हापूर दूरध्वनी क्रमांक २३७

शाखा कार्यालय : शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर दूरध्वनी क्रमांक ७०४

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भाग भांडवल | रु. | १,७६,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १,९१,६०० |
| ठेवी | रु. | २६,३९,००० |
| सभासद | | ३,९०१ |
| कर्जें | रु. | २०,६८,३०० |
| खेळतें भांडवल | रु. | ३१ लाखांचे वर |

टीप :—आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात आणि लघु उद्योगधंद्यांना व व्यापाऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो.

मा. कृ. पित्रे, व्यवस्थापक रा. गं. अष्टेकर, अध्यक्ष

मार्फत बँक वरील संघटनांशीं संबंध ठेवते. अंतर्गत व्यापारासाठी पैसा पुरविणें आणि अल्प मुदतींचीं कर्जें देणें ह्यांची जबाबदारी स्टेटबँकेवर असते. एखाद्या कारखान्याला अगर सामुदायिक शेताला खेळत्या भांडवलाची गरज असते; किंवा सरकारी मालकीच्या एखाद्या व्यापारी संघटनेला पैशाची गरज असते. हा पैसा स्टेट बँक पुरविते. १ जानेवारी, १९६२ रोजीं स्टेट बँकेचीं ५,१६० कोटी रुबलसचीं कर्जें येणें होतीं. त्यांपैकी ४,७४० कोटी रुबल्सचीं कर्जें अल्पमुदतीचीं होतीं व ४२० कोटी रुबलसचीं कर्जें शेतीसंघटनांना दिलेलीं अधिक मुदतीचीं होतीं.

### कर्जविषयक धोरण

हीं कर्जें योजनेच्या मर्यादेंतच दिलीं जातात. सरकारी औद्योगिक व इतर संघटनांच्या आर्थिक व द्रव्यविषयक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचें बँकेच्या हातांतील प्रभावी साधन म्हणून ऋणको-धनको संबंधांचा उपयोग करण्यांत येतो. योजनेंत कर्जाची जी मर्यादा घालून दिलेली असेल तिचा भंग करतां येत नाहीं. योजनेप्रमाणें मिळूं शकणारें कर्ज आणि उत्पादनाच्या उद्दिष्टाची प्रत्यक्ष पूर्ति ह्यांच्यांत तफावत पडूं न देण्याची दक्षता घेणें हें बँकेच्या कर्जविषयक धोरणाचें महत्त्वाचें अंग आहे. सर्व कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्यांत आलेला असतो आणि परतफेडीची तारीखहि नक्की केलेली असते. अल्प मुदतीच्या कर्जावर व्याजाचा दर १ ते २ टक्के असतो. कर्जफेड मुदतींत झाली नाहीं तर आणखी एक टक्का व्याज आकारण्यांत येतें. त्यामुळें उत्पादनांत ठरल्यापेक्षा जादा वाढ होईपर्यंत अगर ते उद्दिष्टापेक्षाहि खाली घसरेपर्यंत बँकेला विचार करण्याची जरूरच भासत नाहीं. ह्यापैकी कांहींहि झालें तरी त्याचा परिणाम बँकिंगवर घडून येतो. १९३० सालापासून व्यापारी कर्जें देण्यास बंदी करण्यांत आलेली आहे. आतां मालाची किंमत द्यावयाची झाल्यास ती फक्त स्टेट बँक अगर तिच्या शाखा ह्यांच्यामार्फतच देण्यांत येते. त्याची पद्धत अशी असते. ज्यानें मालाचा पुरवठा केला असेल त्यानें माल पाठविल्यावर जरूर ते कागदपत्र बँकेकडे रवाना करावयाचें; नंतर बँकेतर्फे ते कागदपत्र स्टेट बँकेच्या योग्य त्या शाखेकडे स्वीकारासाठी पाठविलें जातात. ज्यानें माल घेतला असेल त्यानें कागदपत्र पाहून तीन दिवसांचे आंत मालाचे पैसे देण्याचा करार मान्य केला पाहिजे. कराराच्या अटी पाळल्या गेल्या नसतील तर त्याला करार नाकारता येतो. एखाद्या गिऱ्हाइकानें माल घेण्याचा करार योग्य कारणासाठी नाकारला आहे किंवा काय हें पाहण्याचें काम बँकांच्या स्थानिक कचेरीला करावें लागतें. हे व्यापारी देवीघेवींचे व्यवहार पुरे करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला असा कीं माल घेणारा मालाची किंमत चुकती करतो अगर किंमत त्याच्या खात्यावर नांवें लिहिण्यांत येतें व पुरवठा करणाराच्या खात्यावर जमा दाखविण्यांत येते. कधींकधीं मालाचा पुरवठा करणारा व तो घेणारा ह्यांचे परस्परांशीं देवघेवींचे संबंध असतात अशावेळीं परस्परांच्या देण्याघेण्याची वजावाट करूनहि हिशेब मिटविण्यांत येतो. रशियांत अशा प्रकारच्या वजावटीच्या हिशेबांना उत्तेजन देण्यांत येतें. अलीकडे पैशाच्या एकूण उलाढालीपैकी ५० टक्केपर्यंत हिशेब अशा तऱ्हेनें मिटविण्यांत येऊ लागले आहेत. अर्थात हिशेबांची इतकी मोठ्या प्रमाणावर मिळवणी नियोजित अर्थव्यवस्थेंतच होऊं शकते.

### सेव्हिंग्ज बँका आणि नागरिक

इतर बँकांच्या मानानें सेव्हिंग्ज बँकांचा संबंध रशियन नागरिकांशीं अधिक येतो. ह्या बँकेंत त्याला अमर्याद रकमेच्या ठेवी ठेवतां येतात. चालू खातीं ठेवलेल्या ठेवीवर त्याला दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज मिळतें; सहा महिन्यांच्या मुदतबंद ठेवीवर ३ टक्केपर्यंत व्याज मिळूं शकतें. सेव्हिंग्ज बँका स्टेट बँकेच्या मुदतबंद रोख्यांची खरेदी-विक्री करूं शकतात. ह्या रोख्यांवर ३ टक्क्यांच्या आसपास व्याज मिळूं शकतें. व्यक्तीव्यक्तीमधील रोखीचीं देणींघेणीं सोडलीं तर बाकीच्या देण्याघेण्याचे व्यवहार सेव्हिंग्ज बँका व स्टेट बँक ह्यांच्यामार्फत करण्यांत येतात. सेव्हिंग्ज बँका आपला बहुतेक पैसा स्टेट बँकेंत गुंतवितात. औद्योगिक व व्यापारी संघटना आणि कांहीं सरकारी व्यापारी संघटना ह्यांच्यांतील देण्याघेण्याचे व्यवहार चेक्सच्या साह्यानें करण्यांत येतात. व्यक्तींमधील व्यवहारांत चेक्स दिले-घेतले जात नाहींत. व्यवहार रोखीनें होतात अगर गिऱ्हाइकांच्या सूचनांप्रमाणें पैशाची मेल किंवा टेलिग्राफनें ट्रॅन्सफर केली जाते. तथापि एखाद्यानें बँकेला कायमची सूचना देऊन ठेवल्यास घराचें भाडें, विजेचा व टेलिफोनचा आकार, असलीं देणीं बँकेमार्फत नियमित देण्याची सोय करतां येते. हौशीखातर प्रवासाला निघाल्यास अगर धंद्यासाठी बाहेरगांवीं गेल्यास कोणालाहि आपल्याबरोबर ठराविक रकमेचे लेटर ऑफ क्रेडिट नेतां येतें व त्याच्या आधारावर जरूर ती रोख रक्कम इच्छित स्थळीं मिळवितां येते. ओव्हरड्रॉफ्टला परवानगीच नाहीं. भविष्यकाळीं हातीं येणाऱ्या उत्पन्नाच्या आधारावर वर्तमानांत कर्ज काढण्याच्या वृत्तीसंबंधीं एक प्रकारचा सात्विक संताप रशियांत दिसून येतो. तथापि ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंची मागणी पुरविण्यासाठी वस्तू हप्त्यानें विकत देण्याची पद्धत आहे. कांहीं लोकांच्या संग्रहीं असलेला जादा पैसा शोषून घेण्याचीहि ही युक्ति असावी. हप्तेबंदीनें विकत मिळू शकणाऱ्या वस्तूंची संख्या मात्र फारशी नाहीं. टेलिव्हिजन सेटस्, रेडिओ, कपडे, अशासारख्या टिकाऊ व मोजक्या वस्तूच हप्तेबंदीनें मिळूं शकतात. हप्तेबंदी बहुदा ६ महिन्यांची असते. २५ टक्के रक्कम प्रथम द्यावी लागते आणि नंतरच्या हप्त्यावर १ ते २ टक्के व्याज आकारलें जातें. हप्ते सहसा चुकत नाहींत. कारण, ग्राहकांच्या पतीची खात्री तो ज्या कंपनींत काम करतो तिच्यातर्फे दिली जातें आणि मासिक हप्ते पगाराच्या वेळींच कापून घेण्यांत येतात. सध्यां फक्त ४ महिन्यांच्या पगाराइतकीच हप्तेबंदी मिळूं शकते.

### बँकिंगची दुसरी पद्धतच माहीत नाहीं

प्रत्येक चार रशियन नागरिकांत एकाचें बँकेंत खातें असतें. बँकेचा मॅनेजर आणि गिऱ्हाइकें ह्यांच्यांतील संबंधांची तुलना पश्चिम युरोपांतील ह्याच नात्याशीं होऊं शकणार नाहीं. रशियांतील लोक प्रचलित बँकिंगच्या पद्धतीपेक्षा निराळी अशी पद्धत खुषीनें स्वीकारतील काय, ह्या प्रश्नाला कांहींच अर्थ नाहीं. कारण, सरकारच्या आर्थिक नियोजन-मंडळाचे निर्णय अमलांत आणण्यासाठीच सोव्हिएट बँकिंगच्या पद्धतीचा उदय झालेला आहे. दुसरी पद्धत लोकांना ठाऊकच नाहीं. रशियांत पैशाची गुंतवणूक, मालाचें उत्पादन व वितरण, ह्या सर्व बाबतींत सरकारच प्रमुख आहे. रशियाची बँकिंगची पद्धत ह्या सर्व अर्थव्यवस्थेशीं संपूर्णपणें जुळणारी अशी आहे. ह्या पद्धतीच्या मर्यादेंत बँका व्यक्तींच्या गरजा भागवितात. परंतु त्या नियोजित अर्थव्यवस्थेच्या यंत्रणेचा एक भाग म्हणूनहि काम करीत असतात. त्यामुळें भांडवलाचा ओघ नियोजित ठिकाणाकडे वळविण्याची आणि योजनेच्या अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्याची कामगिरीहि त्यांना साहजिकच करावी लागते.

# इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनची कामगिरी

दी इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन प्रतिवर्षी अधिकाधिक प्रमाणांत कर्जे देत असल्याचें अहवालावरून दिसून येतें. ३० जून, १९६२ ला संपलेल्या वर्षांत कॉर्पोरेशननें एकूण २४·४५ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी दिली. या कॉर्पोरेशनची १४ वर्षांपूर्वी स्थापना झाल्यापासून एका वर्षांत कर्जे मंजूर करण्याच्या बाबतींत हा एक नवा विक्रम आहे. १९६०-६१ मध्यें कॉर्पोरेशननें २१·२१ कोटी रुपयांच्या आणि १९५९-६० मध्यें १७·९१ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी दिली होती. कॉर्पोरेशननें गेल्या १० वर्षांत एकूण ४२७ अर्जदारांस मिळून १२०·२७ कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी दिली आहे.

आढाव्याच्या या वर्षांत कॉर्पोरेशननें निरनिराळ्या तेरा राज्यांतील व केंद्रशासित पॉण्डिचरीमधील मिळून १६ उद्योग-धंद्यांतून कर्जासाठी केल्या गेलेल्या ४१ अर्जांस मंजुरी दिली. पूर्वीच्या फ्रेंच वसाहतींतील औद्योगिक कंपनीला कॉर्पोरेशननें कर्ज मंजूर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. माहे येथें एक सुती कापड स्पिनिंग मिल सुरू करण्यासाठीहि ३५ लाख रुपयांचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. या वर्षांतहि कॉर्पोरेशननें देशांतील त्यामानानें कमी विकसित अशा विभागांकडे खास लक्ष दिलें.

### कर्जांची वांटणी

निरनिराळ्या उद्योगधंद्यांचा विचार करतां, या वर्षांत मंजूर झालेल्या कर्जांपैकी सर्वांत जास्त म्हणजे ७·५२ कोटी रुपये कर्ज साखर धंद्यास मंजूर करण्यांत आलें. तदनंतर रासायनिक धंदा ( ६·३८ कोटी रु. ), विद्युत् यंत्रसामग्री उत्पादन धंदा ( ३·१३ कोटी रु. ) आणि कापड धंदा ( १·९० कोटी रु. ) या धंद्यांचा क्रम लागतो.

राज्यनिहाय पाहतां, महाराष्ट्र व प. बंगाल राज्यांस प्रत्येकीं ८ कर्जे ( या वर्षांतील सर्वांत जास्त ) मंजूर झालीं. तदनंतर केरळ व मद्रास राज्य ( प्रत्येकीं ५ कर्जे ), आंध्र प्रदेश ( ४ कर्जे ), गुजरात ( ३ कर्जे ), राजस्थान, उत्तरप्रदेश, बिहार आणि आसाम ( प्रत्येकीं २ कर्जे ) आणि पंजाब, म्हैसूर व मध्य प्रदेश ( प्रत्येकीं १ कर्ज ) या राज्यांचा क्रम लागतो.

### सहकारी संस्थांना प्राधान्य

या वर्षभरांत एकूण ३११४० कोटी रुपये कर्जासाठी ५९ अर्ज आले. यांपैकी मंजूर झालेल्या ४१ अर्जांत, ७·७२ कोटी रुपयां-करतां ( जादा कर्जासाठी करण्यांत आलेले ३ अर्ज धरून ) करण्यांत आलेले १४ अर्ज सहकारी संस्थांचे होते. १२ साखर उत्पादन धंद्यांतील होते, १ कापड धंद्यांतील आणि एक कापूस व इतर तेल बियांपासून वनस्पति तेलाचें उत्पादन करणाऱ्या धंद्यांतील होता. हा आंकडा जमेस धरतां, सहकारी संस्थांसाठी मंजूर करण्यांत आलेल्या एकूण कर्जाची रक्कम ३१·४१ कोटी रुपयांवर म्हणजे कॉर्पोरेशननें मंजूर केलेल्या एकूण कर्जाच्या २४·१ टक्के होते.

सन १९६१-६२ मध्यें मंजूर केलेल्या कर्जांत ६ संस्थांकरितां मंजूर केलेल्या २·५५ कोटी रुपयांच्या डॉलर कर्जाचाहि समावेश होतो. यांपैकी दोन संस्थांस २२·०२ लाख रुपये इतक्या किंमतीच्या प. जर्मनीच्या कर्जांतील चलनांसह मंजुरी देण्यांत आली. तसेंच या ६ कंपन्यांपैकी ३ कंपन्यांस एकूण १·१३ कोटी रु. चीं कर्जे मंजूर झालीं.

### परदेशांकडील कर्जे

या वर्षांत यु. एस. एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंटनें एकूण २ कोटी डॉलरचें दुसरें कर्ज मंजूर केलें. याकरतां एक औपचारिक करार करावा लागला. त्याचप्रमाणें प. जर्मनीमधील जर्मन बँक फॉर रीकन्स्ट्रक्शनकडून १·५ कोटी डाइश मार्क्स कर्जाची व्यवस्था झाली असून, भारत सरकारनें आपल्याकडील ८ कोटी डॉलर किंमतीच्या येन कर्जापैकी १ कोटी डॉलर इतकें येन कर्ज मंजूर केलें आहे. तसेंच, इंटरनॅशनल कॉन्सिर्टियम ऑफ एड टु इंडिया योजनेनुसार फ्रान्सनें भारताला कबूल केलेल्या ३ कोटी डॉलर जादा साह्यापैकी १ कोटी डॉलर किंमतीचें साधनसामग्री-कर्ज कॉर्पोरेशनला मिळण्याची व्यवस्था झाली आहे.

कॉर्पोरेशननें या वर्षांत मूलभूत औद्योगिक रसायनें व खतें, कापड, धातु वस्तु, विद्युत् आणि इतर यंत्रसामग्री, कागद, खाण-काम, मातीचीं भांडीं, इत्यादि धंद्यांतील मिळून आलेल्या ११ अर्जांसाठी ६२ लाख रु. च्या इक्विटी शेअर्सची व १०·५० लाख रु. च्या प्रेफरन्स शेअर्सची हमी घेतली. ही रक्कम जमेस धरतां, कॉर्पोरेशननें १९६१-६२ या वर्षअखेर एकूण ४·९२ कोटी रु. ची हमी घेतली आहे. तद्वतच या वर्षांत कॉर्पोरेशननें ३ अर्जदारांच्या बाबतींत एकूण ४३·६१ लाख रुपये किंमतीच्या मालाची रक्कम नंतर देण्याबाबतहि हमी घेतली आणि परदेशी यंत्रसामग्री पुरवठेदारांकडून १८·६ कोटी डॉलर किंमतीचा माल उधारीनें पुरविण्याची व्यवस्था केली.

### १०·७८ कोटी रु. कर्जाचें वांटप

कॉर्पोरेशननें या वर्षांत मंजूर केलेल्या एकूण २४·४५ कोटी रु. पैकी १०·७८ कोटी रु. कर्जाचें प्रत्यक्षांत वांटप केलें. या संस्थेची स्थापना झाल्यापासून एका वर्षांत इतकें कर्ज वांटण्याचा हा विक्रमच आहे.

### कर्जाचें महत्त्व

या कॉर्पोरेशननें मंजूर केलेलीं कर्जे घेणाऱ्या निरनिराळ्या कंपन्यांस आवश्यक असलेल्या आर्थिक साह्याच्या ४४ टक्के इतकीं होतात. १९६१-६२ अखेरपर्यंत कॉर्पोरेशननें नवीन कारखाने स्थापण्याकरितां, चालू कारखान्यांच्या विकासासाठी व आधुनिकीकरण्यासाठी एकूण १२८·५९ कोटी रु. कर्जास मंजुरी दिली आहे. या सर्व योजना एकूण २९१·८४ कोटी रु. वर खर्चाच्या होत्या.

### कर्जाची परतफेड

कॉर्पोरेशनला या वर्षांत पूर्वी दिलेल्या कर्जाच्या मुद्दलाच्या परतफेडीच्या हप्त्यांदाखल ३·२७ कोटी रु. व व्याजाच्या रकमे-दाखल २·७८ कोटी रु. मिळाले. कॉर्पोरेशनची स्थापना झाल्या-पासून देण्यांत आलेल्या कर्जांपैकी एकूण १२·६३ कोटी रु. मुद्दलाची फेड व्हावयाची होती. त्यांपैकी १२·३९ कोटी रु. मुद्दलाची फेड झाली आहे. त्याचप्रमाणें आकारण्यांत आलेल्या एकूण व्याजाच्या १४·४९ कोटी रु. रकमेपैकी १४·४६ कोटी रु. कॉर्पोरेशनला मिळाले. बुडीत गेलेल्या रकमेचें प्रमाण या वर्षी एकूण रकमेच्या १·२४ टक्के आहे. मागील वर्षअखेरीस हा आंकडा २·३४ टक्के होता.

या वर्षांत कॉर्पोरेशननें कोणत्याहि औद्योगिक कारखान्याची व्यवस्था वा मालकी आपल्याकडे घेतली नाहीं.

### ताळेबंद

कॉर्पोरेशनला या वर्षांत एकूण ३·०४ कोटी रु. उत्पन्न झालें. गतवर्षीचा हा आंकडा २·९८ कोटी रु. होता. एकूण नफ्याचें प्रमाण कर जमेस न धरतां या वर्षांत १३०·७१ लाख रु. आहे. गतवर्षीचा हा आंकडा १२९·३५ लाख रुपये होता.

कॉर्पोरेशनला झालेल्या या निव्वळ नफ्यांतून १८ लाख रु. मध्यवर्ती सरकारला परत करण्यांत येतील आणि यामुळें कॉर्पोरेशनला मध्यवर्ती सरकारनें सुरुवातीला दिलेल्या ५३·५४लाख रु. रकमेची संपूर्णतः परतफेड होईल. उरलेल्या निव्वळ नफ्यांतील २६ लाख रुपये जनरल रिझर्व्ह फंडाला व १९६१ च्या प्राप्तीकर कायद्यानुसार १३·२१ लाख रु. स्पेशल रिझर्व्ह फंडाला देण्यांत आले असून उर्वरित १३·६८ लाख रु. शिल्लक शेअरहोल्डर्सना वांटण्यांत येतील. या अहवालांत निरनिराळया उद्योगधंद्यांच्या प्रगतीचा विशेषतः कॉर्पोरेशनकडून कर्ज मिळालेल्या उद्योगधंद्यांच्या प्रगतीचा एका खास परिशिष्टांत आढावा घेण्यांत आला आहे. परकीय हुंडणावळीच्या अडचणीमुळें १९६१–६२ च्या पहिल्या १० महिन्यांत आयातींत बरीच घट झाली असली तरी औद्योगिक उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. औद्योगिक विकासाकरितां, परकीय सहकार्यासाठी उपलब्ध होत असलेल्या वाढत्या संधींचा लाभ घेऊन नवे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी हातभार लावण्यांत उद्योगधंदे उत्सुक आहेत. निर्यात वस्तूंच्या यादींत सतत भर पडत असून नवनवीन बाजारपेठा मिळविण्यांत येत आहेत, असें या परिशिष्टांत म्हटलें आहे.

---

### ३० लाखांवर पक्ष्यांचें स्थलान्तर

गेल्या महिन्याच्या अखेरीस सौराष्ट्रामधील भरतपूरच्या आसपासच्या भागांत स्थलान्तर करणाऱ्या पक्ष्यांचे थवेच्या थवे आल्याचें आढळून आलें. हे पक्षी रशिया, मध्य आशिया, इराण व मध्य-पूर्वेतील देश ह्यामधील कडक हिवाळा टाळण्यासाठी दक्षिण गोलार्धात दरवर्षीच येतात. पण यंदा त्यांची संख्या फारच म्हणजे ३०लाखांच्याहि पुढें गेलेली आढळली. पक्ष्यांच्या जीवनाचा अभ्यास करणारे तज्ज्ञ आणि जागतिक आरोग्यसंघटनेचे तज्ज्ञ ह्या पक्ष्यांचा अभ्यास करण्यासाठी भरतपूरला जमले होते. हे पक्षी तेथून पुढें कन्याकुमारीपर्यंत अगर सीलोनलाहि जातात. आतांपर्यंत इतक्या मोठ्या प्रमाणावर पक्ष्यांचें हंगामी स्थलांतर झाल्याची नोंद नाहीं. ह्यापैकी कांहीं पक्षी रोगवाहक असतात, म्हणून त्यांच्या रोगासंबंधी संशोधन करण्यांत येत आहे.

---

### हिंदी महासागराचें संशोधन

हिंदी महासागराचें संशोधन करण्यास गेल्या वर्षी सुरुवात झाली. ह्या संशोधनाचे कामांत निरनिराळ्या देशांच्या ४० बोटींनीं भाग घेतलेला आहे. खोल पाण्यामधील मच्छीमारीसंबंधी संशोधनामुळें अधिक माहिती मिळणार आहे. संशोधनांत आधुनिक शास्त्रीय उपकरणांचा वापर करण्यांत येत असल्यानें सागराचा तळ, पाण्याखाली होणाऱ्या भूकंपाचें स्वरूप, लोहचुंबकीय क्षेत्रें, समुद्रान्तर्गत प्रवाह, इत्यादि विषयासंबंधींहि बरीच माहिती उपलब्ध होणार आहे. हिंदी महासागराच्या संशोधनाशिवाय ह्या समुद्रावर वावरणाऱ्या पक्ष्यांचे आणि त्यांच्यामधील व इतर प्राण्यांमधील व वनस्पतींमधील संबंधांचाहि अभ्यास करण्यांत येत आहे.







# सहकारी संस्था आणि बिनामी कर्जें

## कारवाई कोणीं करावयाची ?

[ लेखक : दत्तू गोवेंकर ]

' लोभ " असणार नाहीं असा माणूस हल्लीं आपण असामान्य मानतों. अफरातफर, लांचलुचपत, हे दोष आपल्या समाजांत हल्लीं इतके वाढले आहेत कीं, त्यापुढें " लोभ " हा कांहीं दोष आहे हें मानण्यास आपण आतां तयारच नाहीं. अशी वस्तुस्थिति असली तरी आर्थिक व्यवहार करणाऱ्या सार्वजनिक संस्थांचे चालक लोभी असतां कामा नयेत असें आपण मानीत आलों आहों.

सर्वसामान्य व्यक्तीस संपत्तीचा लोभ असणें स्वाभाविक आहे. ही संपत्ति बिन-श्रमानें किंवा खर्चानें अथवा कमी श्रमानें किंवा खर्चानें जितकी संपादन करतां येईल तितकी मिळविण्याचा सामान्य इसम नेहमींच प्रयत्न करीत असतो, व त्यासाठी तो सूक्ष्मासूक्ष्म मार्गांचा अवलंब करीत असतो, असें आपल्या अनुभवास येतें.

आर्थिक व्यवसाय करणाऱ्या सार्वजनिक संस्थांपैकीं संख्येनें फार मोठ्या संस्था म्हणजे सहकारी संस्था होत. या संस्थांच्या प्रमुख चालकांच्या हातांत फार मोठी संपत्ति व सत्ता असते. हे चालक असामान्य कोटींतील असतात असें मानणें बरोबर होईल असें आम्हांस वाटत नाहीं. ते सामान्यत: इतर नागरिकांसारखेच लोभास बळी पडण्याचा संभव असतो. शिवाय ते संस्थेचे अधिकारी असल्यामुळें लोभास बळी पडून त्यांनीं केलेले अयोग्य व्यवहार उघडकीस येणें बरेंच कठीण असतें. त्यामुळें असे अयोग्य व्यवहार सहकारी संस्थांतून होण्याची शक्यता बरीच असते.

हे अयोग्य स्वरूपाचे व्यवहार सामान्यपणें पुढील दोन प्रकारांनीं होतात असें दिसतें :—

( १ ) हातांतील संपत्ति स्वत:च्या उपयोगासाठी वापरणें.

( २ ) हातांतील संपत्ति दुसऱ्या नामधारी इसमास कर्जाऊ दिली आहे असें दाखवून ती स्वत:च्या उपयोगासाठी वापरणें.

पहिल्या प्रकारचा व्यवहार उघडकीस येण्यास फारसा वेळ लागत नाहीं. शिवाय हा व्यवहार एकापेक्षा अधिक इसमांच्या संमतीशिवाय अगर एकापेक्षा अधिकांनीं कट केल्याशिवाय सहसा होऊं शकत नाहीं. त्यामुळें त्याची वाच्यता लवकर होण्याची शक्यता असते, परंतु दुसऱ्या प्रकारचे व्यवहार मात्र उघडकीस येणें फारच कठीण जातें, व त्यामुळें अशा प्रकारचे अयोग्य व्यवहार सहकारी संस्थांत दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत होऊं लागले असावेत असें वाटतें.

पहिल्या प्रकारचा व्यवहार हा फौजदारी कायद्याखाली गुन्हा होऊं शकेल व त्याची दखलगिरी त्या कायद्यान्वयें घेतली जाणें शक्य आहे. परंतु दुसऱ्या प्रकारचा व्यवहार हा नैतिक दृष्टीनें अयोग्य असूनहि त्यास योग्य तो आळा बसेल अशी पुरेशी व्यवस्था सहकारी कायद्यांत अगर दुसऱ्या एखाद्या कायद्यांत केलेली आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

आमच्या माहितीप्रमाणें या बाबीकडे मुंबई सरकारचें लक्ष प्रथम सन १९४८ सालीं गेलें असावें असें दिसतें. त्या सालीं सहकारी कायद्यांत एक नवीन कलम नं. ६० ( अ ) पुढीलप्रमाणें दाखल करण्यांत आलें :—

" Any officer of a society who wilfully recommends or sanctions, for his own personal use or benefits, loan in the name of any other person shall, on conviction be punishable with fine which may extend to five hundred rupees."

पुढील १२ वर्षांचे कालखंडांत बिनामी कर्जांचे व्यवहार अधिकच वाढले असावेत असें वाटतें. कारण या प्रकारच्या अपराधासाठी सन १९४८ सालीं दंड फक्त रु. ५००/– ठेवण्यांत आला होता. परंतु एवढ्या लहान दंडानें हे अपराध कमी होत नाहींत असेंच सरकारच्या निदर्शनास आलें असावें असें दिसतें आणि म्हणून याबाबत सन १९६० च्या सहकारी कायद्यांत पुढील तिजविजी कलम नं. १४६ (ओ), व १४७ (ओ) यांना केलेल्या आहेत.—

"146 (O)—It shall be an offence under this Act, if any officer of a society wilfully recommends or sanctions for his own personal use or benefit or for the use or benefit of a person in whose he is interested, a loan in the name of any other person."

"147 (O)—Every society, officer or past officer, member or past member, employee or past employee of a society, or any other person who commits an offence under section 146 shall, on conviction, be punished, if it is an offence under clause ( O ) of that section, with imprisonment for a term which may extend to two years or with fine or with both."

वरील विचार आम्हांस आज सुचण्याचें कारण असें कीं, आमच्या माहितीप्रमाणें मा. को-ऑपरेटिव्ह ट्रायब्युनल समोर अशा प्रकारचे एकदोन दावे निकालासाठी आले असतां त्या कामीं सदर ट्रायब्युनलनें संबंधित कर्जें हीं बिनामी आहेत असें ठरविलें; असें असूनहि अपराधी इसमाविरुद्ध सहकारी कायद्यांतील वर उल्लेख केलेल्या तजविजीप्रमाणें कारवाई झाल्याचें आमच्या अद्याप ऐकिवात नाहीं. यावरून वरील तजविजी या मृतवत् ( Dead letter ) आहेत किंवा काय असा प्रश्न निर्माण होतो. शिवाय अशा प्रकरणी गुन्हेगार हे नेहमींच सहकारी संस्थांचे अंमलदार असल्यानें त्यांचेविरुद्ध वर उल्लेख केलेल्या कलमाखाली कारवाई करण्यासाठी त्यांनींच अर्ज केला पाहिजे अशी अपेक्षा असेल तर आरोपींनीं स्वत:विरुद्ध फिर्याद करण्याइतक्या मनोधैर्याचे आरोपी आपल्या समाजांत ज्या दिवशीं निर्माण होतील त्या दिवशींच ही गोष्ट शक्य होईल असें आम्हांस वाटतें. या बाबत आमची अशी सूचना आहे कीं, एखाद्या इसमानें बिनामी कर्ज घेतलें आहे ही गोष्ट पुरेशा पुराव्यानिशीं सहकारी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली अगर आणण्यांत आली तर त्यांनींच संबंधित इसमांवर सहकारी कायद्यांतील तजविजीअन्वयें कारवाई सुरू केली पाहिजे. त्याबाबतची जबाबदारी त्यांनीं दुसऱ्या कोणा व्यक्तीवर अगर संस्थेवर टाकूं नये. तसें ते करणार नसतील तर सहकारी कायद्यांतील कलमें १४६ ओ व १४७ ओ हीं केवळ पक्षांना भिवविण्यासाठी शेतांत उभारलेल्या बाहुलीं आहेत असें स्वार्थी सहकारी अधिकारी व अम्मलदार मानतील अशी आम्हांस साधारण भीति वाटते. जे इसम अशा प्रकरणी गुन्हेगार ठरतील त्यांना योग्य तें शासन देऊन त्याची माहिती जाहीर करावी म्हणजे इतरांस तें मार्गदर्शक ठरेल.

# ब्रिटनचा सामायिक बाजारपेठेंत प्रवेश

## भारताच्या निर्यातीवर विपरीत परिणाम

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रांत अलीकडे व्यापारी व आर्थिक गट करण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे. अशा गटांपैकी युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी सर्वांत आधीं स्थापन झालेला गट आहे. ह्या गटांत बेल्जम, फ्रान्स, पश्चिम जर्मनी, इटली, लक्झेंबर्ग आणि हॉलंड अथवा नेदरलँडस हे सहा देश असून त्यांनीं रोम येथें केलेल्या तहाप्रमाणें हा गट बनविला आहे. सुमारें १२ ते १५ वर्षांच्या अवधींत आपआपसांत होणाऱ्या व्यापारामधील जकाती, आयाती-निर्यातीवरील बंधनें व इतर नियंत्रणें पूर्णपणें रद्द करण्याचा ह्या देशांचा विचार आहे. गटाबाहेरच्या देशांशीं व्यापार करण्याच्या बाबतींत ते सर्व मिळून जकाती व इतर बाबींविषयीं सामान्य धोरण ठरविणार आहेत. ह्या गटाशिवाय ब्रिटन, पोर्तुगाल, स्वीडन, स्वित्झरलंड, ऑस्ट्रिआ, नॉर्वे व डेन्मार्क ह्यांनीं दुसरा एक गट स्थापन केला असून त्याचें नांव युरोपिअन फ्री ट्रेड एरिया असें ठेवण्यांत आलें आहे. ह्या दोन गटांपैकी पहिल्या गटांतील देशांच्या आर्थिक प्रगतीचा वेग दुसऱ्या गटांतील देशांपेक्षा बराच अधिक आहे.

### सवलती रद्द होणार

पहिल्या गटांतील देशांच्या संघटनेंत आपणांस प्रवेश मिळावा अशी विनंती ब्रिटनतर्फे करण्यांत आलेली आहे. ह्या युरोपिअन कॉमन मार्केटमध्यें प्रवेश मिळविण्याबाबत ब्रिटन सध्यां वाटाघाटी करीत आहे. ब्रिटनमधील शेतीचा व्यवसाय आणि राष्ट्रकुलांतील देश त्याचप्रमाणें दुसऱ्या गटांतील इतर देश ह्यांच्या आर्थिक हितसंबंधांचें रक्षण करण्याचे प्रयत्न ब्रिटन करीत आहे. गेल्या महिन्यांत, ब्रिटनच्या सामायिक बाजारपेठेंत सामील होण्यामुळें राष्ट्रकुलांतील देशांच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल त्याची माहिती करून घेण्यासाठी ब्रिटनमध्यें राष्ट्रकुलांतील देशांच्या पंतप्रधानांची परिषद् भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत भारताच्या निर्यात व्यापाराबाबत ब्रिटनकडून मिळणाऱ्या सवलती कांहीं वर्षे तशाच चालू ठेवण्यांत आल्या पाहिजेत अशी मागणी भारततर्फे करण्यांत आली आहे. कारण ब्रिटन युरोपच्या सामायिक बाजारपेठेंत सामील झाल्याबरोबर त्या तावडतोब रद्द करण्यांत आल्या, तर भारताच्या विकासावर विपरीत परिणाम होणार आहे. ब्रिटन सामायिक बाजारपेठेंत सामील झालें तर भारताच्या व्यापारावर त्याचा कितपत परिणाम होईल असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. सध्यां भारत व राष्ट्रकुलांतील इतर देश ह्यांच्या ब्रिटनला निर्यात होणाऱ्या मालावर सवलतीच्या दरानें जकाती आकारल्या जातात. ब्रिटन सामायिक बाजारपेठेंत सामील झाल्यावर त्या सवलती आपोआप रद्द होणार आहेत. राष्ट्रकुलांतील देशांची अशी इच्छा आहे, कीं त्यांच्या मालावर सामायिक बाजारपेठांतील देशांच्या सामान्य धोरणाप्रमाणें जकाती घेण्यास सुरवात करण्यापूर्वी बरीच मुदत माफी देण्यांत आली पाहिजे. ह्या अवधींत नवीन परिस्थितीशीं जुळवून घेण्याचे प्रयत्न राष्ट्रकुलामधील देशांना करतां येणें शक्य होईल. अशी तरतूद करण्यांत आली नाहीं तर राष्ट्रकुलांतील विकसनशील देशांच्या प्रगतींत फार मोठे अडथळे निर्माण झाल्याखेरीज राहाणार नाहींत. ह्या देशांना आपला कच्चा माल अगर अर्धसंस्कारित पक्का माल युरोपिअन सामायिक बाजारपेठेंतील देशांना निर्यात करावा लागतो व परदेशीय चलन मिळवावें लागतें. ह्या देशांकडून भारतांत व इतर राष्ट्रकुलदेशांत आयात करण्यांत येणाऱ्या यंत्रसामग्रीच्या किंमतीपोटीं व त्यांच्याकडून मिळालेल्या कर्जाच्या फेडीपोटीं हें परदेशीय चलन द्यावें लागतें. ह्या संदर्भात भारताच्या ब्रिटनशीं व सामायिक बाजारपेठेंतील देशांशीं होणाऱ्या व्यापाराची परिस्थिति काय आहे, तें पाहणें जरूर आहे.

### प्रतिकूल तफावतीचा प्रश्न

१९६१-६२ सालांत भारतानें युरोपिअन सामायिक बाजारपेठेंतील देशांना ५१·०५ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला, आणि त्या देशांकडून १८१·८८ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला. ह्याचा अर्थ असा कीं ह्या देशांशीं भारताचा जो व्यापार होतो त्यांत भारताच्या बाजूनें फार मोठी प्रतिकूल तफावत आहे. ह्या देशांकडून यंत्रसामग्री व इतर साधनें, आणि औद्योगिक कच्चा माल भारताला पुरेशा प्रमाणांत आयात करावयाचा असेल तर ही प्रतिकूल तफावत कमींत कमी करण्याचे प्रयत्न होणें अतिशय आवश्यक आहे. नाहींतर भारताला जरूर तो माल पुरेशा प्रमाणांत आयात करीत राहाणें

[ स्थापना १९२१ ]
गरगट्टी अँड सन्स
शहापूर-बेळगांव
धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस
हें वर्ष सुखाचें
जावो !

जमणार नाहीं. भारतानें ब्रिटनला १५९·९५ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला आणि ब्रिटनकडून १९४·५२ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला. येथील प्रतिकूल तफावत बेताची आहे. १९६१–६२सालांत भारतानें जो निर्यात व्यापार केला त्यापैकी २६ टक्के ब्रिटनशीं केलेला होता, तर युरोपिअन सामायिक बाजारपेठेंतील देशांशीं केलेल्या व्यापाराचें प्रमाण ८ टक्के होतें. ब्रिटन सामायिक बाजारपेठेंत सामील झालें. आणि सामायिक बाजारपेठेची सर्वसामान्य जकात भारताच्या मालाला लागूं करण्यांत आली, तर भारताच्या निर्यात व्यापारापैकी २५ टक्क्यापेक्षा अधिक व्यापाराला जोराचा धक्का बसल्याशिवाय राहाणार नाहीं.

### भारताची आयात–निर्गत

युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांपैकी पश्चिम जर्मनीकडून भारत सर्वात अधिक आयात करीत असे. त्याचप्रमाणें भारताच्या मालाचेंहि तें सर्वात मोठें गिऱ्हाईक होतें. १९६१–६२ सालांत युरोपीय बाजारपेठेंतील देशांशीं भारताचा व्यापार कोणत्या प्रमाणांत झाला तें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| | आयात | निर्यात |
|---|---|---|
| | (आंकडे कोटी रुपयांचे) | |
| पश्चिम जर्मनी | ११८·२१ | १९·८५ |
| फ्रान्स | १५·९८ | ७·९७ |
| इटली | २३·६८ | ९·२९ |
| बेल्जम | ११·४७ | ५·९३ |
| नेदरलँडस | १२·५० | ८०१ |
| लक्झेंबर्ग | ०·४० | किरकोळ |

पश्चिम जर्मनी व फ्रान्स हे दोन देश महत्त्वाचे असून त्यांच्याजवळ गुंतविण्यासारखा पैसा मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्याजवळील परदेशीय चलनाचा सांठा फुगत चाललेला आहे. इटलीजवळहि परदेशीय चलनाचा वरकड सांठा बराच आहे. परंतु इटली देश त्याच्या दक्षिणेकडील भागाचा विकास करण्यांत पैसा गुंतवीत आहे. त्यामुळें परदेशांत मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविणें त्याला शक्य होणार नाहीं. तथापि, एकंदरीनें भारतासारख्या विकसनशील देशांकडून येणाऱ्या मालाबद्दल उदार धोरण स्वीकारणें युरोपिअन बाजारपेठेंतील देशांना भाग पडत जाणार आहे. कारण, त्यावरच भौतिक भरभराट आणि स्वास्थ्य अवलंबून आहे. युरोपीय सामायिक बाजारपेठ आणि ब्रिटन ह्यांच्याशीं होणाऱ्या निर्यात व्यापाराचें मालनिहाय परीक्षण केल्यास काय दिसतें तें आतां पाहूं. २० महत्त्वाच्या निर्यात व्यापाराच्या मालाची परिस्थिति अशी आहे:—

### मालनिहाय परीक्षण

चहा–१९६१ मध्यें भारतानें निरनिराळ्या देशांना १२४·५ कोटी रुपये किंमतीचा चहा निर्यात केला. त्यांपैकी ७४·६ कोटी रुपये किंमतीचा चहा ब्रिटननें आयात केला. युरोपीय बाजारपेठेंतील देशांनीं फक्त २·१ कोटी रुपये किंमतीचा चहा आयात केला. पश्चिम जर्मनीनें १·१ कोटी रुपयांचा व नेदरलँडसनें ०·५ कोटी रुपयांचा चहा आयात केला.

कॉफी–१९६१ सालीं भारतानें एकूण ९·५ कोटी रुपये किंमतीची कॉफी निर्यात केली. ब्रिटननें ६·६ कोटी रुपये किंमतीची व युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांनीं ४·६ कोटी रुपये किंमतीची कॉफी घेतली. पश्चिम जर्मनीनें २·१ कोटी रुपयांची कॉफी घेतली.





सुखी जीवनाचा मार्ग दाखविणाऱ्या सहकारदीपास शतशः प्रणाम.

दि महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

alco

दीपावली शुभचिंतन!

ज्यांच्या सहकार्यानें, प्रेमानें आणि सदिच्छेनें रबर धंद्यामध्यें आम्हांस अग्रेसरत्व प्राप्त झालें त्या आमचे हितचिंतकांस ठेवीदारांस, भागधारकांस, कामगार बंधूंस व व्यापारी मित्रांस ही दीपावली व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लिमिटेड
पुणें ३, यांचेकडून प्रकाशित

कच्चा कापूस—एकूण १३·०० कोटी रुपये किंमतीच्या कापसाची निर्यात करण्यांत आली. युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांनीं १·१ कोटी रुपयांचा व ब्रिटननें अवघा ०·२ कोटी रुपयांचा कापूस घेतला.

संस्कारित तंबाखू—ब्रिटननें भारताकडून ११·३ कोटी रुपयांची तंबाखू आयात केली. युरोपीय सामाजिक बाजारपेठेंतील देशांनीं फक्त ०·६ कोटी रुपयांची तंबाखू घेतली. भारतानें एकूण १४·८ कोटी रुपयांची तंबाखू निर्यात केली.

काजूगर—एकूण १८·७ कोटी रुपय किंमतीचे काजूगर निर्यात करण्यांत आले. त्यांपैकी १·५ कोटी रुपये किंमतीची आयात ब्रिटननें केली. युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांची आयात अवघी ०·९ कोटी रुपये किंमतीची होती.

अक्रोड— १.६ कोटी रुपये किंमतीच्या निर्यातींपैकी ब्रिटननें ०·६५ कोटी रुपयांची आयात केली.

वेलदोडे—निर्यातींपैकी ब्रिटननें ०·०६ कोटी रुपयांची व युरोपीय देशांनीं ०·१७ कोटी रुपये किंमतीची आयात केली.

कॉटन वेस्ट—एकूण निर्यात ५·७ कोटी रुपये किंमतीची झाली. ब्रिटनची आयात ०·९ कोटींची व युरोपीय देशांची ०·४ कोटींची.

कच्ची लोकर—लोकरीची एकूण निर्यात ८·३ कोटी रुपयांची झाली. त्यांपैकी २·६ कोटी रुपयांची लोकर ब्रिटननें व ०·८ कोटी रुपयांची लोकर युरोपीय देशांनीं घेतली.

भुईमूग—युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांनीं १·२ कोटी रुपये किंमतीची आयात केली. ब्रिटननें अवघी ०·९ कोटी रुपये किंमतीची आयात केली.

अभ्रक—भारतानें अभ्रकाची एकूण निर्यात ९·८ कोटी रुपये किंमतीची केली. त्यांपैकी १·७ कोटी रुपये किंमतीची आयात ब्रिटननें आणि २·४ कोटी रुपये किंमतीची आयात युरोपीय देशांनीं केली.

मँगेनीझचें खनिज—एकूण १०·६ कोटी रुपयांचें खनिज निर्यात करण्यांत आलें. त्यांपैकी १·८ कोटी रुपयांचें खनिज ब्रिटननें आणि २·५ कोटी रुपयांचें खनिज युरोपीय देशांनीं आयात केलें.

लोखंडाचें खनिज—भारताची एकूण निर्यात १८·१ कोटी रुपये किंमतीची झाली. त्यांपैकी ब्रिटनचा वांटा १·८ कोटी रुपयांचा व युरोपीय देशांचा १·३ कोटी रुपयांचा होता.

पेंड—एकूण निर्यात १५·३ कोटी रुपये किंमतीची; ब्रिटनची आयात ११·८ कोटींची, युरोपीय देशांची आयात ०·४ कोटींची.

तागाच्या गोण्या व कापड—भारतानें एकूण ५३·५ कोटी रुपये किंमतीच्या तागाच्या गोण्या निर्यात केल्या. त्यांपैकी ब्रिटननें व युरोपीय देशांनीं मिळून २ कोटी रुपयांची आयात केली. तागाच्या कापडाची एकूण निर्यात ७८·१ कोटी रुपयांची झाली. त्यांपैकी ब्रिटनचा वांटा ४·२ कोटींचा व युरोपीय देशांचा वांटा ३·१ कोटी रुपयांचा होता.

गिरण्यांचें सुती कापड—एकूण निर्यात ४६·१ कोटी रुपयांची. त्यांपैकी ११·१ कोटी रुपयांचें कापड ब्रिटननें घेतलें आणि युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील देशांनीं १·०० कोटी रुपयांचें घेतलें.

कमावलेलीं कातडीं—भारतानें एकूण २५·८ कोटी रुपयांच्या मालाची निर्यात केली. त्यांपैकी १३·९ कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात ब्रिटननें केली. युरोपीय देशांनीं ७·८ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला.

बिडाचें लोखंड—ब्रिटननें ०·२ कोटी रु. च्या मालाची आयात केली. युरोपीय देशांनीं कांहींच आयात केली नाहीं.

लोहमिश्रित मँगेनीज—एकूण निर्यात ६ कोटी रुपयांच्या मालाची. ब्रिटन व युरोपीय देश ह्या दोघांचीहि आयात किरकोळ.

तेलें—भारताची एकूण निर्यात ४·७ कोटी रुपयांच्या मालाची, त्यांपैकी ब्रिटननें १·३ कोटी रुपये किंमतीची व युरोपीय देशांनीं १·१ कोटी रुपये किंमची आयात केली.

आर्ट सिल्क तंतू—भारताची एकूण निर्यात ४·७ कोटी रुपयांची, ब्रिटनची आयात ०.१ कोटींची व युरोपीय देशांची आयात शून्य. ह्याशिवाय युरोपीय बाजारपेठेंतील देशांनीं भारताकडून मिरी, कच्चीं कातडीं, लाख, काथ्याच्या सतरंज्या, इत्यादि माल सुमारें ९ कोटी रुपयांचा आयात केला. त्यांपैकी ४ कोटी रुपयांचा माल ब्रिटननें आयात केला. शिवणाचीं यंत्रें, डिझेल एंजिनें, लोखंडी माल, पोलादी फर्निचर, बल्ब, इत्यादि माल ब्रिटनला सुमारें १·५ कोटी रुपये किंमतीचा निर्यात केला जातो. युरोपीय देशांची ह्या मालाची आयात बेताचीच आहे.

## निर्यात व्यापाराचें रक्षण आवश्यक

भारताच्या निर्यात व्यापाराचें वर जें पृथक्करण करण्यांत आलें आहे. त्यावरून ब्रिटननें सामाजिक बाजारपेठेंत प्रवेश केल्यास चहा, सुती कापड, पेंड, तागाचा माल, कमावलेलीं कातडीं, मँगेनिझचें खनिज, कच्ची लोकर, तंबाखू; काजूगर, एंजिनियरिंगचा माल, इत्यादि मालाच्या निर्यातीवर विपरीत परिणाम होईल असें दिसतें. चहा, तागाचा माल, तंबाखू, कापड, ह्यांच्या निर्यातीवरील जकातींत सवलती देण्यांत आल्या तरीसुद्धां त्यांची निर्यात युरोपीय बाजारपेठेंत वाढविण्यास फारसा वाव नाहीं. बेल्जम आणि नेदरलँड्स् हे देश आपला स्वत:चा तागाच्या मालाचा धंदा वाढवीत आहेत. चहा, तंबाखू व तागाचा माल ह्यांच्या निर्यातीची ब्रिटनची बाजारपेठ गेल्यास नवीन बाजारपेठ मिळविणें कठीणच आहे. चहाचें उत्पादन करणारे मुख्य देश म्हणजे भारत, सीलोन, पाकिस्तान व पूर्व आफ्रिका हे होत. पण, ते सर्व राष्ट्रकुलांतीलच आहेत. त्यामुळें चहाची निर्यात इतरत्र वाढविणें फारसें शक्य नाहीं. चहाच्या जकातींत वाढ करण्यांत आली तर ब्रिटनमध्यें चहाची किंमत वाढेल व त्यामुळें अखेर त्याचा खप कमी होईल; किंवा कॉफीसारख्या एखाद्या पदार्थाला अधिक मागणी येऊं लागेल. ब्रिटन सामायिक बाजारपेठेंत सामील झाल्यास चहावरील आयात-जकात वाढणार ह्यांत शंका नाहीं. युरोपीय सामायिक बाजारपेठेंतील फ्रान्स, बेल्जम, नेदरलँड्स्, ह्यासारख्या कांहीं देशांनीं कापडाच्या निर्यातीच्या बाबतींत चांगली प्रगति केलेली आहे. ब्रिटनमधील कापडाच्या बाजारपेठेंत ह्या देशांच्या कापडाशीं स्पर्धा करणें भारताच्या कापडाला कठीण होत जाणार आहे. म्हणून जास्तींत जास्त परदेशीय चलन मिळवून व्यापारांतील तफावत कमी करण्यासाठी भारताला ब्रिटनबरोबर होणाऱ्या व्यापाराचें रक्षण केलेंच पाहिजे. ह्या व्यापारांत जर कांहीं घट होणार असेल तर युरोपीय सामायिक बाजारपेठेंत प्रवेश करतां यावा म्हणून भारताच्या निर्यात मालाला सवलती देण्यांत आल्या पाहिजेत. तरच होणारें नुकसान भरून येईल.

—

# पश्चिम जर्मनीपुढील शेतीचे प्रश्न

## कार्यक्षमतेसाठी यांत्रिकीकरणाचा अवलंब

*औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या पश्चिम जर्मनीसारख्या देशांत शेतीचा प्रश्न तो काय असणार, असें वाटतें. पुढील लेखांत दिलेल्या माहितीवरून तेथील शेतीच्या समस्यांवर प्रकाश पडेल, आणि छोट्या शेतीचा प्रश्न मूलत: भारतासारखाच कसा आहे तें समजून येईल.*

पश्चिम जर्मनी हा देश उद्योगप्रधान राष्ट्रांतील एक अग्रेसर देश आहे. परंतु, तेथील शेतीच्या व्यवसायाबाबत व शेतकऱ्यांच्या भवितव्याबद्दल कांहींशी अडचणीची परिस्थिति निर्माण झाली आहे. जर्मनीमधील शेतीच्या व्यवसायाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी काय करावें? इतर शेतीप्रधान देशांशीं स्पर्धा करतांना नवीन शेतकरी टिकून राहील कीं नाहीं? त्यासाठी शेतीच्या धंद्याला संरक्षण देतां येईल काय? जर्मन शेतकऱ्यांचें राहणीचें मान कसें टिकवून धरतां येईल? इत्यादि प्रश्नांना पश्चिम जर्मनीच्या सरकारला तोंड द्यावें लागत आहे. पश्चिम जर्मनी हा युरोपीय सामायिक बाजारपेठेंत सामील झालेला एक महत्त्वाचा देश आहे. त्यामुळें ह्या बाजारपेठेंत सामील झाल्यामुळें जर्मनीच्या शेतीबाबत आणखी अनेक तांतडीचे प्रश्न उपस्थित होणार आहेत. अजून तरी जर्मनींतील धान्याच्या किंमती एकंदरीनें स्थिर राहिल्या आहेत आणि त्यांत एकदम चढउतार होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. पण, उत्तर जर्मनीमधील शेतकरी धान्याच्या किंमती फार खालीं गेल्याची तक्रार करीत आहे. त्यांच्या तक्रारीचा विचार करून त्यांतून योग्य मार्ग काढण्याचें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलें आहे.

जर्मनीमधील शेतीच्या व्यवसायाची कार्यक्षमता वाढवून ती बऱ्याच उच्च पातळीवर नेण्यासाठी सरकार जोराचे प्रयत्न करीत आहे. जर्मनीमध्यें सध्यां रोजगार करणाऱ्या माणसांचा तुटवडा आहे. त्यांतच शेतीला प्रतिकूल अशा हवामानाची भर पडली आहे. त्यामुळें शेतीची परिस्थिति जराशी नाजूकच झाली आहे.

तरीसुद्धां बीं-बियाणांत सुधारणा केली, रोग व कीटकनाशक उपाय अधिक तीव्र स्वरूपाचे योजले, आणि शेतीवर आधुनिक यांत्रिक साधनांचा भरपूर उपयोग केला तर युरोपमधील धान्याच्या बाजारांत जर्मनी आपलें स्थान टिकवूं शकेल असा विश्वास सरकारला वाटत आहे. गेल्या वर्षी जर्मनीमधील शेतीचें यांत्रिकीकरण खूप झपाट्यानें झालें. सध्यां जर्मनींत सुमारें १० लाख यंत्रचलित नांगर शेतीवर वापरण्यांत येत आहेत. शेतावर मजुरी करणाऱ्यांचा तुटवडा असल्यामुळें जमिनीची नांगरणी आणि पीक गोळा करण्याचें काम यंत्रांकडून करवून घेण्यांत येत आहे. जर्मनीमधील पिकाचा हंगाम आतां संपला असून सुमारें ७०,००० यंत्रांकरवीं गहूं व बार्ली ह्या धान्यांच्या गोण्या भरण्याचें काम करण्यांत येत आहे. गेल्या सालीं पाणी-पुरवठा व सांडपाण्याचा निचरा करण्यावर बराच मोठा खर्च करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी पाणथळ जमिनींतून पाणी काढून लावण्यासाठी आणि लागवडीखालील जमीन वाढविण्यासाठी १५० कोटी मार्क्स इतकी रक्कम खर्च करण्यांत आली आहे. घोड्याकडून व गाईकडून ओढल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या गाड्या जर्मनींतून जवळ जवळ नाहींशा झाल्या आहेत. ग्रामीण भागांत आतां घोडासुद्धां फारसा दिसत नाहीं. घोडे जुंपलेली एखादी गाडी रस्त्यानें जातांना दिसली कीं लोक ह्या गाडीकडे मागील व पुन्हा न येणाऱ्या जमान्याची खूण म्हणून कुतूहलानें पाहूं लागले आहेत.


तथापि, शेतीचीं आधुनिक अवजारें वापरावयाचीं असतील तर मशागत करावयाची जमीन मोठी लागते; शिवाय त्या जमिनींत अडथळे असून चालत नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, यंत्रसामग्रीचा वापर सतत बराच वेळ केला तरच त्यापासून फायदा होतो. जर्मनीमध्यें अजूनहि छोट्या शेतांची व शेतकऱ्यांची संख्या बरीच आहे. पुष्कळदा एखाद्या शेतकऱ्याची जमीन सलग नसून तिचे तुकडे अंतराअंतरावर असतात. त्यामुळें छोट्या शेतकऱ्यांना जमिनीची मशागत करण्यासाठी जितका वेळ लागतो तितकाच वेळ पुष्कळदा शेताच्या एका तुकड्यावरून दुसऱ्या तुकड्यावर जाण्यासाठी लागतो. अर्थातच त्याच्या वेळाचा व श्रमाचा अयोग्य उपयोग होतो. ही परिस्थिति सुधारण्यासाठी जर्मन शेतकऱ्यांवर आपल्या विस्कळित तुकड्यांचें एकीकरण करण्याची सक्ति कायद्यानें करण्यांत येत आहे. युद्ध संपल्यापासून अशा प्रकारें सुमारें १०,००० शेतीच्या तुकड्यांचें एकीकरण करण्यांत आलेलें आहे. सुमारें ६० लाख एकर जमीन अथवा एकूण शेतजमिनीच्या सुमारें १७ टक्के जमीन अशा तऱ्हेनें पुनर्घटित करण्यांत आली आहे. श्रमाच्या दृष्टीनें विचार करतां फ्रेंच अगर इटालियन शेतकऱ्यांपेक्षा जर्मन शेतकऱ्याला अधिक काम करावें लागत आहे, आणि इतके श्रम करूनसुद्धां दक्षिण फ्रान्स, अल्जिरिआ अगर इटली ह्यांमधील शेतकऱ्यांपेक्षा जर्मनीचा शेतकरी कमी उत्पादन करतो. ह्याला कारण हवामान आहे. दक्षिण फ्रान्स, इटाली व अल्जिरिआ ह्यामधील सूर्यप्रकाशांत न्हालेली हवा पिकांच्या वाढीस फार अनुकूल असते. शेतकरी हा खुल्या हवेंत एकसारखा वावरत असल्यामुळें इतरांपेक्षा निरोगी असतो असा सर्वसाधारण समज आहे. पण पश्चिम जर्मनीच्या बाबतींत तरी तो खरा नाहीं. उलट, अलीकडेच जमविण्यांत आलेल्या आंकडेवार माहितीवरून असें दिसून आलें आहे कीं, शहरांतून राहून कचेरींत अगर कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांपेक्षा शेतकरी हा हीन परिस्थितींत आहे.

जर्मनींत असलेल्या सर्वसामान्य खेड्यांतील शेतकऱ्यांची परिस्थिति आरोग्य चांगलें राहण्यास फारशी अनुकूल नाहीं. त्यांचा आहार एकांगी आहे. ते पुरेशी झोप घेत नाहींत; अगर त्यांना ती मिळत नाहीं. विश्रांति घेण्यासाठी सुटीवर तर ते फारच क्वचित् जातात. त्यांतहि शेतीवर काम करणाऱ्या स्त्रिया अधिक काबाडकष्ट करतात. ३५ ते ५५ वर्षे वय असलेल्या ८५ टक्के स्त्रियांना एक दिवससुद्धां कधीं सुटी मिळत नाहीं. वर्षाचे ३६५ दिवस सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत त्यांना काम करावें लागतें. फक्त ६ टक्के स्त्रिया वर्षातून कांहीं आठवडे सुटी घेऊन परठिकाणीं जातात. ह्या उलट, शहरांत काम करणारे ४८ टक्के लोक वार्षिक सुटी कधींहि चुकवीत नाहींत. कचेरींतून काम करणारे २८ टक्के लोक आणि कुशल कामगारांपैकी २५ टक्के कामगार दरवर्षी कांहीं आठवडे सुटी घेतात. कारखान्यांतून काम करणाऱ्यांत पगारी सुटीचें वेतन घेऊन कामावर जाण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आहे. सरकार ह्या प्रवृत्तीला पायबंद घालण्याचा प्रयत्न करते. परंतु कारखान्यांचे मालक मात्र ह्या प्रवृत्तीबद्दल साहजिकच आनंद मानतांना दिसतात. आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांना

जर्मन शेतकऱ्याच्या आरोग्याबद्दल चिंता वाटण्याचें एक कारण असें आहे कीं, विशेषतः उन्हाळ्यांत जर्मन शेतकरी फार कमी झोपतो; त्याची झोपेची रोजची सरासरी ६ ताससुद्धां पडत नाहीं, आणि काम मात्र सर्व वर्षभर रोज सरासरी १४ तास पडतें. त्यामुळें जर्मन शेतकऱ्याचें आरोग्य बिघडत चाललें आहे. शेतावर काम करणाऱ्या पुरुषांना व स्त्रियांना पोटाच्या व्यथा जडलेल्या आढळून आल्या आहेत. ह्याला कारण त्यांचा एकांगी आहार असें डॉक्टरांचें मत आहे. शेतकरी उत्पन्न केलेला बहुतेक माल विकून टाकतो. भाजीपाल्याप्रमाणें शेतकरी लोणी व दूधहि विकून टाकतो. त्याचा आहार माफक असतो. ह्या व इतर कारणांमुळें जर्मन शेतकरी पुष्कळदा संधिवातानें पछाडलेला असतो.

शेतावर राबणाऱ्या स्त्रियांची परिस्थिति अधिकच बिकट आहे. पाठ मोडेपर्यंत काम, अपुरी झोप आणि आरोग्यास हानि पोंचविणारा आहार ह्यामुळें त्यांच्यावर फार ताण पडत आहे. ग्रामीण भागांत व्यवसाय करणाऱ्या एका डॉक्टरनें ३,००० शेतकऱ्यांच्या एका गटाची आरोग्यविषयक पाहणी केली. तेव्हां असें आढळून आलें कीं, पुरुषांपेक्षा स्त्रिया ह्या लवकर कायमच्या आजारी होतात. बहुतेक छोट्या शेतावर, शेतकरी, त्याची पत्नी आणि मुलें काम करतात; क्वचित् त्याचे कांहीं नातलगहि राबतात. शेतमजूर हा वर्ग नाहींसाच झाला आहे. कारखान्यांत निम्मा वेळ काम करून शेतावरील कामासाठीं मिळणाऱ्या रोजगाराच्या दुप्पट रोजगार मिळूं शकतो. अर्थातच शेतावर राबण्यास कोणी फारसा तयार नसतो. शेतकऱ्याला आपली स्वतःचीं मुलेंसुद्धां शेतावर राबण्यास तयार होतील किंवा नाहीं ह्याची शंका वाटते. शेतीच्या कामाची बहुतेक जबाबदारी जुन्या पिढीवरच अधिकाधिक प्रमाणांत पडूं लागली आहे. कांहीं ठिकाणीं तर असें आढळून आलें कीं, मुलाला जन्म दिल्यानंतर तिसऱ्याच दिवशीं स्त्रियांना शेतीवरील कष्टाचीं कामें करावीं लागलीं. ह्या स्त्रियांना कोणींहि काम करण्यापासून परावृत्त केलें नाहीं. कारण, शेतावर काम करण्यास माणसेंच मिळत नाहींत. ग्रामीण भागांत मृत्यूचें प्रमाणहि कांहीं खेड्यांतून बरेंच आढळून येतें. कारण पुष्कळदा डॉक्टरचा सल्ला फार उशिरां घेतला जातो. सामान्य शेतकऱ्याला मधूनमधून आरोग्याची तपासणी करवून घेणें ही एक चैनीची बाब वाटते.

पश्चिम जर्मनींत आतां छोटीं शेतें नाहींशीं होत चाललीं आहेत. अशा हजारों शेतांच्या जागा कारखाने घेत आहेत. असंख्य छोटे कारखाने निघत असून ते छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेत आहेत. शेतकरी आपली जमीन कारखान्याला विकतो व त्याच कारखान्यांत आपल्या मुलाबाळांसह रोजगार पत्करतो. जर्मनींतील छोटी शेती नाहींशी होत असून त्याची जागा मोठी शेती घेत आहे. ह्याचा एक परिणाम असा झाला आहे कीं छोट्या शेतकऱ्याचें राहणीचें मान सुधारण्याचा प्रश्न आपोआप सुटत चालला आहे. मोठी शेती ज्या प्रमाणांत विस्तार पावत जाईल त्या प्रमाणांत जर्मनींतील धान्य त्याच्या शेजारच्या इतर देशांतील धान्याशीं स्पर्धा करूं शकेल.



## शिक्षकांच्या आयुर्विम्याच्या पॉलिसी रद्द झाल्या

पूर्वीच्या मध्यप्रदेशांत ग्रामीण भागांत जनपद्सभा स्थापन करण्यांत आलेल्या होत्या. आतां त्या रद्दबातल झाल्या असल्या तरी त्यांनीं आपल्या अखत्यारामधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पगारांतून त्यांच्या आयुर्विम्याचे हप्ते भरण्यासाठी पैसे कापून घेतलेले होते. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेच्या चिटणिसांनीं ह्या बाबतींत अशी माहिती जाहीर केली आहे कीं, जनपद्सभांनीं कापून घेतलेले पैसे हप्त्यापोटीं न भरल्यामुळें बऱ्याच शिक्षकांच्या आयुर्विमा पॉलिसी रद्द झाल्या आहेत. एकट्या भंडारा जिल्ह्यांतील १६ पॉलिसी जनपद्सभांच्या उदासीनतेमुळें रद्द झाल्या आहेत.

---

## इतकीं महाग केळीं परवडणार नाहींत

भारतामधील केळीं परदेशीं पाठवून परदेशी चलनांत भर घालण्याच्या सूचना मधूनमधून करण्यांत येत असतात. केळीं हा पदार्थ लवकर नासणारा असल्यामुळें तो टिकविण्यासाठी शास्त्रीय उपायांचें संशोधनहि चालू आहे. भारतामधील केळीं रशियाला बोटीनें नेण्याऐवजीं विमानानें कां नेऊं नयेत अशी पृच्छा रशियाच्या व्यापारी प्रतिनिधीला मद्रास येथें करण्यांत आली असतां तो म्हणाला कीं, केळीं विमानानें रशियाला नेता येणें अशक्य नाहीं. परंतु तीं नेण्यासाठी वहातुकीचा खर्च फार होईल. परिणामीं केळीं रशियांत पोंचतील त्यावेळीं अतिशय महाग पडतील. रशियांतील लोकांना असलीं महाग केळीं खाणें परवडणार नाहीं.

---

## दारूबंदीची व्याप्ति वाढविण्यास विरोध


उत्तर प्रदेशांतील दारूबंदीचें क्षेत्र वाढविण्यांत यावें अशी सूचना सर्वोद्‌यवाद्यांतर्फे करण्यांत आली होती. आपलें म्हणणें उत्तर प्रदेश सरकारच्या मुख्यमंत्र्यांच्या कानीं घालण्यासाठी वाराणसी येथून दोनशें सर्वोदयवादी सत्याग्रही लखनौला गेले होते. उत्तर प्रदेशांतील दारूबंदी असलेल्या भागाची व्याप्ति वाढवितां येणार नाहीं, असें उत्तर मुख्यमंत्र्यांनीं दिलें. ते असेंहि म्हणाले कीं, दारूबंदीची व्याप्ति वाढविल्यास राज्यसरकारला दरसाल १० कोट रुपये अबकारी कराचें उत्पन्न बुडवावें लागेल. इतकें उत्पन्न बुडविणें सरकारला शक्य होणार नाहीं. तथापि मध्यवर्ती सरकारनें संपूर्ण दारूबंदीमुळें बुडणारें उत्पन्न राज्य-सरकारला भरून देण्याची तयारी दाखविली तर सर्व राज्यभर दारूबंदी चालू करण्यास सरकार तयार आहे.

---

## मोटारी चोरणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळ्या

माद्रिद येथें आंतरराष्ट्रीय पोलिस परिषद भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेला आलेल्या प्रतिनिधींना अशी माहिती सांगण्यांत आली कीं, गेल्या पांच वर्षांत १० लाख मोटारी चोरण्यांत आलेल्या आहेत. परिषदेला ह्या विषयासंबंधीं एक अहवाल सादर करण्यांत आला. गेल्या कांहीं वर्षांत मोटारींच्या चोऱ्यांचें प्रमाण इतकें वाढलें आहे कीं, अशा मोटारींची माहिती पुरविण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय पोलिस संघटना स्थापन करण्याचा विचार चालू आहे. अनेक देशांत मोटारींच्या चोऱ्या करणाऱ्या संघटित टोळ्या असून त्यांचे व्यवहार युरोप, आशिया व दक्षिण अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर चालू आहेत, अशी माहिती अहवालांत देण्यांत आली आहे.

---




तारेचा पत्ता :–मॉर्गेज टेलिफोन नं. २६४९७

# दी मुंबई राज्य सहकारी भूतारण बँक लिमिटेड

जे. के. बिल्डिंग, दुसरा मजला, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई १

( स्थापना : सन १९३५ )

**अध्यक्ष : श्री. नी. आ. कल्याणी**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ३०–६–१९६२ रोजीं |
| राज्य सरकार : | रु. ३०,००,००० |
| वैयक्तिक व इतर संस्था : | रु. ४५,०८,५३५ |
| | रु. ७५,०८,५३५ |
| निधि | रु. ७,७७,०१९ |
| गंगाजळी निधीकरितां ठेव | रु. १,७२,०१,०८५ |
| कर्ज | रु. ८,११,५८,६५७ |
| सर्वसाधारण व ग्रामीण कर्जरोखे | रु. ७,३६,३१,००० |

महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ विभागांतील

**प्राथमिक बँका**

| महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ | शाखा |
|---|---|---|---|
| (१) पूर्व खानदेश | (१) परभणी | (१) नागपूर | रत्नागिरी |
| (२) पश्चिम खानदेश | (२) वैजापूर | (२) वर्धा | |
| (३) सातारा | (३) बीड | (३) भंडारा | |
| (४) पाचोरा | (४) नांदेड | (४) अमरावती | |
| (५) पुणें | (५) उद्‌गीर | (५) अकोला | |
| (६) नाशिक | (६) औरंगाबाद | (६) खामगांव | |
| (७) सोलापूर | (७) उस्मानाबाद | (७) मेहकर | |
| (८) ठाणें–कुलाबा | | (८) यवतमाळ | |
| (९) अहमदनगर | | (९) चांदा | |
| (१०) कोल्हापूर | | | |
| (११) सांगली | | | |

विहीर, ऑईल इंजिन आणि पंपिंग सेटस्‌साठीं तगाई कर्ज वांटपाची सरकारी योजना बँकेनें हातीं घेतलेली आहे.

१·२० कोटी रुपयांच्या ग्रामीण कर्जरोख्यांच्या २ श्रेणी, बँकेनें आतांपर्यंत उभारल्या आहेत.

डॉ. म. वि. हाटे,
कार्यकारी संचालक.

### उत्पादकाला मालाची वाजवी किंमत मिळण्यासाठी

# सांठवणीच्या गुदामांची योजना

## व्यवस्थेचा फायदा व्यापारीच अधिक घेतात !

शेतीच्या मालाला चांगली बाजारपेठ लाभावी म्हणून पहिल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमांत मालाच्या सांठवणीसाठी मोठ्या प्रमाणावर गुदामें स्थापन करण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. मध्यवर्ती व राज्यसरकारांनीं ह्या कार्यक्रमाचा पुरस्कार करून गुदामांच्या सोयी उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली. शेतीचा माल सांठवून ठेवण्याच्या चांगल्या सोयी उपलब्ध नसल्यामुळें बाजारपेठांची रचना सदोष तर होतीच; पण त्याचबरोबर मालाचें अपुरें वर्गीकरण, वाहतुकीच्या अडचणी, इत्यादींनाहि शेतकऱ्यांना तोंड द्यावें लागे. मालाच्या निरनिराळ्या स्वरूपाप्रमाणें प्रत्यक्ष उत्पादकाला मिळणारी त्याची किंमत आणि गिऱ्हाइकांकडून मालाला दिली जाणारी किंमत ह्यांच्यांत पुष्कळच तफावत असते. तेव्हां शेतकऱ्याचें निकृष्ट राहणीचें मान सुधारण्यासाठी करण्यांत येणाऱ्या कोणत्याहि प्रयत्नांत बाजारपेठेची घडण सुधारण्याला सगळ्यांत अधिक महत्त्व देण्यांत आलें पाहिजे हें उघड आहे. गुदामें स्थापन करून सोयी उपलब्ध करून देण्यामुळें शेतीच्या मालाला चांगली बाजारपेठ मिळण्याची शक्यता उत्पन्न होते इतक्यापुरतेंच ह्या कार्यक्रमाचें महत्त्व नाहीं. मालाच्या सांठवणीची चांगली सोय झाल्यामुळें शेतकऱ्याला त्याच्या मालाच्या तारणावर कर्जहि मिळूं शकतें. बाजारपेठांच्या बाबतींत रूरल क्रेडिट सर्व्हेनें केलेल्या अहवालांत उपयुक्त सूचना केलेल्या आहेतच. परंतु ह्याच अहवालानें गुदामें स्थापन करून सोयी उपलब्ध करून देण्याबाबतहि राष्ट्रीय प्रयत्नांना खरी चालना दिलेली आहे. अहवालांत सूचना करण्यांत आल्याप्रमाणें अगदीं वरच्या टोकाला एका सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आणि राज्य पातळीवर स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सची स्थापना करण्यांत आली. देशांत अनेक ठिकाणीं गुदामें स्थापन करण्याचा मोठा कार्यक्रम त्यांच्यामार्फत हातीं घेण्यांत आला.

### बहुतेक गुदामें भाड्याच्या जागेंत

ह्या बाबतींत आतांपर्यंत जी प्रगति करण्यांत आली आहे, तीवरून असें दिसतें कीं, विशेषतः सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशननें गुदामें स्थापन करण्याच्या बाबतींत स्तुतीस पात्र असें कार्य केलेलें आहे. पुढील कोष्टकावरून ह्या कार्याची कल्पना येईल.

उद्दिष्टें आणि त्यांची पूर्ति

| | सेंट्रल वेअरहौसेसची संख्या | | स्टेट वेअरहौसेसची संख्या | |
|---|---|---|---|---|
| वर्ष | ठरविलेली | स्थापलेली | ठरविलेली | स्थापलेली |
| १९५७-५८ | | ६ | | |
| १९५८-५९ | ९ | ४ | ५० | ४२ |
| १९५९-६० | १० | १७ | १०३ | १०६ |
| १९६०-६१ | २१ | १३ | १२७ | १२२ |
| एकूण | ४० | ४० | २८० | २६६ |

गुदामें स्थापण्याच्या संख्येचा विचार केला तर दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत संकल्प केलेलीं बहुतेक गुदामें स्थापन करण्यांत आलीं असें दिसून येईल. तथापि, ह्यांपैकी बहुतेक गुदामें भाड्याच्या जागेंत उघडण्यांत आलेलीं होतीं. त्यामुळें झालेल्या कार्याला थोडा गौणपणा येतो ह्यांत शंका नाहीं. ह्या बाबतींत स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सनीं कमालीचें दुर्लक्ष केलेलें दिसतें. त्यांनीं एकहि नवें गुदाम बांधलेलें नाहीं. स्थापन केलेल्या गुदामांची संख्याच केवळ लक्षांत घेतली तर खूप कार्य झाल्यासारखें दिसतें. पण माल सांठण्याच्या सोयींची व्याप्ति लक्षांत घेतली तर तसें वाटत नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस १० लाख टन माल सांठविण्याची सोय करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें होतें. प्रत्यक्षांत मात्र सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशननें व स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सनीं मिळून ३,५६,००० टन मालाच्या सांठवणीची सोय केली. मध्यवर्ती संघटनेतर्फे ७९,०२३ टनांची आणि राज्यपातळीवरील संघटनांतर्फे २,७७,८७७ टनाची सोय करण्यांत आली. गुदामें स्थापन करण्याचा कार्यक्रम अमलांत आणण्याच्या कामीं निरनिराळ्या राज्यांची प्रगति कमी-अधिक झालेली दिसते. स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सची स्थापना करून त्यांच्यामार्फत गुदामें उभारण्याच्या कामीं राज्यांना जो वेळ लागला त्याचेंच हें प्रतिबिंब आहे.

### उत्तर प्रदेशाचा पुढाकार

सर्व राज्यांत, उत्तर प्रदेश सरकारनें सर्वांत अधिक म्हणजे ८७,३७५ टन माल सांठविण्याची सोय केली. त्याच्या खालोखाल महाराष्ट्र, म्हैसूर व मध्यप्रदेश ह्या राज्यांनीं अनुक्रमें ४३,३९०, ३८,४१७ व ३७,२५६ टन माल सांठविण्याच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. बहुतेक राज्यांतून २०,००० टनांपेक्षाहि कमी माल सांठवणीच्या सोयी उपलब्ध करून दिल्या गेल्या, असें आढळतें. राज्यांच्या कॉर्पोरेशन्सची द्रव्यविषयक घडणहि त्यांच्याकडून झालेल्या उशिराला कांहीं प्रमाणांत जबाबदार आहे असें म्हणतां येईल. सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशनच्या पैशांपैकी बराचसा भाग स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सच्या भाग भांडवलाच्या स्वरूपांत होता. उलट स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशनच्या पैशांपैकी बराच भाग बँकांकडील ठेवीच्या स्वरूपांत होता. एकूण मालमत्तेंत जमिनी, इमारती, गुदामें, इत्यादि प्रकारच्या कायम मालमत्तेचें प्रमाण अत्यल्प आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत गुदामें स्थापन करण्याचा जोराचा कार्यक्रम हातीं घेण्याचें सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशन व स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्स ह्यांनीं ठरविलें आहे. ह्या कार्यक्रमांत मध्यवर्ती संघटनेतर्फे ६० गुदामें स्थापन करण्यांत यावयाचीं आहेत. दोन्ही संघटनांमार्फत १६ लाख टन माल सांठविण्याच्या सोयी उपलब्ध करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. आतांपर्यंत जी प्रगति झाली आहे, तिच्यावरून हें उद्दिष्ट गांठलें जाण्याची शक्यता दृष्टिपथांत आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९६१–६२ सालांत मध्यवर्ती संघटनेनें २० नवीं गुदामें स्थापन केलेलीं आहेत. त्या-

शिवाय बऱ्याच राज्यांतील कॉर्पोरेशन्सनीं नवीन गुदामें बांधण्यासाठी अगर आयतीं मिळविण्यासाठी कामास प्रारंभ केलेला आहे. १९६१ सालांत राज्यांच्या कॉर्पोरेशन्सची प्रगति झपाट्यानें होऊं लागली आहे. ह्या संघटनांतर्फे स्थापन केलेल्या गुदामांची संख्या आतां ३४४ पर्यंत आलेली असून त्यामधून ३,०३,७९६ टन मालाची सांठवण करतां येईल अशी व्यवस्था आहे.

### गुदामाच्या पावत्यांचें तारण

गुदामांकडून मिळालेल्या पावत्यांच्या आधारावर शेड्यूल्ड बँकांनीं शेतकऱ्यांना किती प्रमाणांत कर्जे दिलीं हा प्रश्न गुदामांत माल सांठविण्याच्या पद्धतीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. कारण त्या प्रश्नाच्या उत्तरावरून ही पद्धत कितपत प्रसृत झाली आहे तें कळून येतें. गुदामांच्या पावत्यांच्या आधारावर १९६१ सालीं ५६९ लाख रुपयांचीं कर्जे शेतकऱ्यांना देण्यांत आलेलीं होतीं. १९६२ सालीं कर्जाची ही रक्कम ९२४ लाख रुपयांपर्यंत वाढलेली आहे. शेड्यूल्ड बँका मध्यवर्ती अगर राज्य कॉर्पोरेशन्सच्या गुदामांच्या पावतीच्या तारणावर जीं कर्जे देतात त्यांचें प्रमाण तारणावर देण्यांत येणाऱ्या इतर कर्जाच्या मानानें अल्प असतें. गेल्या दोन वर्षांत शेड्यूल्ड बँकांनीं अन्नधान्यें, भुइमूग, तेलबिया इत्यादि मालनिहाय तारणावर दिलेल्या कर्जाच्या प्रमाणांतहि चांगली वाढ झालेली दिसते. गुदामांच्या पावत्यांच्या तारणावर शेड्यूल्ड बँकांनीं एकूण जीं कर्जे दिलीं, त्यांपैकी ९४ टक्के कर्जे वरील तीन प्रकारच्या मालाच्या पावत्यांच्या तारणावर दिलेलीं आहेत असें रिझर्व्ह बँकेच्या माहितीप्रमाणें आढळतें. निरनिराळ्या राज्यांत गुदामांच्या सोयी ज्या प्रमाणांत उपलब्ध आहेत, त्या प्रमाणांत पावत्यांच्या तारणावर दिलेल्या कर्जाच्या आंकड्यांतहि फरक आढळून येतो. कर्ज मिळण्याच्या पात्रतेचा एक दस्त म्हणून गुदामांच्या पावत्यांचा उपयोग अधिक लोकप्रिय करण्यासाठी अजून पुष्कळ काम करावें लागेल. सध्यां कायद्यांतील कांहीं दोषांमुळें गुदामांच्या पावत्या सहजपणें बदला करतां येत नाहींत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ ॲक्टच्या कलम १७ (४) (डी) प्रमाणें कोणत्याहि शेड्यूल्ड बँकेच्या अगर स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या प्रॉमिसरी नोटेच्या आधारावर रिझर्व्ह बँकेला कर्ज देण्याचा अधिकार आहे. अर्थात् अशा नोटांना कांहीं विवक्षित अटी पूर्ण केलेल्या मालकी हक्कांच्या दस्तांचा आधार लागतो. पण परवाना धारण करणाऱ्या गुदामांच्या अभावीं हें कलम अमलांत आणतां येत नाहीं.

अशा प्रकारचे अडथळे दूर करण्यांत आले पाहिजेत. ह्या पद्धतीचा प्रसार करण्याच्या कामीं सहकारी बँका महत्त्वाचें कार्य करतील अशी अपेक्षा होती; परंतु सहकारी पद्धतीनें बाजारपेठांत माल आणण्याच्या बाबतींतील प्रगति बेताचीच झाल्यामुळें सहकारी संस्थांमार्फत गुदामांच्या पद्धतींचा प्रसार करण्यास फारसा वावच राहिला नाहीं. म्हणून सहकारी मार्केटिंग संस्था स्थापन करण्याच्या कार्यक्रमाला गुदामांची पद्धत प्रसृत करण्याच्या कामीं फार महत्त्व आहे.

### स्थानिक गरजांप्रमाणें व्यवस्था हवी

गुदामांत माल सांठविण्याच्या पद्धतीनें लक्षांत ठेवण्यासारखी प्रगति केलेली आहे ह्यांत शंका नाहीं. ह्याचें गमक असें कीं, अलीकडे गुदामांच्या सोयीचा फायदा घेणाऱ्या मालाच्या प्रकारांची संख्या ६४ पर्यंत वाढली आहे. सुरुवातीला फार थोड्या प्रकारचा माल गुदामांत येत असे. ह्या पद्धतीचा फायदा ज्या तऱ्हेनें घेण्यांत येत आहे त्याबद्दल आंकडेवार माहिती गोळा करण्यांत आली आहे. त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, गुदामांत माल ठेवण्याच्या सोयींचा फायदा प्रत्यक्ष उत्पादकांपेक्षा व्यापारीच अधिक प्रमाणांत घेत आहेत. गुदामांचा फायदा घेणाऱ्या प्रत्यक्ष उत्पादकांची टक्केवारी व्यापाऱ्यांच्या टक्केवारीच्या मानानें फारच कमी आहे. रिझर्व्ह बँकेच्या मताप्रमाणें सहकारी मार्केटिंग संस्था सध्यां अशा अवस्थेंत आहेत कीं, त्यांना गुदामांचा फायदा घेतां येणें शक्य होत नाहीं. प्रत्यक्ष उत्पादकाला त्याच्या मालाची जी किंमत मिळते तींत सुधारणा करण्याची जरूर असल्यामुळें त्याला गुदामांत माल ठेवण्याची पद्धत जास्तींत जास्त आकर्षक वाटणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां जीं ठिकाणें सहजगत्या जाण्या-येण्यासारखीं असतील अशा ठिकाणीं गुदामांच्या सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या पाहिजेत; आणि त्याचबरोबर गुदामांत माल ठेवण्याबद्दलचा आकार वाजवी असला पाहिजे व तेथील सोयी योग्य व पुरेशा असल्या पाहिजेत. रिझर्व्ह बँकेनें सुचविल्याप्रमाणें स्थानिक गरजांना अनुरूप अशा प्रकारच्याच सांठवणीच्या सोयी स्वीकारण्यांत आल्या पाहिजेत. नव्या प्रकारच्या सांठवणीच्या पद्धतीला उत्पादकांचा व इतरांचा जो विरोध होतो त्यावरून अनुरूपतेचें महत्त्व स्पष्ट होतें. निरनिराळ्या प्रकारच्या मालाच्या सांठवणीसाठी खास तऱ्हेच्या सोयींची व्यवस्था करणें विशेष जरुरीचें आहे.


जनसेवेचें व्रत—

ज्यानें जनसेवेचें व्रतच अंगीकारलें आहे, त्याच्यावर पूर म्हणा, महापूर म्हणा, कितीहि आपत्ति आली तरी तो त्याला धैर्यानें व नेकीनें तोंड देत असतो.

आमच्यावर कितीहि आपत्ति कोसळली तरी आम्हीं जनसेवा केली आहे, करीत आहोंत. तरी मुद्दाम जनसेवेला भेट द्या व खात्री करा.

जनसेवा भोजनालय ★ ★

डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ, पुणें ४, टे. नं. ५७१२६

प्रोप्रा. डी. जी. गोरे

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### गुदामांत माल ठेवण्याच्या व्यवस्थेची राज्यनिहाय वांटणी आणि गुदामांच्या पावत्यांच्या तारणावर शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं कर्जें, ३१ मार्च १९६१ अखेर

| प्रदेश राज्य / मध्यवर्ती | सांठवणीच्या एकूण व्यवस्थेशीं पडणारी सांठवणीची टक्केवारी | एकूण दिलेल्या कर्जाशीं पडणारी कर्जाची टक्केवारी |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ८·१ | १२·३ |
| आसाम | ३·८ | ४·२ |
| बिहार | ४·६ | ४·३ |
| गुजरात | ०·३ | ०·५ |
| केरळ | ३·५ | २·९ |
| मध्यप्रदेश | १०·४ | १४·४ |
| मद्रास | ३·६ | ५·४ |
| महाराष्ट्र | १२·३ | १३·४ |
| म्हैसूर | १०·८ | १२·६ |
| ओरिसा | २·३ | १·९ |
| पंजाब | ४·४ | ०·८ |
| राजस्थान | ५·७ | १·७ |
| उत्तरप्रदेश | २४·५ | २१·५ |
| प. बंगाल | ५·५ | ३·२ |
| दिल्ली | ०·२ | ०·४ |
| हिमाचल प्रदेश | ... | ... |
| एकूण | १००·०० | १००·०० |

### ३१ मार्च १९६१ अखेर सेंट्रल व स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन्सनीं मालाच्या सांठवणीसाठीं केलेल्या व्यवस्थेची राज्यनिहाय वांटणी

| प्रदेश | माल सांठण्याची व्यवस्था | | एकूण |
|---|---|---|---|
| राज्य/मध्यवर्ती | सेंट्रल वे. | राज्य वे. | (आंकडे टनांचे) |
| आंध्रप्रदेश | १२,८१५ | १५,९९२ | २८,८०७ |
| आसाम | २५७ | १३,२९७ | १३,५५४ |
| बिहार | ९०० | १५,४४० | १६,३४० |
| गुजरात | २६८ | ६७० | ९३८ |
| केरळ | १०,६७८ | १,९०० | १२,५७८ |
| मद्रास | २,२६३ | १०,७३१ | १२,९९४ |
| मध्यप्रदेश | ४,५०६ | ३२,७५० | ३७,२५६ |
| महाराष्ट्र | १०,६०० | ३३,३३० | ४३,९३० |
| म्हैसूर | ९,९१७ | २८,५०० | ३८,४१७ |
| ओरिसा | २,०५७ | ६,२०२ | ८,२५९ |
| पंजाब | ३,२५० | १२,३०० | १५,५५० |
| राजस्थान | २,०९० | १८,४५० | २०,५४० |
| उत्तरप्रदेश | १७,९८७ | ६९,३९० | ८७,३७५ |
| प. बंगाल | ६९२ | १८,९२५ | १९,६१७ |
| हिमाचल प्रदेश | ८५ | ... | ८५ |
| एकूण | ७९,०२३ | २,०७,८०७ | ३,५६,९०० |


शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्रराय यांनीं सर्टिफिकेट दिलेलें
रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीचें
चमन
चिमूटभर तोंडांत टाकतांच मुख सुगंधमय होतें.
बाटली किंमत १ रुपया
—: स्टॉकिस्ट्स् :—
(१) जयंत आणि कंपनी, लक्ष्मी रोड, पुणें २.
(२) विठ्ठलदास करसनदास, ५४४ फाकलँड रोड, मुंबई ४.
(३) किलाचंद दामोदरदास, मोती चौक, पुणें २.
(४) विठ्ठलदास डाह्याभाई, बेगमहंमद बिल्डिंग, फाकलँड रोड, मुंबई ४.
(५) सुलेमान हाजी हाशम सुपारीवाला, १९० अरर्कीन रोड, मुंबई ४.
★ स्टार कंपनी, बेळगांव ★



जय सहकार !
शेतकरी सहकारी संघ लि.
कोल्हापूर
(स्थापना ता. २३-१०-१९३९)
फोन : प्रमुख कचेरी १२५ — प्रमुख कचेरी : जुना राजवाडा, कोल्हापूर — तार : "शेतकरी"
शाखा मुंबई : ९१ खांड बाजार, काझी सय्यद स्ट्रीट, मांडवी, मुंबई नं. ३.
शेअर भांडवल रु. २,९२,७७५
रिझर्व्ह व इतर फंडस् रु. १५,१८,४१०
खेळतें भांडवल रु. ७१,८५,३००
—सन १९६१–६२ चा व्यवहार सतरा कोटींचे वर—
डिझेल व मोबिल तेलें, बैल छाप मिश्रखतें, धान्यें, औषधें, वस्त्रवस्तु भांडार, शुद्ध गोडें तेल, लोखंड, सिमेंट, पेट्रोल पंप, मुद्रणालय, इत्यादि.
ही दीपावली आमच्या सर्व सहकारी बांधवांना सुखसमृद्धीची जावो.
ना. गो. सरदेसाई, कार्यकारी–संचालक. — दा. गो. माने, अध्यक्ष.

# पूर्व युरोपमधील देशांशीं व्यापार वाढविण्याचें महत्त्व

ब्रिटन युरोपच्या सामायिक बाजारपेठेंत सामील होण्याची शक्यता असल्यामुळें भारताच्या निर्यात व्यापाराची दिशा बदलण्याच्या प्रश्नाला साहजिकच महत्त्व प्राप्त झालें आहे. पूर्व युरोपांतील देशांशीं होणाऱ्या व्यापारांत वृद्धि करण्याच्या कामीं फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेतर्फे आतांपर्यंत फारसा उत्साह दाखविण्यांत येत नव्हता. परंतु आतां संस्थेच्या ह्याबाबतच्या विचारांत बदल झाला असून ह्या प्रश्नाची पुन्हा नव्यानें चर्चा करण्यांत येण्याचा संभव आहे.

एक मतप्रवाह असा आहे कीं, पश्चिम युरोपशीं होणाऱ्या व्यापारांत जी घट होईल ती भरून निघत असेल तर पूर्व युरोपांतील देशांशीं व्यापार वाढविण्यास हरकत नाहीं. पूर्व युरोपशीं व्यापार वाढविण्याबाबत एक प्रमुख आक्षेप असा आहे कीं, भारताकडून पूर्व युरोपला निर्यात करण्यांत येणारा नेहमीचा माल त्या देशांकडून पुन्हा निर्यात केला जातो. ही प्रवृत्ति थांबविण्यासाठी आतां उपाय योजण्यांत येत आहेत. पूर्व युरोपकडून पश्चिम युरोपांतील देशांकडे होणाऱ्या ह्या पुनर्निर्यातीचें प्रमाण अलीकडे बरेंच घटलें असल्याचेंहि आढळून आलें आहे. पूर्व युरोपांतील देशांकडे निर्यात करण्यांत येणाऱ्या मालाचें पोंचण्याचें ठिकाण स्पष्ट निर्देश केलेलें असेल तरच त्याला भारताचें कस्टम्स खातें पुढें जाऊं देतें. ह्याचें कारण असें कीं, पुष्कळदा मालाचें पोंचण्याचें ठिकाण स्पष्ट न देतांच माल कधीं कधीं निर्यात केला गेला; आणि नंतर प्रवासांतील एडनसारख्या एखाद्या बंदरांतून तो परस्पर पश्चिम युरोपमधील बंदरांत नेण्याचा आदेश देण्यांत येऊं लागला. शिवाय परदेशांतील सरकारी भारतीय व्यापारी संघटनांना असें कळविण्यांत आलें आहे कीं, त्यांनीं पूर्व युरोपला भारताकडून निर्यात करण्यांत आलेला माल पश्चिम युरोपांतील देशांना पुन्हा निर्यात करण्यांत येत नाहीं ह्याबद्दल दक्षता घ्यावी. पूर्व युरोपमधील देशांशीं व्यापारी संबंध ठेवणाऱ्या सर्व कंपन्यांना भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें अशी सूचना केली आहे कीं, त्यांनीं संबंधित करारमदारांत माल पुन्हा निर्यात करण्यांत येणार नाहीं, अशा अर्थाचें स्पष्ट कलम घालावें.

भारताच्या परंपरागत निर्यात मालांपैकी फारच थोडा माल पूर्व युरोपांतील देशांना निर्यात केला जातो. भारताची चहाची एकूण निर्यात सुमारें ४३ कोटी पौंडांची आहे. परंतु त्यांतील अवघी ६ कोटी पौंडाची निर्यात पूर्व युरोपमधील देशांना करण्यांत आलेली आहे. तागाच्या एकूण निर्यातीपैकीं अवघा १३ टक्के माल, लोखंडाच्या खनिजाच्या एकूण निर्यातीपैकी ३० टक्के, काजूगरांच्या एकूण निर्यातीपैकी १२ टक्के, कॉफीच्या निर्यातीपैकी ३० टक्के, अभ्रकाच्या निर्यातीपैकी १० टक्के, तंबाखूच्या निर्यातीपैकी १५ टक्के, कच्च्या लोकरीच्या निर्यातीपैकी २५ टक्के, आणि वनस्पति तेलाच्या निर्यातीपैकी १४ टक्के माल पूर्व युरोपांतील देशांना निर्यात करण्यांत येतो. तेव्हा परंपरागत मालाच्या निर्यातींत खरी वाढ न होतां ह्या व्यापाराची दिशाच तेवढी बदलेल ह्या भीतींत फारसा अर्थ नाहीं. शिवाय पूर्व युरोपांतील देशांकडे निर्यात करण्यांत येणाऱ्या मालांत अलीकडे नेहमींच्या निर्यात मालापेक्षा वेगळा मालहि निर्यात करण्यांत येऊं लागला आहे. नेहमींच्या मालापेक्षा दुसरा वेगळया प्रकारचा माल निर्यात करण्याची भारताला आस्था आहे, हें आतां त्या देशांना कळूं लागलें आहे. १९५८ सालीं भारत व पूर्व युरोपांतील देश ह्यांच्या दरम्यान ६५ कोटी रुपये किंमतीच्या मालाची व्यापारी देवाण-घेवाण झाली. १९६१ सालीं हा आंकडा १३० कोटी रुपयांपर्यंत आला आणि १९६२ सालीं १६० कोटी रुपये किंमतीच्या मालाचा व्यापार होईल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस पूर्व युरोपांतील देशांशीं होणारा व्यापार २०० कोटी रुपयांच्या घरांत जावा असें उद्दिष्ट भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ठरविलें आहे. पूर्व युरोपांतील देशांशीं होणारा भारताचा व्यापार वाढला तर त्याचें स्वागतच झालें पाहिजे. परंतु ह्या बाबतींत एक मुद्दा महत्त्वाचा आहे. ह्या व्यापारांत भारतांत होणारी आयात भांडवली स्वरूपाच्या मालाची व आवश्यक अशा औद्योगिक कच्च्या मालाची असली तरच ती भारताला फायद्याची होईल. शिवाय, आयात होणाऱ्या मालाचा दर्जा व किंमत हीं दोन्हीहि भारताला इतर ठिकाणांहून मिळणाऱ्या ह्याच प्रकारच्या मालाच्या दर्जाशीं व किंमतीशीं तुलना होईल अशी असलीं पाहिजेत.


विविध प्रकारच्या कापडाच्या ' क्वालिटी ' व ' गॅरेंटी ' मुळें,

सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेलें पुण्यांतील अग्रेसर कापडदुकान

ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स

' होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी '

पेरूगेट रोड, पुणें २.

(फोन नं. ५७३१८)

# सरकारी कारभारांतील भ्रष्टाचार

## तेव्हां आणि आतां

भारत सरकारनें राज्यकारभारांतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एक कमिटी स्थापन केली आहे. कारभारांतील भ्रष्टाचाराला आळा बसविण्यासाठी सध्यां जे उपाय योजिले जात आहेत, त्यांची पाहणी करणें आणि भ्रष्टाचारविरोधी इलाज अधिक परिणामकारक ठरण्यासाठी काय करावें ह्यासंबंधी उपाय सुचविणें, हा कमिटीची स्थापना करण्याचा सर्वसाधारण हेतु आहे. ह्या कमिटीची व्याप्ति मध्यवर्ती सरकारच्या खात्यांतील नौकरांपुरतीच मर्यादित असली, तरी हा विषय अखिल भारतीय महत्त्वाचा आहे. कारण, भ्रष्टाचार आणि त्याला आळा घालणारी यंत्रणा व कार्यपद्धति हीं सर्वत्र एकसारखींच आहेत. कमिटीनें मध्यवर्ती सरकारच्या खात्यांवर नजर ठेवणारीं निरनिराळीं पाळत पथकें अधिक कार्यक्षम कशी होतील ह्याविषयीं उपाय शोधून काढावयाचे आहेत; त्याचप्रमाणें भ्रष्टाचारी प्रकारांचा छडा लावण्यासाठी नेमण्यांत आलेल्या खास पोलिसांच्या पथकांच्या कामांत सुधारणा घडवून आणण्यासाठीहि इलाज सुचवावयाचे आहेत. त्याशिवाय निरनिराळ्या खात्यांमधील चालू उपाय अधिक कडक करणें, लांचलुचपतीचीं अगर गुन्हेगारीचीं जीं प्रकरणें उजेडांत येतील त्यांचा निकाल त्वरित लावणें, ह्याबाबतींतहि कमिटीनें लक्ष घालावयाचें आहे. भ्रष्टाचार आणि लांचलुचपत ह्यांच्या प्रमाणांत वाढ कां होत आहे आणि वाढीची ही प्रवृत्ति कमी करण्यासाठी काय उपाय योजावेत, ह्यासंबंधीं सूचना करण्याचें काम कमिटीच्या कक्षेंत येत नाहीं. अशा प्रकारची चौकशी जर करण्यांत आली तर हा प्रश्न आर्थिक व राजकीय प्रवाहांच्या भोवऱ्यांत गुरफटून जाईल; आणि ह्या प्रवाहांचें नियमन करणें हें सध्यां तरी सरकारच्या शक्तीच्या बाहेर असणें शक्य आहे.

भ्रष्टाचाराच्या प्रश्नाचा विचार करतांना पूर्वीं कधींहि झालेलें नव्हतें इतकें नैतिक अधःपतन घडवून आणणाऱ्या राजकीय व आर्थिक कारणांची दखल घ्यावी लागेल. हें झालें एक टोक. दुसऱ्या टोकाला भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी उभारण्यांत यावयाची अचूक पद्धत कशी असावी, हा प्रश्न उभा राहतो. कोणत्याहि प्रकारच्या राजकीय भ्रष्टाचारापासून अलिप्त असलेलें व नैतिक अधिष्ठानावर उभें असलेलें सरकार असणें ही स्थिति आदर्शच म्हटली पाहिजे. राज्यकारभारांतील प्रत्येक घडामोडीवर नजर ठेवणारी, शक्यतर भ्रष्टाचार अजिबात थांबवणारी, किंवा ते न जमल्यास भ्रष्टाचार लवकर हुडकून काढून त्यावर उपाय-योजना करणारी एखादी गुप्तपोलिस संघटना असणें हें आदर्श असलें तरी इष्ट नाहीं. राजकीय भ्रष्टाचारापासून पूर्णपणें अलिप्त असणारें सरकार आणि सदैव जागरूक गुप्तपोलिससंघटना ह्यांच्या दरम्यान राज्यकारभाराचें नेहमींचें क्षेत्र पसरलेलें आहे. ह्या क्षेत्रांत वावरणाऱ्यांना सन्मान्य कर्तव्य म्हणून भ्रष्टाचारापासून दूर राहून शुद्ध चारित्र्य राखण्यासाठी शिक्षण व उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. ह्या क्षेत्रांतील जे लोक चुका करतील त्यांना त्यांच्यावरील अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यांत आलें पाहिजे; त्यांच्या चुका सुधारण्यांत आल्या पाहिजेत. जे लोक बेपर्वा आहेत अगर जे चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्नच करीत नाहींत, अगर गुन्हेगारीच्या स्वरूपाचीं कृत्यें करतात, अशाच लोकांना फक्त चौकशीसमितीपुढें अगर कोर्टापुढें उभें करण्यांत आलें पाहिजे. राज्यकारभाराच्या क्षेत्रांतील हा जो मधला भाग आहे त्याचें महत्त्व, कार्यक्षमता, आणि नैतिक आधार हीं गेल्या कांहीं वर्षांत दुबळीं झालेलीं आहेत.

भारत स्वतंत्र झाल्यावर जें नवें राज्य आलें त्यांत भ्रष्टाचार ही घटना नव्यानें उदयास आली आहे, असें म्हणणें बरोबर अथवा योग्य होणार नाहीं. ब्रिटिश राजवट भारतांत असतांनाहि भ्रष्टाचार होताच; पण आज त्याचें स्वरूप, व्याप्ति आणि प्रकार हीं तिन्ही खेद वांटण्याइतकीं वाढलेलीं आहेत. भ्रष्टाचार हा सर्वत्र सर्वकाळ पसरलेला आहे असें समजून त्याची चर्चा करणें धोक्याचें आहे. कारण, अशा चर्चेमुळें राज्यकारभाराची इभ्रत कमी होईल आणि सत्तेविषयीं वांटणारा आदर आणि विश्वास ह्यांना धक्का पोंचेल. भ्रष्टाचार ज्या ठिकाणीं आढळेल त्या ठिकाणीं तो निश्चयानें आणि त्वरित नाहींसा करणें आणि तसा तो नाहींसा करण्याची प्रतिज्ञा करणें, ह्यांतच शहाणपणा आहे. वाईट गोष्ट ही चर्चेनें अगर प्रसिद्धीनें कधींच नाहींशी करतां येत नाहीं. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांना जास्तींत जास्त प्रसिद्धि देण्याची गरजच आहे असें नाहीं. तथापि, असे जे प्रकार उघड होतील त्यांची सार्वजनिक रीत्या चौकशी करणें अगत्याचें आहे. हे प्रकार गुलदस्तांत ठेवणें योग्य होणार नाहीं. सध्यां सरकारच्या कार्य-क्षेत्राची व्याप्ति व सरकारतर्फे करण्यांत येणारा खर्च हीं दोन्हींहि वाढलेलीं आहेत. ही बाब सोडून दिली तरी ब्रिटिश कारभार भारतामधून गेल्यापासून भ्रष्टाचार व लांचलुचपत कां वाढलीं आहेत असा प्रश्न विचारल्यास त्याचीं कारणें थोडक्यांत पुढील-प्रमाणें सांगतां येतील. पहिली गोष्ट अशी कीं ब्रिटिश राजवटीनें प्रामाणिकपणा व सचोटी ह्यांना अतिशय महत्त्व दिलें होतें. संशयित सचोटीचीं दहा माणसें शिक्षेविना सुटलीं तरी चालतील, पण प्रामाणिक नोकरांच्या सचोटीची दखल घेतली गेली नाहीं असें होतां कामा नये, असा राजवटीचा दंडक होता. प्रामाणिकपणा व सचोटी ह्या गुणांना ह्यापेक्षा अधिक चांगलें उत्ते-जन तें काय असणार ? ब्रिटिश कारभाऱ्यांना कामाचें तपशीलवार ज्ञान असे आणि ते जबाबदारीच्या जागांवर प्रामाणिक माणसांची निवड अतिशय काळजीपूर्वक करीत. चांगला कारभार आणि कार्यक्षमता हीं सचोटीशिवाय नांदूं शकणारच नाहींत अशी त्यांची खात्री होती. किरकोळ चुका अगर क्षम्य गैरवर्तन ह्यांना प्रमाणाबाहेर महत्त्व त्यांनीं कधीं दिलें नाहीं. पण, त्याचबरोबर गंभीर गैरवर्तणुकीकडे क्षुल्लक म्हणून काणाडोळाहि त्यांनीं केला नाहीं. भ्रष्टाचारावर गुलाबपाणी शिंपून त्याची घाण लपविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. इतरांना उदाहरण घालून देण्यासाठी उघड उघड भ्रष्टाचारी नोकरांना त्यांनीं योग्य त्या शिक्षा जरूर दिल्या.

कोणत्याहि माणसाबद्दल मत बनवितांना त्याची सर्वसाधारण कीर्ति लक्षांत घेण्यांत येई. त्याचप्रमाणें पूर्वग्रहापासून अलिप्त अशी शहानिशा व्यक्तिशः करण्यांत येई. सामान्यतः प्रामाणिक म्हणून मानल्या गेलेल्या नोकरानें जर कांहीं नियमबाह्य वर्तन केलें

तर त्याकडे दुर्लक्ष करण्यांत येई अगर त्याला योग्य सल्ला अगर इषारा देण्यांत येई. पण एखादा नोकर जर उघड उघड अप्रामाणिकपणानें अगर गैर वागत असेल तर त्याच्या किरकोळ दुर्वर्तनाचाहि जाब त्याला द्यावा लागे. एखाद्या विशिष्ट ठिकाणीं अगर विशिष्ट कार्यीं भ्रष्टाचार व लांचलुचपत दिसून आल्यास त्या ठिकाणच्या वरच्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेची तपासणी करण्यांत येई. भ्रष्टाचार हा फक्त खालच्या थरांतील नोकरांपुरताच मर्यादित असतो, वरच्या अधिकाऱ्यांची त्याबद्दल कांहींच जबाबदारी नाहीं, असें मानणें बेजबाबदार आणि अशिष्ट समजले जाई. भ्रष्टाचाराला जबाबदार असणाऱ्या लोकांचें रक्षण कोणत्याहि प्रकारच्या दडपणानें करण्यांत येत नसे. ज्यांना दडपण आणतां येत नाहीं अशाच लोकांना फक्त शिक्षा झाल्याचीं उदाहरणें क्वचितच घडत. शिक्षा देतांना भेदभाव दाखविला जात नसे अगर शिक्षा अयोग्यहि क्वचितच असे.

भ्रष्टाचाराकडे बघण्याचा हा दृष्टिकोण व्यवहार्य होता आणि आजहि तो तितकाच कार्यक्षम होऊ शकेल. पण त्याच्या कार्यक्षमतेंत आज बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या आहेत. अलीकडे अधिकाऱ्यांच्या हातीं पैसा वांटण्याचे अधिकार मोठ्या-प्रमाणावर आलेले आहेत; सरकारी नोकरांत सवलती मिळविण्याची स्पर्धा वाढलेली आहे. लोकांत लोभवृद्धि झाली असून सद्सद्विवेक बुद्धि दुबळी झालेली आहे. ऐटींत राहण्याची वृत्ति बळावली आहे; पगार अपुरे आहेत; महागाई वाढलेली आहे. नवीन हित-संबंध निर्माण झालेले आहेत. ह्या व इतर अनेक कारणांमुळें पूर्वीचा दृष्टिकोण सर्वस्वीं उपयुक्त ठरणें अवघड आहे. भ्रष्टाचाराचीं जीं प्रकरणें उजेडांत आलीं आहेत आणि ज्यांची चौकशी झाली आहे त्यांची तपासणी केली तर ज्या कच्च्या दुव्याकडे लक्ष द्यावयास पाहिजेत तें स्पष्टपणें दिसून येतात

सरकारी खात्याच्या प्रत्येक प्रमुखानें आपल्या खात्याची नैतिक शुद्धता करण्याचें काम जोरानें चालू केलें पाहिजे. प्रत्येक खात्यांतील भ्रष्टाचाराचे प्रकार विशिष्ट पद्धतीनें होत असतात. त्यामुळें बाहेरच्या कोठल्याहि एका माणसाला अगर कमिटीला कारभारांतील प्रत्येक विभागांतील कच्च्या दुव्यावर अचूक बोट ठेवता येणार नाहीं. कांहीं जुन्या खात्यांत तर भ्रष्टाचाराचे कांहीं प्रकार शिष्टाचारांत व नेहमींच्या परिपाठांत मोडू लागले आहेत. कारभाराच्या प्रत्येक शाखेंत अगर संघटनेंत जर शुद्धीकरणाची मोहीम सुरू करण्यांत आली, तर त्या त्या शाखेंतील अगर संघटनेंतील प्रामाणिक नोकरांना भीति वाटू लागेल आणि पुढाकार घेण्याचे बंद करतील अशी शक्यता आहे. खात्यांतील कामाची गतीहि मंदावण्याचा संभव आहे. म्हणून, अनुभवी आणि संशयातीत असलेले खातेप्रमुखच शुद्धीकरणाचें कार्य तारतम्यानें व यशस्वी रीत्या करू शकतील.

---

### पोस्टाच्या तिकिटांना रुचकर गोंद

फ्रान्समधील पत्रांना लावण्यांत येणाऱ्या तिकिटांच्या मागें आतां रुचकर गोंद लावण्यांत येणार आहे. पत्रांना लावण्याचीं तिकिटें मागील बाजूनें ओलीं करण्यासाठी ओला स्पंज ठेवण्याची व्यवस्था कचेऱ्यांतून असते. पण तरी सुद्धां पुष्कळसे लोक तिकिटें जिभेनेंच ओलीं करतात. अशी संवय असणाऱ्या फ्रेंच लोकांनीं फ्रान्सच्या पोस्टखात्याकडे तक्रार केली. तिकिटांना लावण्यांत आलेल्या गोंदाच्या वाईट वासामुळें आपल्या जेवणाचा विचका होतो अशी त्यांची तक्रार होती. पोस्टखात्यानें रुचकर गोंद लावून तिचें निवारण करण्याचें ठरविलें आहे.


दूरध्वनि क्रमांक—१०३ श्रीरामपूर     तार—छत्रपति, राहुरी

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि., श्रीशिवाजीनगर

ता. राहुरी, जिल्हा अहमदनगर.

स्थापना – १९५४ ]     [ सभासद संख्या – १८६३

समाजवादी सहकारी भारताच्या उन्नतीसाठी अविरत श्रम करणाऱ्या सर्व नेत्यांना व श्रमजीवी जनतेस दीपावलीच्या मंगल प्रसंगीं आमचे प्रणाम.

कारखान्याचा पांचवा ऊंस गळीत हंगाम यशस्वी रीतीनें पार पडला असून सहावा ऊंस गळीत हंगाम दि.८-१०-१९६२ रोजीं विजयादशमीचे शुभ मुहूर्तावर सुरू झालेला आहे.

—: गेल्या पांच वर्षांतील उत्पादनाची माहिती :—

| हंगाम | एकूण गळीत टन | एकूण साखर पोतीं | सरासरी उतारा |
|---|---|---|---|
| १९५७–५८ | १,२५,५९४ | १,२७,०५९ | १०·२०८ |
| १९५८–५९ | १,२३,१५८ | १,४६,३५४ | ११·७६ |
| १९५९–६० | १,५६,१७१ | १,८६,५६४ | १२·००२ |
| १९६०–६१ | १,९७,०५७ | २,२६,२९५ | ११·७० |
| १९६१–६२ | १,८०,५६१ | २,१५,७७० | ११·८५३ |

( शेरा—भारत सरकारचे धोरणानुसार सन १९६१–६२ मध्यें उत्पादन कमी केलें. )

राहुरीच्या शुभ्र व दाणेदार साखरेस सर्वत्र चांगली मागणी आहे. आपण आपली मागणी केव्हांहि नोंदूं शकता.

**पां. वा. पवार** मॅनेजिंग डायरेक्टरकरितां.     **बी. बी. तनपुरे** चेअरमन.



सहकारी चळवळीचें गौरवस्थान

## श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

तारः—गंगासागर ] **गंगानगर–इंचलकरंजी.**     [ फोन नं. ५

उंसाचें गाळप, साखरेचें उत्पादन, सभासदांना मिळालेला उसाचा दर व डिव्हिडंड आणि कामगारासाठी सुधारलेली वेतन-श्रेणी व बोनस, या सर्वच बाबतींत उच्चांक प्रस्थापित करून अल्पावधितच सर्वांच्या प्रशंसेस पात्र ठरलेला हा कारखाना आजवर संपादिलेल्या सुयशामध्यें नव्या उच्चांकाची भर टाकण्यासाठी येत्या दिवाळीच्या सुमारास चतुर्थ गळीत हंगामाचा शुभारंभ करीत आहे.

महाराष्ट्र, म्हैसूर, गुजराथ, गोवा व केरळ या राज्यांतील प्रमुख पेठांबरोबरच कारखान्याच्या साखरेनें भारताबाहेरील देशांतहि पदार्पण केलें आहे.

हजारों वर्षांपूर्वी गंगेच्या काठीं आर्य संस्कृति निर्माण झाली. आज श्री पंचगंगेच्या काठीं या कारखान्याच्या रूपानें सहकारी जीवनाची संस्कृति साकार होत आहे.


सालस, विशालवृत्तीच्या व तळमळीच्या संचालक मंडळाची गेल्या ७–८ वर्षांची निष्काम सेवा रुजू करून घेऊन त्यांच्यावर पुनश्च टाकलेली जबाबदारी अधिक यशस्वीपणें पार पाडण्यासाठीं संचालक मंडळ अहर्निश प्रयत्न करीत आहे. या महान् कार्यांत समंजस सभासद आणि आत्मीयतेनें काम करणारा कामगारवर्ग आपापल्या प्रयत्नांची साथ देत आहे.

दीपावली आणि नवीन वर्ष आमचे शेतकरी सभासद, सहकारी कार्यकर्ते, कामगार, हितचिंतक, व्यापारी बंधू व असंख्य ग्राहक या सर्वांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

**बी. एन्. गरगटे** इनचार्ज मॅनेजिंग डायरेक्टर.     **एम्. व्ही. सुलतानपुरे** व्हाईस चेअरमन.     **रत्नापा कुंभार** एम्. एल. ए. चेअरमन.

# शेतकऱ्यांच्या औद्योगिक विकासाचे प्रणेते

## श्री. हरिभाऊ गिरमे



महाराष्ट्रांत अशा कांहीं व्यक्ती आहेत कीं, ज्यांचा परिचय वाचकांना करून देतांना एक प्रकारचें समाधान लाभतें. महाराष्ट्र हा उद्योगधंद्याचा प्रांत म्हणून अलीकडेच प्रसिद्धीस येऊं लागला आहे. राजकारण हा मराठी माणसांचा खरा मनोधर्म. त्यामुळें राजकारणी पुरुषांचाच व्यक्तीपरिचय करून देण्याची प्रथा जास्त रुळली गेली. आपल्या असामान्य कर्तृत्वामुळें जी मंडळी औद्योगिक क्षेत्रांत आवाडीवर होती व आहेत ती राजकारणापासून पुष्कळशी अलिप्त राहिल्यानें समाजास त्यांची ओळख नीट पटली नाहीं. कोणी पटवून देण्याचा फारसा प्रयत्न केला नाहीं.

### एका कालखंडाचा परिचय

अलीकडे महाराष्ट्राचा जसजसा औद्योगिक विकास घडत आहे तसतसा त्या क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींचा परिचय होत आहे. किर्लोस्कर, अर्थ, यांसारखीं नियतकालिकें या बाबतींत जागरूक असून औद्योगिक विकासाची घडण चांगल्या रीतीनें घडवून आणण्यांत ज्या व्यक्तींचें तन-मन-धन खर्ची पडलें आहे आणि पडत आहे त्यांचें यथार्थ दर्शन समाजास घडवीत आहेत. अर्थ नियतकालिकाच्या या उपक्रमामुळें महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत एका वेगळ्या वैशिष्ट्यानें प्रसिद्धीस आलेल्या श्री. हरिभाऊ बळवंत गिरमे या शेतकऱ्याचा परिचय वाचकांना करून देण्याची संधि मिळत आहे.

हा परिचय म्हणजे केवळ त्यांचा जन्म, शालेय शिक्षण, कौटुंबिक मंडळी किंवा औद्योगिक क्षेत्रांतील त्यांची कामगिरी एवढ्यापुरतीच मर्यादित नसून तो एका कालखंडाचा परिचय आहे.

सासवड माळी शुगर फॅक्टरी या सहकारी तत्त्वावरील शेतकऱ्यांच्या साखर कारखान्याचा रौप्यमहोत्सव साजरा करितांना श्री. हरिभाऊ गिरमे यांचे कार्याविषयीं बोलतांना ना. यशवंतराव चव्हाण यांनीं त्यांना 'महाराष्ट्रांतील एक तीर्थस्थान' असें गौरवानें म्हटल्याचें या वेळीं स्मरतें. धार्मिक क्षेत्रांत जशीं कांहीं तीर्थक्षेत्रें अवश्य दर्शन घेण्यालायक आहेत, त्याचप्रमाणें गिरमे कुटुंब आणि त्यांचें कार्यक्षेत्र हें, महाराष्ट्राचा सर्वांगीण शेती आणि औद्योगिक विकास घडत असतांना त्या क्षेत्रांतील अभ्यासू व्यक्तीनें जरूर भेट दिली पाहिजे असें ठिकाण आहे. मुख्य मंत्री आपल्या भाषणांत पुढें म्हणाले "गेल्या पंचवीस-तीस वर्षांत कारखान्याची खूप भरभराट झाली आहे. नव्या नव्या इमारती, सुखसोयी येथें उपलब्ध झाल्या आहेत. पण श्री. हरिभाऊ गिरमे यांचें व्यक्तिमत्व गेलें कित्येक दिवस मी आहें तसेंच पाहात आहें. डोक्यावरील त्यांचा तो पिवळसर फेटा, त्याच रंगाचा कोट, धोतर आणि हातांत छत्री, या त्यांच्या साध्या पेहरावांत कांहींहि बदल झालेला मला आढळत नाहीं. महाराष्ट्रास त्यांनीं एक मोठा आदर्श घालून दिला आहे. शेतकरी कारखानदार बनूं शकतो हें त्यांनीं स्वकृतीनें सिद्ध करून दिलें आहे."

### सासवडहून अकलूजला स्थलांतर

थोरांच्या चरित्राचा पूर्वार्ध बहुधा हलाखीचा आढळतो. पुणें जिल्ह्यांतील सासवड या गांवीं १८९८ सालीं एका अगदीं गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबांत हरिभाऊंचा जन्म झाला. इंग्रजी पांच-सहा इयत्तांपर्यंत त्यांना शिकतां आलें. शेती हा कौटुंबिक व्यवसाय असल्यानें त्यांतच त्यांनीं जास्त लक्ष घातलें. पण कर्तबगारीस सासवड गांवचें क्षेत्र त्यांना अपुरें वाटल्यानें स्थलांतर करीत करीत १९३० चे सुमारास सोलापूर जिल्ह्यांतील अकलूज भागांत ते स्थिर झाले. विशेष असें कीं, हें स्थलांतर म्हणजे प्रगतीचे दृष्टीनें वाटचाल, त्यांनीं एकट्यांनीं कधींच केली नाहीं. आपल्याबरोबर सर्व मित्रमंडळींना त्यांनीं घेतलें. सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन श्री. भगवंत गेनूजी गिरमे, श्री. नानासाहेब पांढरे, रावबहादूर नारायणराव बोरावके, श्री. भाऊसाहेब राऊत, कै. हणमंतराव गिरमे, प्रभृति शेतकरी मंडळी त्यांचेबरोबर होती.

### सासवड माळी शुगर फॅक्टरीची स्थापना

या सर्वांनीं एकत्रित स्वरूपांत सहकारी तत्त्वावर 'दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.' हा कारखाना १९३०-३२ सालीं सुरू केला. या 'अशिक्षित' शेतकऱ्यांचा हा साखर कारखाना सुरू झाला त्यावेळची परिस्थिति सर्व दृष्टीनें प्रतिकूल होती. आज साखर कारखाना सुरू करण्यास जेवढें अनुकूल वातावरण आहे, तेवढेंच प्रतिकूल वातावरण त्या काळीं होतें. पण या मंडळींची हिंमत मोठी होती. सचोटी आणि चिकाटी हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें आणि म्हणूनच अनर्थांची परंपरा कोसळली तरी श्री. हरिभाऊ गिरमे यांनीं आपल्या सर्व सहकाऱ्यांसह हा कारखाना नांवारूपास आणला.

### गिरमे कुटुंबाची आदर्श शेती

स्वतः हरिभाऊ इंग्रजी चार-पांच इयत्ता शिकले असले तरी माळीनगरला त्यांच्या प्रेरणेनें सुरू झालेली शिक्षणसंस्था ही महाराष्ट्रांतील एक आदर्श संस्था समजली जाते. हजार-बाराशें विद्यार्थी असलेल्या माळीनगरच्या मॉडेल हायस्कूलचा एस्. एस्. सी. परीक्षेचा निकाल सरासरी ९० टक्के लागतो. यावरून केवळ शेती आणि उद्योगधंदा यांवर आपलें लक्ष केंद्रीत न करितां शैक्षणिक क्षेत्रांतहि या अशिक्षित शेतकऱ्यानें आपली असामान्य कर्तबगारी दाखवली आहे.

उसाची शेती यांत हें गिरमे कुटुंब इतकें निष्णात आहे कीं, यांच्याइतकें एकरी उसाचें जास्तींत जास्त उत्पादन कोणी काढलेलें नाहीं. गेलीं कित्येक वर्षे ते हें उत्पन्न मिळवीत आहेत. आतां अलीकडे महाराष्ट्रांत इतर मोठमोठे बागाईतदार या मालिकेंत येऊन बसत आहेत.

श्री. हरिभाऊंचा मित्रपरिवारहि बराच मोठा आहे. त्या-दृष्टीनें गिरमे कुटुंबहि एक शेतीशाळाच म्हटली पाहिजे. कारण आज महाराष्ट्राच्या विविध भागांत नांवलौकिक मिळवीत असलेले जे असंख्य शेतकरी दिसत आहेत त्यांचेमध्यें या शेती शाळेंतून बाहेर पडलेले अनेकजण आहेत. हरिभाऊंचे थोरले चिरंजीव श्री. जगन्नाथराव गिरमे हे आमदार असून पुणें परिसरांतील अनेक संस्थांशीं त्यांचा घनिष्ट संबंध आहे.

आदर्श उसाची शेती ज्यांना पाहावयाची असेल त्यांनीं अकलूज, माळीनगर, नांदगांव, वानवडी या भागांतील श्री. हरिभाऊ गिरमे यांच्या मार्गदर्शनाखालील कसलेली शेती पाहावी. महाराष्ट्र ऊंसबागायतीच्या विकासांतच श्री. हरिभाऊ बळवंत गिरमे यांचें जीवनसार सामावलें आहे, असें थोडक्यांत त्यांच्या चरित्रकथनाबद्दल सांगतां येईल. —वसंत काणे,

### मध्यवर्ती सरकारी नोकरांचें निवृत्तीचें वय

मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या सेवानिवृत्तीच्या वयाची मर्यादा ५५ ऐवजीं ५८ करण्यांत येण्याचा संभव आहे. दोन वर्षांपूर्वी दुसऱ्या वेतन मंडळानें सेवानिवृत्तीचें वय वाढविण्यांत यावें अशी शिफारस केली होती. अलीकडे सरकार ह्या संस्थेच्या जबाबदाऱ्या वाढवीत आहेत. त्यामुळें चांगल्या दर्जाचे कारभारी आणि तंत्रज्ञ ह्यांची गरज सरकारला वाढत्या प्रमाणावर लागत आहे. जबाबदार अधिकाऱ्यांच्या जागांवर काम करण्यासाठी योग्य दर्जाचीं माणसें मिळत नाहींत. असा अनुभव येत चालल्यामुळें सरकार सेवानिवृत्तीचें वय वाढविण्याच्या प्रश्नाचा पुन्हां विचार करीत आहे. दुसऱ्या वेतन-मंडळानें वयाची मर्यादा वाढविण्याची सूचना केली तेव्हां ती सरकारनें स्वीकारली नाहीं. तसें करण्यानें तरुण अधिकाऱ्यांना बढतीच्या जागा लवकर मिळणार नाहींत, असें त्यावेळीं सरकारचें म्हणणें होतें. सध्यां सरकारी नोकरांना ५५ वर्षांच्या वयानंतर वर्षावर्षाची नेमणूक दिली जाते. सेवानिवृत्तीचें वय वाढविण्याचा निर्णय घेण्यांत आल्यास सर्व मध्यवर्ती सरकारी नोकर ५८ वर्षेपर्यंत काम करण्यास योग्य ठरतील. तांत्रिक कुशलतेचीं कामें करणाऱ्यांचें सेवानिवृत्तीचें वय ६० वर्षे ठरविण्यांत येण्याचा संभव आहे. अर्थात् त्यांचें काम करण्याची शारीरिक पात्रता त्यांच्यापाशीं असली पाहिजे.


सहकारी तत्त्वानें स्वतःचें जीवन तेजोमय करणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांना यंदाची दीपावली सुखाची, समृद्धीची व भरभराटीची जावो !

बँक आपुली जिल्ह्याची । करील सोय पैशाची ॥
फुलविल कणसं मोत्याचीं । 'ठेव' ठेवा सर्वांचीं ॥

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

**मुख्य कचेरी : शिवाजी रोड, कोल्हापूर**

नार : कोडिको बँक] [ फोन ३४२

या बँकेंत ठेवलेल्या ठेवींचा शेतीच्या उत्पादनवाढीसाठी व विशेषतः शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठींच उपयोग होतो.

विश्वस्त ठेवी, नगरपालिका, जिल्हा परिषद, अशा महत्त्वाच्या संस्थांच्या ठेवी स्वीकारण्यास सरकारची मान्यता असलेली व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी सतत झटणारी अशी जिल्ह्यांतील एकमेव बँक.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | १ कोटी |
| शेअर होल्डर्सनीं घेतलेले | रु. | ४४·१४ लक्ष |
| महाराष्ट्र सरकारनें घेतलेले | रु. | १७·०० लक्ष |
| एकूण ठेवी | रु. | १४७·०० लक्ष |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५·७० लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | ५ कोटींवर |

जिल्ह्यांतील महत्त्वाच्या २० ठिकाणीं बँकेनें शाखा उघडल्या आहेत.

निरनिराळ्या प्रकारच्या ठेवी आकर्षक व्याजानें स्वीकारण्यांत येतात. या संबंधींच्या अटी व इतर माहिती चौकशी केल्यास मिळूं शकेल. स्वतःचा आर्थिक विकास साधून शिवाय जिल्ह्याच्या आर्थिक विकासास हातभार लावूं इच्छिणाऱ्या लोकांनीं बँकेच्या विविध ठेवी योजनांचा फायदा घ्यावा.

कोल्हापूर, दि. २८-९-६२ व. ब. शिंदे, व्यवस्थापक.



## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें.

**कॉसमॉस बँक बिल्डिंग, कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.**

स्थापना—दि. १८ जानेवारी १९०६

[ फोन नं. ५६१८३ ]

कामाची वेळ — सकाळीं ९-१५ ते ११ ४५
सायंकाळीं ५-१५ ते ६-४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,०४,५०० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | २,१२,११५ |
| ठेवी | रु. | २०,७६,४७० |
| खेळतें भांडवल | रु. | २५,८७,६७५ |

सल्लागार मंडळ :— ( १ ) मा. द. ल. पारखी, अध्यक्ष ( २ ) मा. वा. रा. होनप, उपाध्यक्ष ( ३ ) मा. डॉ. न. का. घारपुरे ( ४ ) मा. य. बा. देहाडराय ( ५ ) मा. र. पां. भोंडे.

कार्यकारी मंडळ :— ( १ ) मा. गं. मो. भणगे, कार्याध्यक्ष ( २ ) मा. अ. दा. मोघे, उपकार्याध्यक्ष ( ३ ) मा. द. ग. देव ( ४ ) मा. द. मो. पाटसकर ( ५ ) मा. रा. द. भट ( ६ ) मा. शं. वि. दिवाकर ( ७ ) मा. सौ. आशा वि. हर्डीकर ( ८ ) मा. मो. वि. कुलकर्णी ( ९ ) मा. स. स. देशपांडे ( १० ) मा. ह. गो. महाजन ( ११ ) मा. स. ब. भागवत.

स्थानिक आयव्यय निरीक्षक :— ( १ ) मा. शं. के. कुलकर्णी ( २ ) मा. व. का. साठे.

—कर्जरूपानें आर्थिक साहायतेच्या अनेक व्यवस्था. सेफ कस्टडीची व्यवस्था. सेव्हिंग्ज ठेव दर ३%. मुदतबंद ठेवीच्या दरांची व इतर नियमांची चौकशी करावी.

—मुंबई, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, वगैरे महाराष्ट्र राज्यांतील प्रमुख शहरांतील बँकांवर ड्राफ्टस दिले जातात.

बँकिंगचे व कलेक्शनचे सर्व व्यवहार केले जातात.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह.

# भारतांतील वडे परदेशीय

## सामान्य नागरिकांपासून दुरावलेले साहेब

भारतावर ब्रिटिशांचें अधिराज्य असतांना दिल्ली येथें साहेब लोक व त्यांच्या मडमा डौलानें राहात असत. आतां ब्रिटिश राजवट संपली असली तरी अनेक कारणांमुळें पुष्कळ परदेशीय नागरिक दिल्लींत राहात आहेत. त्यांच्या व पूर्वीच्या ब्रिटिश साहेब लोकांच्या जीवनांत तसा बराच फरक पडला असला तरी एकंदर जीवनाची धाटणी कांहीं फारशी बदललेली नाहीं. हेन वे साहेब-भारतांतील लोकांपासून अलिप्तच असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. अगदीं थोड्या भारतीय लोकांशीं त्यांचा संबंध येतो. अर्थात् त्यांच्या भारताविषयींच्या कल्पना पुसटच असतात. हे परदेशीय नागरिक श्रीमंत असतात, त्यामुळें सामान्य भारतीय नागरिकांपासून साहजिकच दूर असतात. तथापि, परदेशीय नागरिकांच्या स्थानांत मात्र आतां मोठा फरक पडला आहे. आतां परदेशीय लोक कांहीं राज्यकर्ते राहिलेले नाहींत. दिल्लीमध्यें नाना देशांमधून आलेल्या परदेशीय नागरिकांचा एक मिश्र समाज तयार झालेला आहे. त्यांत परदेशीय राजदूतहि आहेत. कलकत्ता व मुंबईसारख्या व्यापारी शहरांतून मात्र परदेशीय साहेबांच्या स्थानांत फारसा फरक पडलेला दिसत नाहीं. ह्या शहरांतील बहुतेक परदेशीय साहेब अद्याप ब्रिटिशच आहेत, आणि त्यांची वागणूक त्यांचें राज्य असतांना जशी होती तशीच जवळजवळ आहे.

भारतांत येणारा परदेशीय नागरिक हा बहुधा दोन दिवसांचा पाहुणा असतो. त्याचा येथील मुक्काम अल्पकालाचा असतो. तो एखाद्या देशाचा राजदूत अगर तत्सम एखादा अधिकारी असेल तर त्याचा मुक्काम पुष्कळदा दोन अगर तीन वर्षांचाहि असतो. क्वचित् ह्याहिपेक्षा अधिक असतो. पहिले सहा महिने ह्या साहेबांना येथील परिस्थितीशीं जुळवून घेण्यांत घालवावे लागतात. बदली होण्यापूर्वीचे सहा महिने आपल्याजवळील खाजगी सामानसुमान विकून त्यापासून जास्तींत जास्त फायदा मिळविण्याच्या खटपटींत जातात. म्हणजे प्रारंभींचे व अखेरचे कांहीं महिने गडबडींतच जातात. प्रत्यक्ष कामाच्या दृष्टीनें हे लोक सरासरी वर्षभरच असल्यासारखे असतात. अमेरिकेसारख्या मोठ्या देशांच्या वकिलातीसाठी त्या त्या देशांतील खास माहीतगार लोक अधिक काळ नेमले जातात. परंतु अशांची संख्या बेताची असते.

व्यापारधंद्यानिमित्त भारतांत नेमले जाणारे साहेब लोक मात्र दीर्घ मुदतीनें आलेले असतात. एखादा साहेब भारतांत ५ अगर अधिक वर्षेंहि राहूं शकतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी अशाच कामासाठी येणाऱ्या साहेबांचें जीवन आणि आतां येणाऱ्या साहेबांचें जीवन ह्यांत पुष्कळच फरक पडलेला आहे. ब्रिटनला अगर युरोपला विमानानें जाणें आतां सुलभ झालें आहे. पूर्वी ब्रिटनला जाण्यासाठी मुंबईहून निघून सुएझ कालव्याच्या मार्गानें इंग्लिश खाडींतून बोटीनें प्रवास करावा लागे. आतां ज्या साहेबांना आपल्या रजेंतील तीन आठवडे बोटीवरच्या मौजेंत घालवावयाचे असतील तेच साहेब बोटीनें जातात. ज्या ब्रिटिश कंपन्यांचे नोकर भारतांत आहेत, त्या कंपन्या युद्धकालापासून आपल्या नोकरांना अधिक वेळां रजा देऊं लागल्या आहेत. भारतांत वर्ष-दीडवर्ष नोकरी झाली कीं ह्या नोकरांना ३ महिन्यांची रजा मिळूं शकते. दोन वर्षांच्या नोकरीनंतर तर ३ महिने रजा मिळतेच मिळते. अमेरिकन लोक आपलीं मुलें बरोबर घेऊन येतात. अमेरिकन समाजानें आपल्या मुलांसाठी खुद्द दिल्लींत अगर एखाद्या चांगल्या हवेच्या ठिकाणीं अमेरिकेमधील हायस्कूल-सारख्या शाळा स्थापन केलेल्या आहेत. ह्या शाळांतून त्यांचीं मुलें शिकतात त्याचप्रमाणें इतर युरोपियनांचींहि शिकतात. रशियन व चिनी नागरिक मात्र आपल्या मुलांसाठी वेगळी व्यवस्था करतात.

ब्रिटिश मुलें ८ वर्षांपेक्षा अधिक वयाचीं झालीं कीं पुढील शिक्षणासाठीं बहुधा ब्रिटनला जातात. भारतांत ब्रिटिश राजवट असतांना मुलांपासून वियोग होणें ही घटना फार शोकजनक मानली जात असे. १८८९ सालीं एका ब्रिटिश सिव्हिलिअन नोकरानें भारतांत येतांना आपलीं तीन मुलें ब्रिटन-मध्येंच ठेवलीं. त्यासंबंधानें तो आपल्या आठवणींत म्हणतो, "मुलांपासून दूर जाणें अतिशय दुःखदायक झालें. माझा सर्वांत लहान मुलगा अवघा ४ वर्षांचा होता;" पण पूर्वीं जो वियोग भारतांत मुलांचें शिक्षण होणें अशक्य असल्यामुळें होत असे, तोच आतां ब्रिटिश साहेबांना त्यांच्या विशिष्ट शिक्षणपद्धतीच्या रेट्यामुळें सोसावा लागत आहे. तरी पण सध्यां होणारा वियोग तितकासा दुःखद राहिलेला नाहीं. कारण पुष्कळदां मुलांचे आईबाप ब्रिटनला जाऊन मुलांना भेटून येतात; तर कधीं कधीं सरकारच्या अगर कंपनीच्या खर्चानें मुलेंच भारतांत आई-बापांना भेटण्यासाठी येतात. खुद्द ब्रिटनमध्यें राहून दूरच्या शाळेंत मुलें शिक्षणासाठीं ठेवल्यासारखाच हा प्रकार आहे. भारतांत तात्पुरत्या राहणाऱ्या परदेशी नागरिकांचें घर आतां पूर्वीपेक्षा खूप जवळ आलेलें आहे. त्यामुळें भारताकडे जिज्ञासेपेक्षा वेगळ्या नजरेनें पाहाण्याचें अगर क्रोधानें पाहण्याचें कारणच उरलेलें नाहीं. त्यांच्या घरांतल्या जीवनांत फारसा फरक झालेला नाहीं. मग तें घर दिल्लीमधील एखाद्या उपनगरांतील असो, अगर मुंबईमधील एखाद्या हवेशीर जागा असो, अगर चहाच्या मळ्यामधील एखादा बंगला असो. भारत स्वतंत्र होण्यापूर्वीं ह्या साहेबांचें जसें जीवन होतें तसेंच आजहि आहे. आणि ह्याचें कारण म्हणजे नोकरांचा सुकाळ. कोणताहि परदेशी नागरिक भारतांत आला कीं त्याला कमी अधिक प्रमाणांत नोकरांचा प्रश्न सोडवावा लागतो. तो हॉटेलमध्यें उतरल्यापासूनच त्याच्याकडे नोकऱ्या मागणारांची रीघ लागते. इतक्या नोकऱ्या आपण देऊं शकतो ह्याची त्याची त्याला सुद्धां कल्पना नसते. धोबी, आचारी, खानसामा, चौकीदार; एक ना दोन, कितीतरी प्रकारचीं कामें करणारीं माणसें त्याच्याकडे कशीं कोणास ठाऊक येऊं लागतात. ह्यापैकी कांहीं नोकरी न दिल्यास त्रास देण्यासहि कमी करीत नाहींत. पुष्कळ जण फाटकीं तुटकीं, पिवळीं पडलेलीं जुनीं शिफारस पत्रेंहि आणतात. ह्या अर्जदारांतून बहुधा तरुण माणसांची निवड होते व वयस्कर उमेदवार नशिबाला दोष देत परत जातात.

जे परदेशी लोक युद्धापूर्वीं भारतांत अगर पूर्वेकडील इतर देशांत आले आहेत त्यांना एक अगर एकापेक्षा अधिक नोकर बाळगण्याची संवय आहे. पण अलीकडे येणारे नवे साहेब शक्य तितके कमी नौकर ठेवण्याचा प्रयत्न करतात; कारण त्यांना आपलें स्वातंत्र्य व खाजगत वेळ गमवावयाचा नसतो. पण

लवकरच त्यांचा भ्रमनिरास होतो. अनुभवी लोक त्यांना इशारा देतात; किंवा थोड्याशा प्रयोगानंतर त्यांच्या लक्षांत येतें कीं भारतामधील जातिसंस्थेनें प्राचीन काळापासून केलेली श्रम-विभागणी चुटकीसरशी नाहींशी करतां येण्यासारखी नाहीं. लवकरच त्यांच्या नोकरांच्या लवाजम्यांत आचारी, खानसामा, झाडूवाला, मुलें असल्यास आया, धोबी, माळी, चौकीदार आणि जवळजवळ कायमचाच एक शिंपी ह्यांची भर पडते. प्रथम सरदारी वाटणारा हा थाट त्याला स्वीकारावा लागतो. कांहीं जणांनीं कमी नोकरांत काम भागविलें तरी एकंदरीनें इतके नोकर भारतांत कांहीं फार समजलें जात नाहींत. खानसामा अगर आचारी ह्याला दरमहा जास्तींत जास्त १० पौंडच पगार द्यावा लागला तरी सर्व नोकरांचा मिळून पगार वर्षाला ५०० पौंड होतो. दैव अनुकूल असलें तर त्याचें घर सुरळीत चालतें. तरीपण निर-निराळ्या नोकरांचे परस्पर संबंध सलोख्याचें ठेवण्यांत त्याला चांगली कुशलता दाखवावी लागते. चांगला आचारी मिळाला तर तो सुखावतो. तें कसेंहि असलें तरी एकंदरीनें चांगले नोकर मिळून घराचा गाडा व्यवस्थित चालणें हें नशिबावरच अवलंबून राहातें.

घरांत काम नसल्यामुळें हे परदेशीय लोक आपला वेळ कसा घालवतात ? पुरुषाच्या बाबतींत हा प्रश्न फारसा उपस्थित होत नाहीं. पण, घरधनिणीला जर चांगली आया मिळाली तर तिला वेळाचें काय करावें असा प्रश्न पडतो. ह्या वेळाचा सदुपयोग करणाऱ्या 'मेमसाहेब' फारच थोड्या आढळतात. बहुतेक जणी गोल्फ खेळणें, जरूर नसलेला बाजारहाट करणें, कॉफीपानाच्या पार्ट्या झोडणें, अशा उद्योगांत आपला काळ घालवितात. दिल्लींतील ह्या नव्या साहेबांत अलिप्तपणा राहिलेला नाहीं. राजधानींतील ही दुनिया वरिष्ठ श्रेणींतील हिंदी नोकरांच्या अगर राजनैतिक दूतांच्या भोंवतीं फिरत असते. ह्या मेळाव्यांत कांहीं राजकारणी हिंदीहि आढळतात. त्याशिवाय कांहीं पत्रकार, व्यापारी, ह्यांच्याहि गांठी पडतात. परंतु हे सर्व कमी अधिक प्रमाणांत पाश्चिमात्य संस्कृतीनें भारावलेले असतात. परदेशीय नागरिकांना भेटणारे हिंदी नागरिक बहुधा त्याच त्याच वर्तुळांतील अगर सामाजिक थरांतील असतात. भारतांतील सामान्य लोकांपासून हे लोक पूर्वीच्या साहेबाप्रमाणेंच दुरावलेले असतात.

---

## परदेशीय प्रवाशांपासून होणारी प्राप्ति

परदेशांतून भारतांत येणाऱ्या हौशी प्रवाशांपासून भारताला चांगली प्राप्ति होते. १९६१ सालीं भारतांत परदेशाहून १,४०,००० प्रवासी आले व त्यांच्यामार्फत भारताला जवळजवळ २१ कोटी रुपयांची प्राप्ति झाली. एकूण संख्येपैकी सुमारें ३५,००० प्रवासी उत्तर व दक्षिण अमेरिकेंतून आलेले होते. ३८,२६८ प्रवासी पश्चिम युरोपांतील देशांतून आलेले होते. २,३०२ प्रवासी ऑस्ट्रेलियाहून आणि ३,९४० जपानहून आलेले होते. रशिया, पूर्व युरोप, मध्यपूर्वेतील देश आणि आफ्रिका ह्यामधील प्रवासी मात्र त्या मानानें फार कमी येतात. ह्या प्रवाशांची सोय करणारीं हॉटेल्स आतां बरींच झालीं आहेत. परंतु त्यांपैकी सर्वोत्कृष्ट हॉटेल्स आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दृष्टीनें सुद्धां महाग आहेत. गेल्या कांहीं वर्षांत स्पेन व पोर्तुगालमध्यें युरोपीय प्रवाशांची गर्दी वाढत आहे त्याचें कारण, तेथील हॉटेलांचे स्वस्त दर व आदबीची वागणूक.

---


टेलिफोन नं. ८७ तारेचा पत्ता : किसान बँक लातूर

**दि उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.**

**हेड ऑफिस लातूर** ( जिल्हा-उस्मानाबाद )

**आधिकृत भांडवल**

| | | |
|---|---|---|
| १. सहकारी संस्था व व्यक्तिगत सभासद | रु. २५,००,००० | |
| २. राज्य सरकार | रु. २०,००,००० | |
| | | रु. ४५,००,००० |

**खपलेलें भांडवल**

| | | |
|---|---|---|
| १. सहकारी संस्था | रु. १७,७६,००० | |
| २. व्यक्तिशः | रु. १८,००० | |
| ३. राज्य सरकार | रु. ६,००,००० | |
| | | रु. २३,९४,००० |
| **गंगाजळी व इतर निधि** | | रु. २,१४,००० |
| ठेवी | | रु. ७१,२४,००० |
| खेळतें भांडवल | | रु. २,००,७८,००० |

———: शाखा :———

१. आहमदपूर, २. औसा, ३. भूम, ४. चाकुर, ५. कळंब, ६. मुरूम, ७. मुरूड, ८. निलंगा, ९. उमरगा, १० उस्मानाबाद, ११. परांडा, १२. तुळजापूर, १३. उदगीर.

भास्करराव चालुक्य, चेअरमन.

जी. आर. पाटील, मॅनेजर. मनोहरराव देशपांडे, व्हां. चेअरमन.



**मधुसंचय-धनसंचय**

**मधमाशी**

नित्य थोडा थोडा मध गोळा करते; अखेर त्याचेंच एक भलें मोठें मधाचें पोळें तयार होतें व त्यावर ती व तिचें कुटुंब गुजराण करते.

आपणहि आपल्या मिळकतींतून अशीच थोडी थोडी बचत करून व बँकेच्या बचत योजना खात्यांत आपले पैसे गुंतवून पुढें मोठी रक्कम मिळवूं शकतां व सुखी जीवनाचा लाभ घेऊं शकतां. चिकाटी व महत्त्वाकांक्षा हीं बचतीचीं अंगें असून दीर्घोद्योग व बचत हांच यशाची खरी गुरुकिल्ली आहे.

**दि बेळगांव बँक लि.**

स्थापना ] शेड्यूल्ड बँक [ १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ८,० ,००० |
| गंगाजळी | ... | रु. ५,५१,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १,३०,००,००० |

*ही दिवाळी आमच्या असंख्य ग्राहकांस, ठेवीदारांस, भागीदारांस व हितचिंतकांस सुखाची व भरभराटीची जावो !*

| भि. बा पोतदार, B. A., LL. B., चेअरमन. | ह. सि. कुलकर्णी, B. A., मॅनेजर-हेड ऑफिस | अ. रा. नाईक B.A., B.Sc. LL.B., मॅनेजिंग डायरेक्टर |
|---|---|---|

## हिंदुस्थान मशीन टूल्सचा घड्याळांचा कारखाना

हिंदुस्थान मशीन टूल्स ह्या बंगलोर येथील कारखान्यानें सेटिझन्स वॉच कंपनी ऑफ जपान ह्या कंपनीच्या सहकार्यानें ाड्याळांचा कारखाना काढण्याचा उपक्रम हातीं घेतला होता. हा ाड्याळांचा कारखाना पुढील महिन्यांत प्रत्यक्ष उत्पादनास ारंभ करणार आहे. कारखान्यांत उत्पादनास सुरुवात होण्यास रल्यापेक्षा ८ महिने अधिक अवधि लागत आहे, ह्याला कांहीं ारणें आहेत. घड्याळ्यांच्या कारखान्याला लागणारी जागा ैसूर सरकारनें दिली होती. परंतु ही जागा भारताच्या संरक्षण ात्याच्या मालकीची आहे असें नंतर आढळून आलें. त्यामुळें ागेचें खरेदीपत्रच सदोष ठरलें. संरक्षण खात्यानें ही जमीन कारखान्यासाठी देण्याचें नाकारलें; परंतु, मशीन टूल्स कारखान्याच्या नजीकच असलेली जागा कारखान्यास दिली. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री जपानमधून आयात करावयाची होती. ती आयात करण्याच्या कामींहि अडचणी आल्या. त्यामुळें कारखान्याच्या उभारणीचें वेळापत्रक मागें पडलें. दरम्यान बंगलोरच्या मशीन टूल्स कारखान्यानें गेल्या सप्टेंबरपर्यंत तीन प्रकारचीं २०,००० घड्याळें जुळवून तीं बाजारपेठेंत धाडलीं. त्या प्रकारांचीं नांवें 'सिटिझन', 'जनता' आणि 'सुजाता' अशीं आहेत. घड्याळांच्या उत्पादनाच्या कार्यक्रमांत मदत करण्यासाठी जपानी तंत्रज्ञांची एक मोठी तुकडी लवकरच बंगलोरला येणार आहे.

कारखान्यांत उत्पादन सुरू झाल्यावर पहिल्या वर्षी ५५,००० घड्याळें बनविण्यांत येतील. ह्या घड्याळांतील ५४ टक्के भाग देशी बनावटीचे असतील. दुसऱ्या वर्षी ९५,००० घड्याळें, तिसऱ्या वर्षी १,९५,००० घड्याळें, आणि चवथ्या वर्षी २,४०,००० घड्याळें बनविण्यांत येणार आहेत. घड्याळ्यांच्या वाढत्या निर्मितीबरोबरच त्यामधील देशी बनावटीच्या भागांची टक्केवारीहि वाढविण्यांत येणार आहे. दुसऱ्या वर्षी ६० टक्के भाग, तिसऱ्या वर्षी ७२ टक्के भाग आणि चवथ्या वर्षी ८४ टक्के भाग देशी बनावटीचे असतील. चवथ्या वर्षानंतर उरलेले १६ टक्के भागहि देशांत बनवितां येतील किंवा नाहीं ह्याचा विचार करण्यांत येईल. ह्या उरलेल्या भागांत घड्याळांच्या कमानीसारखे अतिशय सूक्ष्म भाग आहेत आणि ते सध्यां तरी परदेशांतूनच आयात करावे लागणार आहेत. सध्यां हीं घड्याळें हिंदुस्थान मशीन टूल्सच्या कुशल तंत्रज्ञांकडून जुळविलीं जात असतात. त्यांच्या कुशलतेची किंमत घड्याळांच्या किंमतींत समाविष्ट करण्यांत येत नाहीं. कामगारांना शिकविण्याची किंमत म्हणून तिचा हिशेब करण्यांत येतो. जुळविलेल्या घड्याळांच्या किंमतीमधून त्यांच्या उत्पादनाचा सर्व खर्च वसूल होत आहे. घड्याळांच्या उत्पादनास प्रारंभ झाला म्हणजे त्यांच्या उत्पादनाचा खर्च काढण्याची नवी पद्धत अंमलांत आणली जाईल. मग ह्या घड्याळांच्या किंमती खाली आणतां येतील असा अंदाज आहे. वर दिलेल्या प्रत्येक प्रकारच्या घड्याळांतील बनावटींत परदेशीय चलनाचा भाग किती आहे, ह्याचा हिशेब पुढीलप्रमाणें आहे. 'सिटिझन' रु. २०, विक्रीची किंमत करासह १००·५८ रुपये. 'जनता' रु. १८·१४, विक्रीची किंमत ९५·२३ रुपये. 'सुजाता' रु. १८·१८, विक्रीचीं किंमत १०५·९३ रुपये. जपानी कंपनीशीं सहकार्याचा जो करार करण्यांत आला आहे, त्यांतील अटीप्रमाणें जपानी तंत्रज्ञांनीं कारखान्यांत काम करावयाचें असून १९६६ च्या सुमारास ८४ टक्के भाग देशी बनावटीचीं असलेलीं घड्याळें तयार करावयाचीं आहेत.

बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना यंदाची दिवाळी सुखाची जावो !

# दि जमखंडी अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

स्थापना : १९४० ] [ शाखा : बनहट्टी

( ३० जून १९६२ चे आंकडे )

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | : | रु. १,७७,७२० |
| गंगाजळी व इतर निधि | : | रु. ३,७४,९९५ |
| ठेवी | : | रु. २१,६२,८४५ |
| कर्जव्यवहारांतील गुंतवणूक | : | रु. ९,३८,६९० |
| सरकारी रोखे गुंतवणूक | : | रु. ७,९०,३१२ |
| ठेवींवरील व्याजाचे दर | : | रु. १ ते ५½% |
| कर्जावरील व्याजाचे दर | : | रु. ६ ते ९½% |
| डिव्हिडंड | : | रु. ६¼% |
| ऑडिट वर्ग | : | 'अ' |

मध्यवर्तीत स्वतःचे मालकीची इमारत. सेफडिपॉझिट व्हॉल्टची उत्तम सोय. मार्केट यार्डात स्वतःचे मालकीची गोडाउन्स लवकरच तयार होतील. बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

म. द. खाडिलकर, मॅनेजर. — श्री. म. अथणी, चेअरमन

# दि कोल्हापूर मराठा

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

स्थापना : १९३३ ] [ फोन नं. ७१३



| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ३,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. | १,३४,२१५ |
| रिझर्व्ह फंड | रु. | ७८,०८३ |
| इतर फंडस् | रु. | ४७,४९७ |
| खेळतें भांडवल | रु. | ७,१२,८३१ |
| सभासद संख्या | | २,८९३ |
| चालू सालचा निव्वळ नफा | रु. | १५,०८७=७८ न.पै. |
| जाहीर केलेलें डिव्हिडंड | रु. | ६·२५% |

या बँकेंत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डी. के. पाटील, मॅनेजर. — जनार्दन दत्तात्रय भोसले, प्रेसिडेंट.

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

स्थापना :— ३०-३-११४९ [फोन नं. ६०२

मुख्य कचेरी :— ५१, साखरपेठ, सोलापूर.

शाखा :— पंढरपूर.

चेअरमन :— श्री. आर. व्ही. वेत, बी. ए., एलएल्. बी.

**या बँकेंत गुंतविलेला पैसा जिल्ह्यांतील सर्व औद्योगिक सहकारी सोसायट्यांना व उद्योगधंदे करणाऱ्यांना दिला जातो.**

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ६,०३,९५० |
| राखीव व इतर निधि | रु. २,३४,५३५ |
| ठेवी | रु. ११,६८,८३० |
| खेळतें भांडवल | रु. ४१,३४,७८४ |

**महाराष्ट्र राज्यांतील एकमेव औद्योगिक सहकारी मध्यवर्ती बँक**

**भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.**

सभासदांना हातमागाच्या तयार मालावर कर्जे दिलीं जातात.
सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

आर. के. एम्. देसाई, G. D. C. & A.
मॅनेजर.



बँकेचे ग्राहकांना नूतन वर्ष सुखाचें जावो !

## दि बँक ऑफ कराड लि.

रजिस्टर्ड ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड

शाखा : मुंबई, पुणें, सातारा, इस्लामपूर, तासगांव, विटें

चेअरमन :—श्री. नारायण बाळाजी बुधकर, B. A., LL. B.,

व्हाईस चेअरमन :—श्री. महादेव रामचंद्र देशपांडे

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २,४४,००० |
| रिझर्व्हज् | रु. १,३६,००० |
| ठेवी | रु. ५८,००,००० |
| इन्व्हेस्टमेंट (सरकारी कर्जरोखे, वगैरे) | रु. २०,००,००० |

**ठेवीवरील व्याजाचे दर**

सेव्हिंग्ज ठेव ३% मुदत ठेव ४% ते ५½%

कॉल डिपॉझिटस् आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारलीं जातात.

**अद्ययावत् पद्धतीचे सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.**

*नवीन शेअर्सविक्री चालू आहे.*

कराड, दि. १८-१०-१९६२

म. वि. खंडकर,
मॅनेजर.



★ ११ वर्षांपासून चालत आलेली सोलापुरांतील ★
एकमेव नागरी सहकारी बँक

## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

स्थापना : ६-६-१९२१

फोन नंबर ३१७] [रजि. नं. ६४६४

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ६४,०७० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. ४५,३८२ |
| ठेवी | रु. ३,८४,०१४ |
| खेळतें भांडवल | रु. ५,२३,७७५ |

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
सोनें चांदीचे जिनसांचे, व्यापारी मालाचे व मुदत ठेव व गव्हर्मेंट सिक्युरिटीजचे तारणावर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

**— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —**

(१) श्री. मा. ह. कोंतम, प्रेसिडेंट. (२) श्री. डॉ. सं. मु. कल्याणी, ऑ. मॅ. डायरेक्टर. (३) श्री. वा. गुं. बागेवाडीकर, (४) श्री. कृ. गो. जानकर, (५) श्री. ना. वि. दुदगीकर, (६) श्री. म. मा. भालकीकर, (७) श्री. ग. रा. बाळी, (८) श्री. ति. बा. भोळा, (९) श्री. ग. रा. खडकीकर.

के. एल. सिद्धम
मॅनेजर



## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

स्थापना सन १९१७] कराड [फो. नं. ४३

*गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ सतत 'अ' वर्ग*

चेअरमन :—श्री. वि. कृ. तांबवेकर, बी. ए., एलएल्. बी. वकील, कराड.

| | |
|---|---|
| खेळतें भांडवल | रु. ५७,४८,४३५ |
| रिझर्व्ह फंड व इतर निधि | रु. ४,८०,८८८ |
| भाग भांडवल | रु. १,४३,१२० |
| ठेवी | रु. ४९,८३,१०९ |
| सरकारी कर्जरोखे व शेअर्स | रु. २०,६१,९०१ |

**सहकारी क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या बँकेचीं वैशिष्ट्यें.**

ठेवीदारांचा विश्वास व सेवाभावी कार्यपद्धति ही बँकेच्या प्रगतीचीं मुख्य अंगें आहेत.

*बँकिंगचे सर्व व्यवहार तत्परतेनें व माफक दरानें केले जातात.*

**आकर्षक ठेवीचे दर व नवीन तिजोरी-घर यामुळें सर्वांची अधिक सोय होत आहे.**

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

कराड

शं. पु. कुलकर्णी,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## रशिया-चीन व्यापारांत झालेली मोठी घट

रशिआ व चीन ह्या दोन कम्युनिस्ट मतप्रणालींच्या देशांत तीव्र मतभेद झाल्याच्या वार्ता आहेत. अलीकडे रशियानें चीन-मधील राजदूतांच्या आपल्या कचेऱ्या बंद केल्याचेंहि प्रसिद्ध झालें आहे. त्याचबरोबर उभयता देशांच्या परस्परांत होणाऱ्या व्यापारांतहि मोठी घट झाल्याचें समजतें. त्यावरून मतभेदाच्या वार्तांना पुष्टीच मिळत आहे. मॉस्कोंत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं १९६० सालीं रशियानें चीनला केलेल्या निर्यातीपेक्षा १९६१ सालामधील निर्यात ४५ टक्क्यांनीं कमी झाली. १९५९ सालाच्या मानानें निर्यातीमधील घट ५५ टक्के आहे. युद्धोत्तर काळांत लागलीच जितकी निर्यात चीनला करीत असे तितक्या पातळीवर ही निर्यात आतां आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या युरोपीय आर्थिक मंडळानेंहि आपल्या ताज्या अहवालांत ह्या व्यापारघटीचा उल्लेख केलेला आहे. रशिया-कडून होणाऱ्या एकूण निर्यातीपैकी चीनचा वांटा सुमारें २० टक्के असावयाचा तो आतां ८ टक्क्यांपर्यंत खाली उतरला आहे अशी माहिती अहवालांत दिली आहे. ह्याच काळांत रशियानें जगांतील इतर देशांना निर्यात केलेल्या मालाची टक्केवारी ३० टक्क्यांनीं वाढली आहे. रशिया व चीन ह्यांच्यामधील व्यापारांतील घटी-प्रमाणेंच रशियाच्या गटांतील इतर देश व चीन ह्यांच्यामधील व्यापारांतहि बरीच घट झालेली आहे. चीनच्या एकूण आयाती-पैकीं ६५ टक्के आयात ह्या देशांकडून होत असे. आतां ही आयात ५० टक्क्यांपेक्षाहि कमी झालेली आहे उलटपक्षीं गेल्या वर्षी चीननें रशियाला केलेली निर्यात चीननें केलेल्या आयातीपेक्षा सुमारें एकतृतिअंशानें अधिक आहे. ह्यावरून असा निष्कर्ष काढ-ण्यांत येत आहे कीं, रशियानें चीनला द्यावयाच्या मदतींत कपात केलेली असावी आणि चीनच्या अंतर्गत अडचणींचा विचार न करतां चीनला द्यावयाच्या मदतीबद्दल जे करार करण्यांत आले आहेत, त्यांतील अटीप्रमाणें दिलेल्या मदतीची परतफेड कर-ण्याचा आग्रह धरला असावा.

रशिया व चीन ह्यांच्यामधील तात्विक मतभेदांचा उभयता देशांमधील व्यापारावर परिणाम झाला आहे. कां चीन स्वतःच्या आर्थिक व व्यापारी क्षेत्रांतील अडचणी लपविण्यासाठी रशियावर अलीकडे कडवट टीका करीत आहे हें सांगणें कठीण आहे. तें कसेंहि असलें तरी गेल्या दोन-तीन वर्षांत चीनच्या औद्योगिक विकासांत बरेच व्यत्यय निर्माण झाले असून त्यामुळें विकासाची गति बरीच मंदावली आहे असें म्हणतात. ह्याच काळांत रशियानें चीनमधील आपले तंत्रज्ञ काढून घेतलेले आहेत. आणि चीनला भांडवली स्वरूपाचा माल द्यावयाचे बंद केलेले हें लक्षांत घेण्या-सारखें आहे. दरम्यान खुद्द रशियानें मात्र तंत्रविज्ञानांत विलक्षण प्रगति केलेली आहे. त्यामुळें रशिया व चीन ह्यांच्यामधील तंत्र-विज्ञानाच्या बाबतींतील तफावत खूपच वाढलेली आहे. तथापि, असेंहि म्हणतां येईल कीं चीनला मोठ्या प्रमाणांवर मदत चालू ठेवून शिवाय अवकाश-संशोधनाचे साहसी व खर्चिक प्रयोग करीत राहाणें खुद्द रशियालाच शक्य होत नसावें किंवा कदाचित् चीनच्या रागालोभाची पर्वा करणें रशियाला आतां जरूर वाटत नसावें. लोकसंख्येनें भलताच समृद्ध असलेल्या चीनला आधुनिक यंत्र व तंत्र विज्ञानाची मदत देऊन स्वःतला एक नवा बलाढ्य शत्रु निर्माण करून ठेवण्याची रशियाला इच्छा नसावी असाहि अंदाज जाणकार आंतराष्ट्रीय निरीक्षक करीत आहेत.

---







ही दीपावलि व नूतन वर्ष आमच्या सर्व भागीदारांस, ठेवीदारांस व हितचिंतकांस सुखाचें व समृद्धीचें जावो.

सेवा, सहकार व सचोटी या त्र्यीवर आधारलेली

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना १९४१ ] तालुका-बेळगांव [ फोन नं. ५३५

कुटुंबांतील मंगल कार्ये, उच्च शिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी या बँकेंतील संजीवनी दैनिक ( बचत ) ठेव, क्युम्युलेटिव्ह ठेव अगर सेव्हिंग्ज बँक ठेव यांत खातीं उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येईल.

★ व्याजाचे दर नेहमींच आकर्षक आहेत ★

प्रगतिपर वाटचाल

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. | १,२१,९४० |
| रिझर्व्ह फंडस् | रु. | १,६७,६६४ |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. | ६,८८,१९६ |
| ठेवी | रु. | १६,५६ ४४८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २०,१४,३८४ |

अधिक माहिती बँकेच्या कार्यालयांत मिळेल.

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे,
चेअरमन.

ही दीपावली आमचे ठेवीदारांस, सभासदांस व हितचिंतकांस सुखाची व भरभराटीची जावो.

वाळवे तालुक्यांतील ग्रामीण भागांतील पहिली सहकारी बँक

# दि आष्टा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

आष्टा, जिल्हा सांगली

र. नं. ९५१८ ] [ स्था. ता. २०-१-१९४७

बँकेचीं कांहीं खास वैशिष्टयें

| | | |
|---|---|---|
| १ ) अधिकृत व वसूल शेअर भांडवल | रु. | १,००,००० |
| २ ) रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | ३५,००० |
| ३ ) ठेवी | रु. | ४,००,००० |
| ४ ) गुंतवणूक | रु. | १,००,००० |
| ५ ) खेळते भांडवल | रु. | ७,०१,००० |

*या बँकेंत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

शिवाय सोनेगहाण मालगहाण कर्जे दिलीं जातात. आकर्षक व्याजाचे दरानें करंट, सेव्हिंग्ज मुदतठेवी स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरासाठी समक्ष भेटा अगर पत्र पाठवा. त्याचप्रमाणें लाइफ इन्शु. कॉर्पो. ऑफ इंडिया व दि युनियन को-ऑप. इन्शु. सोसायटीचे हप्ते विनामूल्य स्वीकारणेस या बँकेस अधिकृत परवाना मिळाला आहे.

एन. ए. रुकडे, मॅनेजिंग डायरेक्टर.
बी. टी. पोरवाल, चेअरमन.

—: दिवाळी अभिष्टचिंतन :—

यंदाची दिवाळी आमचे ग्राहकांना सुखाची जावो !

# दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

इचलकरंजी (हेड ऑफिस) शाखा : आजरे (कोल्हापूर)

स्थापना : १९३० ] [ फोन नंबर ३६

गेलीं बत्तीस वर्षे इचलकरंजीचे औद्योगिक विकासास अविरत सक्रिय साहाय्य करणारी इचलकरंजींतील एकमेव संस्था.

| | | |
|---|---|---|
| भरलेलें भांडवल | रु. | १,४९,२००=०० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १,६६,०१२=०० |
| इतर फंडस | रु. | २,४३,२५१=०० |
| खेळतें भांडवल | रु. | ३७,४१,४८८=०० |

कर्जाचे दर : ६ ते ९ टक्के.

ठेवीचे दर : चालू १ टक्का. सेव्हिंग्ज ३ टक्के. मुदत ठेव : ३॥ ते ५ टक्के. कॉल डिपॉझिट : ४ टक्के.

सार्वजनिक संस्था, शिक्षण संस्था, वगैरेंना स्पेशल जादा दर देणेंत येतात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

हेड ऑफिसमध्यें लॉकर्स भाड्यानें देणेची सोय आहे.

श्री. ज. दांडेकर, मॅनेजर.
दत्तात्रय बाबुराव कदम, चेअरमन.

# दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जळगांव

नवी पेठ, महात्मा गांधी रोड, जळगांव.

तारेचा पत्ता: JDCO BANK ] स्थापना १९१६ [ टेलिफोन नं. १५४

चेअरमन : श्री. जे. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी. एम्. पी.

व्हा. चेअरमन : कृषिपंडित व्यंकटराव भगा पाटील.

ता. ३०-६-१९६२ अखेरचे बँकेच्या प्रगतीचे बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | ४६,८५,४०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ४०,४४,२३१ |
| ठेवी | रु. | ४,१५,६६,७२९ |
| खेळतें भांडवल | रु. | ६,८८,००,००० |

बँकेच्या शाखा ४४

बँकेंतील ठेवींचा विनियोग जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस सहकारी संस्थामार्फत माफक दरांत कर्जपुरवठा करण्यासाठी होतो. जिल्ह्यांतील सर्व व्यापारी महत्त्वाच्या ठिकाणीं बँकेच्या शाखा आहेत.

सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. मौल्यवान वस्तूंचे सुरक्षिततेसाठी खास लॉकर्सची सोय महत्त्वाच्या ठिकाणीं आहे.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

विशेष माहितीस्तव समक्ष भेटावें.

ना. ना. भिरूड, शासनाधिकारी.
रां. या. सोनवणे, कार्यसंचालक.

## हायकोर्ट जज्जांच्या पेन्शनींत वाढ करा

हायकोर्ट जज्जांना सेवानिवृत्तीनंतर देण्यांत येणाऱ्या निवृत्ति-वेतनांत वाढ करण्यांत यावी, अशी सूचना भारताच्या सर न्यायाधीशांनीं भारत-सरकारला केली आहे. अशी वाढ केल्यामुळें ह्या जागेवर काम करण्यासाठी वकीलमंडळीमधील हुषार, लायक व अनुभवी माणसें उत्तेजित होतील असें त्यांचें मत आहे. हायकोर्टाच्या सरन्यायाधीशांची व अनुभवी न्यायाधीशांची नुकतीच एक परिषद भरली होती. ह्या परिषदेंतहि अशीच सूचना केलेली होती. राज्यपुनर्घटना मंडळानें राज्यांतील हायकोर्ट जज्जांची दुसऱ्या राज्यांतील हायकोर्ट जज्जांच्या जागीं बदली करावी असें सुचविलेलें आहे व त्याचप्रमाणें कांहीं बदल्या करण्यांतहि आल्या आहेत. अशा बदली केलेल्या न्यायाधीशांना घरभाडें भत्ता व इतर सवलती देण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे.

---

## भारतामधील अमेरिकेची भांडवल गुंतवणूक

न्यूयॉर्क येथील इंडियन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्या संघटनेचे डायरेक्टर श्री. गोपाल मेनन् ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, भारतामधील उद्योगधंद्यामध्यें भांडवल गुंतविण्याच्या बाबतींत ब्रिटन व इतर कांहीं देशांपेक्षां अमेरिकेंतील कारखानदारच पुढें आहेत. त्यामुळें भारतामधील उद्योगधंद्यांत परदेशीय भांडवलाची भागीदारी मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. संघटनेच्या नवी दिल्ली येथील कचेरीकडे भांडवल गुंतवणुकीसाठी सुमारें २०० विचारणा आल्या होत्या. त्यांपैकी ६० टक्क्यांपेक्षा अधिक विचारणा अमेरिकेमधील कॉर्पोरेशन्सकडून आलेल्या होत्या. भारतांत गुंतविण्यांत आलेल्या अमेरिकन भांडवलाबाबत करण्यांत आलेल्या अनधिकृत अंदाजाप्रमाणें सध्यां भारतांत सुमारें ३० कोटी डॉलर्स अथवा ११२·५ कोटी रुपये भांडवल गुंतविलेलें असावें.

---

## सुएझच्या कालव्याची सुधारणा

गेल्या कांहीं वर्षांत सुएझ कालव्यामधून तेलाची वाहतूक करणाऱ्या बोटींची ये-जा बरीच वाढली आहे. त्यामुळें इजिप्तच्या सरकारचें उत्पन्नहि वाढलें आहे. वाढत्या उत्पन्नामुळें उत्तेजित होऊन हा कालवा अधिक खोल व रुंद करण्याची योजना हातीं घेण्यांत येण्याचा संभव आहे. योजना अमलांत आणण्यासाठी १० कोटी पौंड खर्च येणार असून ती पूर्ण झाल्यावर तेलवाहतूक करणाऱ्या प्रचंड बोटीहि त्यामधून सुलभतेनें जाऊं शकतील. सहा वर्षांपूर्वी सुएझच्या कालव्याचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. तेव्हांपासून १ लाख बोटींनीं कालव्याचा वापर केला. कालव्याच्या संकल्पित सुधारणेसाठी १ कोटी पौंडाचें परदेशीय चलन लागणार आहे. परदेशीय चलनासाठी जागतिक बँकेकडे कर्ज मागण्यांत येईल.

---

## एंजिनिअरिंगच्या मालाला मागणी

अमेरिकेंतील सीॲटल येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत भारतानें भाग घेतलेला आहे. भारतानें पाठविलेल्या मालांत ड्रिलिंग-मशीन्स, डिझेल एंजिनें, शस्त्रक्रियेचीं उपकरणें इत्यादि एंजिनिअरिंगचा मालहि आहे. ह्या मालाबद्दल अमेरिकेंतून दर आठवड्याला ३० तरी विचारणा येत असतात. प्रदर्शन गेल्या एप्रिल महिन्यापासून चालू झालेलें आहे.

---


# बार्शी सेंट्रल अर्बन
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी
[ स्थापना १९०६ ]

हेडऑफिस बार्शी | शाखा वैराग, ता. बार्शी

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. १,२८,४१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. २,०६,९७९ |
| ठेवी | रु. २१,३४,४६१ |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. ५,२०,९४३ |
| खेळतें भांडवल | रु. २५,८९,०७२ |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात

ही दीपावलि बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो.

व. ह. उटगीकर, मॅनेजर
रा. गो. टिळक, ॲड्व्होकेट, चेअरमन

# जनता सहकारी बँक लि.
फोन ] पुणें [ ५६६४३

८५९ सदाशिव पेठ, पुणें २.

शाखा :—( १ ) घोले रोड, पुणें ५ ( २ ) भवानी पेठ, पुणें ( ३ ) मंगळवार पेठ, भोर.

## सुरक्षितता, सहकार व विश्वास
वरील गोष्टीसाठी आजच जनता बँकेंत खातें उघडा.

—: बँकेचीं वैशिष्ट्यें :—

(१) बँकेनें अल्पावधित खरेदी केलेली इमारत.
(२) शहरांत व जिल्ह्यांत शाखा.
(३) महाराष्ट्रांत प्रमुख ठिकाणीं चेक्स् देण्याची व्यवस्था.
(४) ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर.
(५) मध्यमवर्गीय जनतेसाठी आकर्षक व उपयुक्त योजना
(६) बँकिंगच्या अन्य सौजन्यपूर्ण सवलती.

— लिहा अगर भेटा —

द. शं. जमदग्नि,
कार्यकारी संचालक.

### अणुविस्तारयुक्त पाण्याची शुद्धि

अणुबाँबच्या साह्यानें युद्ध लढलें गेलें तर पिण्याचें पाणी अणुविस्तारानें दूषित होतें. हें पाणी शुद्ध करून पिण्यास योग्य करण्याची एक सोपी पद्धत अमेरिकन सरकारनें शास्त्रज्ञांच्या साह्यानें शोधून काढली आहे. तळाला भोकें पाडलेलें एखादें भांडें घेऊन त्यांत माती भरावी. माती भरण्यापूर्वी तळाला असलेल्या भोकावर स्वच्छ फडकें पसरावें. अशा रीतीनें भांड्याचें गाळणें तयार झाल्यावर त्यांत वरून दूषित झालेलें पाणी ओतावें. भांड्यांतील माती पाण्यांतील विषारी द्रव्यें मोठ्या प्रमाणावर शोषून घेईल. तळांत फडकें असल्यामुळें मातीचे बारीक कणहि गळणाऱ्या पाण्याबरोबर खाली येणार नाहींत. अशा रीतीनें शुद्ध केलेल्या पाण्यांतहि रोगजंतु असण्याचा संभव असतो. म्हणून त्यांत थोडेसें टिंक्चर ऑफ आयोडिन टाकावें. मोठाल्या शहरांचा पाणीपुरवठा दूषित झाल्यास नागरिकांनीं ही रीत आणीबाणीच्या प्रसंगीं वापरावी असा सल्ला अमेरिकन सरकारनें दिला आहे.

### हिंदुस्थान शिपयार्डला झालेला नफा

हिंदुस्थान शिपयार्ड ह्या कंपनीची १० वी वार्षिक सभा दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. कंपनीचे अध्यक्ष डॉ. नागेंद्रसिंग आपल्या भाषणांत म्हणाले कीं, १९६१–६२ सालांत कंपनीला रु. २४,४१८ नफा झालेला आहे. हा नफा मुख्यत: छोट्या बोटी बांधून झालेला आहे. सध्यां कंपनीकडे भरपूर काम आहे. तथापि, १९६४ च्या नंतरहि कंपनीला पुरेसें काम मिळावें म्हणून आतांच अधिक मागण्या नोंदविण्याची गरज आहे. भारतामधील बोट वाहतूक कंपन्या आणि सरकारच्या मालकीचें शिपिंग कार्पोरेशन ह्यांच्याकडून कंपनीला पुरेसें काम पुरविण्यांत येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं. कंपनींत २४ दिवसांचा संप झाला नसता तर तिच्या कामांत आणखीहि सुधारणा दिसली असती.

### बोकॅरो येथील पोलादाचा कारखाना

बोकॅरो येथें काढण्यांत यावयाच्या पोलादाच्या चौथा कारखान्याच्या उपयोगासाठी बिहार राज्यसरकारनें ४४,००० एकर जमीन आपल्या ताब्यांत घेतली आहे. त्याचप्रमाणें सरकारनें आपल्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पांत १० लाख रुपयांची तरतूद केली आहे. ज्यांच्या जमिनी कारखान्यासाठी घेण्यांत आल्या आहेत त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी ही रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासंबंधींचा अमेरिकन तज्ज्ञांचा अहवाल ह्या वर्षअखेर पुरा होईल असा अंदाज आहे. अहवालाचा अभ्यास करण्यांत येऊन मग किती मदत द्यावयाची तें अमेरिकेचें सरकार ठरविणार आहे.

### गोहत्ती येथें कॅन्सर रोगाचें इस्पितळ

मद्रास राज्याचे गव्हर्नर श्री. विष्णुराम मेधी ह्यांच्या हस्तें गोहत्ती येथें एका कॅन्सरच्या इस्पितळाचा पायभरणी समारंभ करण्यांत आला. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं, क्षयरोगाखालोखाल भारतांत कॅन्सरच्या रोगानें अधिक लोक दगावतात. हें इस्पितळ डॉ. भुवनेश्वर बरुआ ह्यांच्या स्मरणार्थ उभारण्यांत येत आहे. डॉ. बरुआ ह्यांनीं वैद्यकीय व्यवसायांत चांगलें नांव कमावलेलें होतें. अलीकडे कॅन्सररोगाच्या संशोधनाबाबत बरीच प्रगति करण्यांत आलेली असून रोगाचें निदान लवकर झाल्यास कॅन्सर बरा करतां येतो असें तज्ज्ञांचें मत झालें आहे.


## रिगल बेकरी

डेक्कन जिमखाना, गोखले स्मारक चौक.
आमचे येथें सँड्विच व ब्राऊन ब्रेड वगैरे माल मिळेल.

प्रो. एस्. एस्. कुलकर्णी,

कुटुंबाचें आरोग्य व सुखशांतीकरितां
' नैसर्गिक ' जीवनसत्त्वें असलेलें

## शुद्ध व साजूक तूप

अवश्य वापरा.

म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.
( फोन नं. ५६४३० )

## पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन

सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

स्थापना १९१४] ७३, बुधवार पेठ, पुणें १ [फोन नं. ५७१५६

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. | २,८०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,०९,००० |
| ठेवी | रु. | २४,१०,००० |
| इन्व्हेस्टमेन्टस | रु. | १,८६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ३०,००,००० |

बँकेचीं वैशिष्ट्यें :—

(१) बँक गेलीं ११ वर्षें ' अ ' वर्गांत असून चालू वर्षीं सभासदांना रु. ६–५० डिव्हिडंड व भरलेल्या व्याजावर १२ टक्के रिबेट दिला आहे.

(२) बँकेंत सभासद व बिगर सभासद यांचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

(३) बँकेनें सहकारी तत्त्वांचा संपूर्ण अवलंब करून सभासदांना काटकसरीची संवय लावली आहे. सभासद काटकसर फंडाची रक्कम रु २०,००,००० जमा असून ती खेळत्या भांडवलाच्या ६५ टक्के आहे. दरसाल सुमारें पांच लाखांनीं ही रक्कम वाढत आहे.

(४) बँकेचे ठेवींचे दर आकर्षक असून ते खालीलप्रमाणें आहेत.
कायम ठेव द. सा. द. शें.

| मुदत | १ वर्ष | २ वर्षें | ३ वर्षें | ४ वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|---|---|
| व्याजाचा दर | ४ रु. | ४¼ रु. | ४½ रु. | ४¾ रु. | ५ रु. |

सेव्हिंग ठेव :—दरसाल दरशेंकडा तीन टक्के. चालू ठेव :—दरसाल दर शेंकडा एक टक्का. हप्तेबंद ठेव :—द. सा. द. शें. तीन ते चार टक्के.
बँकेसंबंधीं इतर कोणतीहि माहिती पाहिजे असल्यास समक्ष भेटावें.

ना. कृ. कुलकर्णी, मॅनेजर. रा. ता. कांबळे, कार्याध्यक्ष. ल. मा. कदम अध्यक्ष.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक

पोस्ट बॉक्स नं. ३२ — लिमिटेड, सोलापूर — फोन नं. २१७

तारेचा पत्ता— कृषि बँक — (स्थापना १९१८) — हेड ऑफिस : सोलापूर

शाखाः—कुर्डूवाडी, पंढरपूर, करमाळा, अक्कलकोट, सिद्धार्थ (सोलापूर), मंगळवेढा, अकलूज, नातेपुते, बार्शी, वैराग, मंद्रूप, करकंब, केम, चाटीगल्ली (सोलापूर), जेवूर, टेंभुर्णी.

उपशाखाः—मोहोळ, सांगोला, मोडलिंब, माढा.

| | | |
|---|---|---|
| १. खपलेलें शेअर भांडवल | रु. | २२,७९,५५० |
| २. रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १६,५०,२३३ |
| ३. सर्व प्रकारच्या ठेवी. | रु. | १,५५,५२,७९६ |
| ४. एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५०,९१,४४८ |
| ५. सन १९६१–६२ चा नफा | रु. | १,३५,२८५ |

जिल्ह्यांतील सहकारी चळवळीच्या केन्द्रस्थानीं असलेली व ठेवीदार व संबंधित गिऱ्हाइकांच्या विश्वासास पात्र झालेली व सतत ४४ वर्षे प्रगतिपथावर असलेल्या ह्या बँकेंतून पुढील प्रकारचे व्यवहार केले जातात :—

(१) सर्व शेतकरीवर्गाला शेतकी सोसायट्यांमार्फत अल्प मुदतीचीं, मध्यम मुदतीचीं व लांब मुदतीचीं कर्जे दिलीं जातात.

(२) सर्व शाखांमार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

(३) सोलापूर येथील हेड ऑफिसमध्यें मौल्यवान् जिनसा सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे.

(४) ठेवींवरील व्याजाचे दर आकर्षक ठेवणेंत आले आहेत.

(५) मोठ्या रकमा ठेवणारांनीं समक्ष ऑफिसांत येऊन चौकशी करावी. त्यांना सवलतीचा व्याजाचा दर दिला जातो.

के. के. परबत, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर

नामदेवराव महादेवराव जगताप
चेअरमन



आमचे सर्व भागीदार, शेतकरी बंधु, हितचिंतक आणि संबंधितांना
ही दिवाळी व नवें वर्ष सुखसमृद्धीचें जावो !

सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठीं सतत प्रयत्न करीत असलेला—

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

तार :— SANCOSOP ] — ११५, भवानी पेठ, पुणें २. — [ फोन :—२३११५

*आपल्यासाठीः—*

★ संस्थेनें साडेपांच लाख रुपये खर्च करून शेतीमधील नाशवंत मालासाठी अद्ययावत् शीतगृह विकत घेतलें आहे. त्या ठिकाणीं भाजीपाला, फळफळावळ, अंडीं, दुधाचे पदार्थ, चांगल्या रीतीनें राहूं शकतात.

★ भरघोस उत्पादनासाठी उत्कृष्ट खतांचा पुरवठा करीत आहे. तसेंच, संघानें स्वतःचें मिश्रखत उसासाठी व भाजीपाल्यासाठी तयार केलेलें आहे व तें किफायतशीर भावांत शेतकरी व सोसायट्या यांना पुरविलें जातें.

★ शेती-मालाच्या विक्रीसाठी हुकमी गिऱ्हाईक मिळविण्याची व्यवस्था केली आहे.

★ शेतकऱ्यांना लागणारीं खतें, बीं-बियाणें, अवजारें, लोखंड, सिमेंट, पत्रा, वगैरे माल नियंत्रित दरांत पुरविण्याची व्यवस्था संघामार्फत होत असते.

★ उत्तम प्रकारचा आंबेगांवचा निर्भेळ आंबेमोहोर तांदूळ ४० किलोंच्या पिशव्यांमध्यें विक्रीस ठेवला आहे.

★ खात्रीचें स्नो-बॉल कॉली-फ्लॉवरचें बीं परदेशांतून मागवून विक्रीसाठी ठेवलें आहे.

मुगुटराव साहेबराव काकडे देशमुख,
अध्यक्ष.

श्री. म. उपळेकर, एम्. ए., एलएल. बी.
कार्यकारी संचालक

बबुराव बळवंतराव धुमाळ,
उपाध्यक्ष.

सं. सा. काकडे, बी. ए., एलएल. बी.
व्यवस्थापक.

महाराष्ट्र राज्यांतील गेलीं २६ वर्षे जनतेची सेवा करणारी
ठेवीदारांना त्यांचे ठेवीचे सुरक्षिततेबद्दल खात्री वाटणारी अग्रेसर नागरी सहकारी बँक

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

फोन क्र. – ५१ ] स्थापना–१९३५ [ तार–URBANBANK

मुख्य कार्यालय–हरभट पथ, सांगली
शाखा कार्यालय–माधवनगर, जिल्हा सांगली

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें व वसूल भांडवल | ... | ... | रु. २,१३,२९० |
| गंगाजळी व इतर निधि | ... | ... | रु. ५,०८,६६६ |
| ठेवी | ... | ... | रु. ५७,३०,००० |

तपासणी वर्ग "अ"

(१) मौल्यवान् जिन्नस व महत्त्वाचे कागदपत्र सुरक्षित ठेवण्यासाठी दोन्ही कार्यालयांत लॉकर्सची सोय आहे.
(२) सर्व नागरिकांना नियमितपणें बचत करणें सुलभ व्हावें अशा प्रकारची बचत योजना बँकेनें सुरू केलेली असून बऱ्याच नागरिकांनीं त्यांत भाग घेतला आहे.
(३) आकर्षक व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
(४) पेन्शनरांची पेन्शन्स वसुलीची व्यवस्था आहे.
(५) महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स असोसिएशनची ही संस्था सभासद आहे व त्यामुळें महाराष्ट्रांतील बहुतेक महत्त्वाच्या ठिकाणांवर ड्राफ्टस दिले जातात.
(६) बँकेनें स्थापनेपासून भागीदारांना ६¼ टक्केप्रमाणें करमाफ डिव्हिडंड दिलें आहे.

*बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.*

श्री. वि. ह. माईणकर, B. Sc., LL. B., अध्यक्ष. श्री. ल. य. लागू, B. A., LL. B., मॅनेजर.

ही दिवाळी व नवीन वर्ष बँकेचे भागीदार, ठेवीदार, हितचिंतक यांना सुखाचें जावो !



यंदाच्या दीपावलीनिमित्त—

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड

आपल्या गोड शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

महाराष्ट्र साखर कारखानदारीच्या क्षेत्रांतील—

## दि कोल्हापूर शुगर मिल्स लि. ची वैशिष्ट्यपूर्ण प्रगति.

– या अभिमानास्पद प्रगतीचे कांहीं ठळक विशेष –

(१) १९३४ सालीं साखरेच्या उत्पादनास सुरुवात.
(२) १९४४ मध्यें डिस्टिलरी सुरू होऊन स्पिरीटच्या उत्पादनास सुरुवात झाली.
(३) १९६०–६१ सालीं उत्पादन-शक्तींत महाराष्ट्रांत अग्रेसर झालेल्या या कारखान्यानें साखर उत्पादनाचा उच्चांक गांठला.

आणि आतां—

—प्र ग ती चा न वा ट प्पा—

कोल्हापुरांत ॲसेटिक ॲसिडच्या नवीन कारखान्याची लवकरच उभारणी होत आहे.

अद्ययावत सुधारणा, कलात्मक रचना व अद्ययावत् यंत्रसामग्री हें आमच्या कारखान्याचें आगळें वैशिष्ट्य आहे.

मॅनेजिंग एजंटस,
दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लि.,
कोल्हापूर.